२ व्यक्तिनाम-व्युत्पत्ति-कोश

अजंभट [अध्यम = अजम = अजम्.
अजम् + भट = अजंभट] (भा. इ. १८३४)

अजेसेन [अजितसेन = अजियसेण = अजेसेन]
(भा. इ. १८३५)

अन्त्या [अनन्त = अंत्या (एकशेष)] विशेषनाम).
(भा. इ. १८३६)

अंदोजी, अंधोजी [अंधक (यदुवंशीय) = अंदोजी, अंधोजी]

अनुबाई [अनसूया = अनू, अनी (एकशेष)]
(भा. इ. १८३६)

अन्या, अन्याबा [अनन्त = अन्या (एकशेष) अन्याबा (बहुमानदर्शक)] (भा. इ. १८३६)

अंबिके [अंबिके] (दासींचीं नांवें पहा)

अबू [अभिभू (काशीराजाचा पुत्र-भारत) = अबूजी]

अंबे [अंब] (दासींचीं नांवें पहा)

अर्जोजी [अर्जुनादित्य = अर्जोजी] (आदित्य पहा)

अहिमणी [अभिमन्यु = अहिमणी (प्राकृत)]

आदित्य - अर्जुनादित्य = अर्जोजी

कृष्णादित्य = कन्हू (कन्हू चें ममतादर्शक) + जी = कान्होजी

धनादित्य = धनाजी

नागादित्य = नागोजी, नागाजी

परशुरामादित्य = परस (एकशेष) + जी = परसाजी, परसोजी

बालादित्य = बालाजी, बाळाजी, बाळोजी

भगादित्य = बगाजी, बगोजी

भीमादित्य = भिउजी, भिमाजी, भिमोजी

मानादित्य = मानाजी, मानोजी

यशआदित्य = एसाजी

युधिष्ठिरादित्य = जोध (एकशेष) जी = जोधाजी

रघुनाथादित्य = रघोजी, रघुजी, रघाजी

राजादित्य = राजाजी, राउजी

रामादित्य = रामाजी, रामोजी

लक्ष्मणादित्य = लखाजी, लखजी, लुकजी, लखुजी

वामनादित्य = वामनाजी, वामनजी, वामनोजी

विक्रमादित्य = विक्रमाजित = बिकर्मजी. द = ज. त्य = त

विश्वनाथादित्य = विस (एकशेष) आजी = विसाजी, विसोजी

विष्ण्वादित्य = विष्णाजी, विष्ण्याजी

व्याघ्रादित्य = बाघोजी, बाघूजी

शंकरादित्य = शंकराजित = शंकराजी, शंकरोजी

शंभ्वादित्य = संभाजी, संभूजी

शिवादित्य = शिवाजी, शिउजी

सूर्यादित्य = सूर्याजी

तात्पर्य, हा जी, आजी, प्रत्यय आदित्य या संस्कृत शब्दापासून निघाला आहे.
(भा. इ. १८३६)

इठी [स्त्री = इट्ठी = इठी] कुणबी स्त्रियेचें विशेषनाम.
(भा. इ. १८३२)

उदाजी [उदयन (a name of a prince) = उदाजी]

उधोपंत [उद्धवपंडितः = उधोपंत]

एडु [ऐध् १ वृद्धौ. एधतु = एडऊ = एडु] (धनगरामधील एक नांव) एडु = संपन्न. (धा. सा. श.)

एसाजी [यशआदित्य] (आदित्य पहा)

कबीर [कपिल = कविर = कबिर = कबीर] प्रसिद्ध कवी व साधू याचें नांव. (भा. इ. १८३३)

कमळे [कमलिनि] (दासींचीं नांवें पहा)

कळंभट [कलण = कह्लण = कळम्. कळम् + भट = कळंभट] (भा. इ. १८३४)

कानडा [कृष्णडः] (कान्हुला पहा)

कान्हा [कान्हुला पहा]

कान्हुला [अडज्वुचौ (५-३-८०). उप शब्द पूर्वी असला म्हणजे तद्धितार्थक अडज्वुचौ प्रत्यय होतात म्हणून पाणिनि सांगतो. मराठींत उप शब्दा खेरीज हि हे प्रत्यय होतात-

कृष्णडः = कानडा (विठ्ठलाला हा शब्द कवि लावतात)

कृष्णकः = कान्हा

कृष्णिकः = कान्हा

कृष्णियः = कान्ह्या

कृष्णिलः = कान्हुला

राम = रामडा, रामा, राम्या, रामुला

विष्णु = विनुटला, विष्ण्या]

इ. इ. इ.

कान्होजी [कृष्णादित्य = कन्हू (कन्ह चें ममतादर्शक) + जी = कान्होजी] (आदित्य पहा)

कान्ह्या [कान्हुला पहा]

कालिंदे [कालिंदि] (दासींचीं नांवें पहा)

काळूबाई [काला (विशेषनाम) = काळूबाई. द्याश्रयकाव्य-४-५१]

कुशा [कौशिकः = कोसिआ = कुशा (पुरुषनाम)]

कुशी [कोशिकी = कोसिइ = कोशी = कुशी (स्त्रीनाम)]

केरू [केयूरक = केरू (Proper name)]

कैके [केतकि] (दासींचीं नांवें पहा)

कोंडू – हा शब्द कानडी कोंड म्हणजे घेणारा या शब्दापासून निघाला आहे. ताम्रपटांतून वातापिकोंड, मदिरैकोंड, म्हणजे बदामी शहर घेणारा, मदिरे घेणारा, असे समास येतात. कोंड = कोंडू (ममतादर्शक). (ग्रंथमाला)

कोंडूबाई [कुण्डा (विशेषनाम) = कोंडूबाई द्याश्रयमहाकाव्य-४-५१]

खंडोबा – हेमचंद्र हरस्कंदौ या संस्कृत द्विवचनाचें हरखंडा असें प्राकृत रूप देतो. खंडा हें अनेकवचन आहे; कां कीं प्राकृतांत प्रायः द्विवचन नाहीं. तात्पर्य स्कंद या संस्कृत शब्दाचें प्राकृत रूप खंड असें होतें. त्याचें ममतादर्शक मराठी रूप खंडू व आदरदर्शक मराठी रूप खंडोबा. म्हणजे महाराष्ट्रांत जेजुरी, बालो वगैरे ठिकाणचे जे खंडोबा आहेत ते मूळचे स्कंद होत. स्कंद म्हणजे कार्तिकस्वामी. कार्तिकस्वामीचें देऊळ पुण्याच्या पर्वतीस आहे, तें स्कंदाचें म्हणजे खंडोबाचें च होय. इतकें च कीं, पर्वतीवरच्या त्या देवाचें नांव संस्कृत आहे व जेजुरीच्या देवाचें नांव प्राकृत आहे. स्कंद ही देवता वीरांची व योद्ध्यांची फार पूर्वीपासून आहे. स्कंदाला सेनानी हें अपरनाम आहे. त्याची उपासना वीर करितात. महाराष्ट्रांतील सर्व जातींचे मराठे (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, रामोशी वगैरे) खंडोबा हें आपलें कुलदैवत कां समजतात तें वरील उद्घाटनावरून समजणार आहे. खंडोबा हें शिवदैवत आहे, असें कित्येक लोक समजतात, तें अर्थात् निराधार आहे. स्कंदपुराणांत स्कंदोपासकांची म्हणजे खंडोबाच्या उपासकांची माहिती सांपडते. (भा. इ. १८३२)

गणबा [गणपाल] (धणबा पहा)

गणंभट – बहुतेक सर्व भिक्षुकांच्या नांवांत मकार विकल्पानें उच्चारतात. त्या बहुतेक ठिकाणीं तो अनुस्वार अणगा = अणण = आण् = ण् = अनुस्वार अशा परंपरेनें आलेला आहे.

उदाहरणें:—गणभट व गणंभट, नानाभट व नानंभट,
तात्याभट व तातंभट, बजाभट व बजंभट,
कृष्णभट व कृष्णंभट

गणाण्णाभट = गणण्भट = गणंभट

नानाण्णाभट = नानण्भट = नानंभट

कृष्णाण्णाभट = कृष्णण्भट = कृष्णंभट इ. इ. इ.

(भा. इ. १८३४)

गवि – (युधि पहा)

गागा (भट्ट) [गार्ग्यः = गाग्गा = गागा] हें घरचें आवडतें नांव आहे. (भा. इ. १८३३)

गांधारी – गंधर्व या शब्दाचें प्राकृत गांधार अथवा गंधार. गंधार या शब्दाचें पैशाची प्राकृत खंदार. खंदार हा शब्द मराठी ऐतिहासिक पत्रांतून व बखरींतून येतो. गांधारी हा शब्द प्राकृत आहे. तो भारतांत येतो. त्या अर्थी प्राकृत भाषा प्रचलित झाल्यावर भारत झालें हें स्पष्ट आहे. (भा. इ. १८३२)

गुण्या [गुण्यः = गुण्या (पुरुषनाम)] (भा. इ. १८३४)

गोणाबाई [गोणा (संस्कृत स्त्रीनाम) = गोणा (स्त्रीनाम)] (भा. इ. १८३४)

[गोणा (विशेषनाम) = गोणा. द्याश्रयमहाकाव्य-४-५१]

गोमा १ [गोतमः = गोयमा = गोमा (विशेषनाम)] (भा. इ. १८३६)

-२ [गोमान् गोमी (अमर-द्वितीयकांड-वैश्यवर्ग-५८) गोमान् = गोमा] गोमाजी बिन तिमाजी, व गोमा गणेश ह्या शब्दांतील गोमा हा शब्द गोमान् ह्या संस्कृत शब्दापासून निघाला आहे. (भा. इ. १८३३)

गोरा कुंभार [गोरभ (proper name) = गोरा] गोरभ हें नांव पूर्णभद्राच्या पंचतंत्रांत तंत्र १ कथा ३ यांत आलें आहे.

ग्यानी, ग्यानू [ज्ञानदेव] (नानू १ पहा)

चुडामण [चूडामणि = चुडामण]

छगन [शकुनि = छगुनि = छगन (विशेषनाम)] (भा. इ. १८३६)

जजाबा [ययाति = जजाबा, जिजाबा (व्यक्तिनाम)]

जजु [यज्यु (यजुर्वेदज्ञ) = जज्यु, जजु]
(भा. इ. १८३६)

जनी १ [जन्या (करवली) = जनी. जनिः (सून) = जनी]

–२ [जानकी = जाणइ = जाणी = जणी = जनी]
(भा. इ. १८३२)

जनू [जनार्दन (एकशेष) = जनू]

जळंभट [जह्लण = जळण = जळं. जळं + भट = जळंभट]
(भा. इ. १८३४)

जानू १ [जन्युः (ब्रह्मदेव) = जानू. जन्यः (करवला) = जानू]

–२ [जानुक = जाणुअ = जानू] हा शब्द शाकुंतल नाटकांत श्यालाच्या भाषणांत येतो.

–३ [जन्हुः = जानू]

जानोजी [जन्हु = जानोजी]

जिउ, जिउवा [जीमूत = जीवूअ = जिऊ, जिउ, जिउवा] जिउ, जिउबा, जिवाजी, जिवा हीं विशेषनामें जीमूत पासून निघालेलीं आहेत.

जिऊ [जीमूत = जिऊअ = जिऊ (पुरुषनाम)]
(भा. इ. १८३३)

जिजा [जया = जजा = जिजा (स्त्रीनाम). जिजाबाई = जया]

जिजावा [ययाति] (जजाबा पहा)

जिवा १ [जीमूत] (जिउ पहा)

–२ [जीवक = जिवा, जिऊ] जीवक म्हणजे दास, चाकर. जिवा, जिऊ हीं शूद्रादिकांत व क्वचित् ब्राह्मणादिकांत नांवें असतात.

जिवाजी [जीमूत] (जिउ पहा)

जुजुत्सु [युयुत्सु = जुजुत्सु (हा जपानी शब्द बहुशः आर्य आहे)]

जोजार [यज्वर (sacrificer) = जोजार] जोजार नागेश = यज्वरः नागेशः हें मराठी ग्रंथकाराचें नांव आहे.

जोधाजी [युधिष्ठिरादित्य = जोध (एकशेष) + जी = जोधाजी]
(आदित्य पहा)

ठकी [स्थगिका (रंडी, तांबूलकरंकवाहिनी) = ठकिआ = ठकी]
(भा. इ. १८३३)

ठिंठाकराल – हा शब्द कथासरित्सागराच्या १२१ व्या तरंगाच्या ७२ व्या श्लोकांत आला आहे. तसाच कर्पूरमंजरींतहि टेंटाकराल आला आहे. सोमदेवानें बृहत्कथेचा तर्जुमा संस्कृतांत यथामूल केला. तेव्हां गुणाढ्यानें ठिंठाकराल हा शब्द योजिला, असें म्हणावें लागतें. ठिंठाकराल हें कथासरित्सागरांत कितवाचें नांव आहे. हा कितव जुगारी असे.

गुणाढ्य विक्रमादित्याचा उल्लेख करितो. सप्तशतीचा कर्ता व गुणाढ्याचा आश्रय जो हालसातवाहन तो हि विक्रमादित्याचा उल्लेख करितो. गुणाढ्य उज्जयिनीच्या पालक राजाचा हि उल्लेख करितो. हा पालक विद्याधरचक्रवर्ति जो नरवाहनदत्त त्याचा समकालीन होता, असें गुणाढ्य म्हणतो. पालकाच्या वंशांत शूद्रक झाला असल्यास तो विक्रमादित्याच्या पूर्वी झाला असला पाहिजे. प्रायः शूद्रक विक्रमादित्याच्यापूर्वी व नरवाहनदत्ताच्या नंतर झाला असावा. म्हणजे मृच्छकटिक शकपूर्व २०० च्या पूर्वी व पांचशेंच्यानंतर रचिलें गेलें असावें. हीं सर्व विधानें गुणाढ्य प्रमाण धरल्यास विश्वसनीय समजावयाचीं आहेत.
(भा. इ. १८३२)

तानी, तान्ही [तन्वी = तानी, तान्ही] तानीबाई, तान्हीबाई हें मराठींत स्त्रीव्यक्तिनाम झालें आहे.

तुकाराम – तुकाराम हा शब्द तुकणें = तोलणें ह्या धातूंतील तुका व राम ह्या दोन पदांचा बनला असावा असा कित्येकांचा समज आहे; परंतु ह्या शब्दाचीं तुका आणि राम अशीं पदें पाडणें रास्त नाहीं. कारण, तुका ह्या पदाचा कांहीं अर्थ देतां येत नाहीं. मूळ शब्द तोषाराम (तोष + आराम) त्याचें प्राकृत तोखाराम; त्याचा अपभ्रंश तोकाराम; त्याचें तुकाराम. आत्मन् + आराम = आत्माराम. शांत + आराम = शांताराम. कृपा + आराम = कृपाराम. दया + आराम = दयाराम. परंतु सीता + राम = सीताराम. कृष्ण + राम = कृष्णराम. नारो + (त्याचा बाप) राम = नारोराम. पण नंदाराम = नंद + आराम.
(सरस्वतीमंदिर, आश्विन शके १८२६)

दड्ड – हें नांव गुर्जर राजांच्या वंशावळींत शक ४०० पासून सुमारें शक ७०० पर्यंत येतें. हा शब्द प्राकृत आहे. ह्याचें मूळ संस्कृत दध्र. हा दध्र शब्द बाणानें योजिला आहे:—

" मातृशयनीयतूलिकातलनिषण्णः च तनयोऽन्यं तनयं अभिषेक्तुकामस्य दध्रस्य करूषाधिपतेः अभवत् मृत्यवे । "

बाणः – हर्षचरितं-षष्ठः उच्छ्वासः. दध्र = दड्ड.

दड्ड = दध्र हें व्यक्तिनाम त्या काली इतर वंशांत हि प्रचलित होतें, असें हर्षचरितावरून दिसतें.
(भा. इ. १८३५)

दस्या [(देव) दत्तक (दुर्दैवी दत्त) = दत्तअ = दत्ता, दस्या (एकशेष). रामक = राम्या इ.] (भा. इ. १८३४)

दामा [ददातीति दामा = दामा] दामा शेटी = दामा श्रेष्ठिन्.

दारकी – हें नांव शूद्रांत आढळतें. पण्यस्त्री दारिका दासी। द्वारका शब्द निराळा. (भा. इ. १८३३)

दासींचीं नांवें – हर्षचरिताच्या अष्टमोच्छ्वासांत बाणानें दासींचीं नांवें (पृष्ठें २४६, २४७) दिलीं आहेत. त्यांवरून मराठींत खालील नांवें आलीं आहेत.

१ कलहंसि = हंशे (एकशेष)	१३ नर्मदे = नर्मदे, नबु
२ सुंदरि = सुंदरे	१४ सुभद्रे = सुभद्रे
३ मंगलिके = मंगळे	१५ वसंतिके = बसन्त्ये
४ शबरिके = सबरे, सवरे, शबरे	१६ मुक्तिके = मुक्त्ये
५ मातंगिके = मंगे	१७ मंजुलिके = मंजुळे
६ वत्सिके = वच्छे	१८ कालिंदि = काळिंदे
७ नागरिके = नागरे	१९ कमलिनि = कमळे
८ विराजिके = बिर्जे	२० रोहिणि = रुई
९ भृंगारधारिणि = भुंगे	२१ अंब = अंबे
१० केतकि = कैके	२२ अंबिके = अंबिके
११ मेनके = मेनके	२३ सीमंतिनि = शेवंते
१२ विजये = विजे	

हीं सर्व नांवें शूद्रांत महाराष्ट्रांत सध्यां हरहमेष आढळतात. (भा. इ. १८३५)

देवण [दैवज्ञ = देवण्ण = देवण] देवणभट असें विशेषनाम कोंकणांत अद्याप हि क्वचित् आढळतें.

देवानंपिय–१ देवानंपिय व पियदसि हे दोन प्राकृत शब्द अशोकाच्या शिलाशासनांत येतात. पैकीं, देवानंपिय ह्या पांच अक्षरांसंबंधानें विवेचन करतों. हीं पांच अक्षरें जुळून लिहिलीं तर ह्या पांच अक्षरांचा एक सामासिक शब्द होतो. ह्या पांच अक्षरांतून पहिलीं तीन अक्षरें जुळून निराळीं लिहिलीं, म्हणजे देवानं व पिय असे दोन व्यस्त शब्द होतात. आतां अशोकाच्या शिलाशासनांत पांच हि अक्षरें मिळून एक च सामासिक शब्द मूल लेखकानें मानिलेला होता किंवा देवानं व पिय असे दोन शब्द मानिले होते, तें शिलालेखांवरून स्पष्ट होत नाहीं. शिलालेखांत प्रायः एकापुढें एक सारखीं अक्षरें लिहिलीं असल्यामुळें; समास आहे कीं व्यास आहे हें प्रथमदर्शनीं सांगणें अवघड जातें. तेव्हां, आपल्याला एकच तोड राहते. समास मानून अर्थ काय होतो व संदर्भाला कितपत जुळतो हें पहावयाचें; किंवा व्यास मानून अर्थ काय होतो व संदर्भाला कितपत जुळतो हें पहावयाचें. पैकीं समास मानून अर्थ काय होतो तें प्रथम पाहूं. देवानंपिय ह्या प्राकृत सामासिक शब्दाचें संस्कृतरूप **देवानांप्रिय** देवानांप्रिय या संस्कृत सामासिक शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक मूर्ख हा अर्थ व दुसरा देवप्रिय हा अर्थ. दिव् धातूचे दोन अर्थ होतात (१) खेळणें व (२) प्रकाशणें. पैकीं, खेलनार्थक दिव् पासून निघालेल्या देव शब्दाचा अर्थ जुगारी असा होतो; व प्रकाशनार्थक दिव् पासून निघालेल्या देव शब्दाचा अर्थ निर्जर असा होतो. पहिल्या पक्षीं देवानांप्रिय या सामासिक शब्दाचा अर्थ जुगाऱ्यांचा लाडका, अतएव निंद्य, मूर्ख असा निंदार्थक होतो; व दुसऱ्या पक्षीं अमरांचा लाडका, अतएव पूज्य असा स्तुत्यर्थक अर्थ होतो. दोन्ही अर्थ अशोकाच्या कालीं प्रचलित होते, हें उघड आहे. स्तुत्यर्थानें यद्यपि कोणीं देवानांप्रिय हा सामासिक शब्द आपल्याला लावून घेतला, तत्रापि ऐकणाऱ्याच्या मनांत त्या समासाचा मूर्ख हा अर्थ निंदार्थ उठण्यासारखा आहे. तेव्हां हा द्व्यर्थक सामासिक शब्द अशोकानें आपल्याला लावून घेतला असेल, असें मानण्याकडे प्रवृत्ति होत नाहीं. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, देवानांप्रिय ह्या शब्दाचा लाक्षणिक अर्थ मूर्ख असा अशोकाच्या नंतर झाला, अशोकाच्या कालीं त्याचा देवप्रिय हा एकच वाच्यार्थ होता. पतंजलि, शंकराचार्य व बाण यांनीं देवानांप्रिय हा सामासिक शब्द स्तुत्यर्थक योजिलेला आहे, तेव्हां अशोकानें हि तो स्तुत्यर्थकच योजलेला आहे, असें हि कित्येकांचें म्हणणें आहे. ह्या म्हणण्यानें देवानांप्रिय ह्या शब्दाच्या मीं दाखविलेल्या द्व्यर्थत्वाला कोणत्या हि प्रकारचा बाध येतो असें दिसत नाहीं. अशोक पतंजलि, बाण यांनीं प्रकाशनार्थक दिव् धातूपासून निघालेला स्तुत्यर्थक देवानांप्रिय समास योजिला असेल व प्रकरणानुरोधानें ऐकणाऱ्याच्या किंवा वाचणाऱ्याच्या मनांत स्तुत्यर्थ संदर्भानें उद्भवूं हि शकेल. परंतु निंदार्थ अगदीं उद्भवूं शकणार नाहीं, असें नाहीं. पतंजलि, शंकराचार्य व बाण ह्यांनीं हा शब्द संदर्भानुरोधानें स्तुत्यर्थक योजिला असल्यामुळें, त्यांची गोष्ट सोडून देऊं. अशोकानें प्रौढीनें व सद्भावानें हें विशेषण आपल्याला लावून घेतलेलें आहे; तेव्हां वाचणाऱ्याच्या किंवा ऐकणाऱ्याच्या मनांत देवप्रियतेच्या बरोबर मूर्खत्वाचा हि अर्थ उठण्यासारखा आहे. विशेषतः वाचक किंवा श्रोता जर विरोधिपक्षाचा किंवा थट्टेखोर स्वभावाचा असेल, तर दोन्ही अर्थ त्याच्या मनांत उद्भवून, त्याच्या मुखावर हास्याची छटा तेव्हांच उमटेल. प्रत्यन्तापर्ध

एक उदाहरण देऊं. समजा कीं, भगवान् बुद्धानें आपल्याला सिद्धार्थ हें नांव घेतलें व तें सद्भावानें घेतलें. निरनिराळ्या श्रोत्यांच्या मनावर ह्या शब्दाच्या श्रवणानें काय भावना उमटतील तें पहा. श्रोता जर बुद्धानुयायी असेल, तर सिद्धार्थ शब्दानें चारी अर्थ ज्याचे सिद्ध झाले आहेत अशा थोर पुरुषाची कल्पना त्याच्या मनांत उभी राहील. परंतु, श्रोता जर बुद्धविरोधी असेल, तर सिद्धार्थ म्हणजे फोडणी देण्याची मोहरी असा अर्थ करून, तो चार थट्टेखोर लोकांत बरा च हंशा पिकवील. असा हंशा उत्पन्न होऊं नये म्हणून च कीं काय, अमरसिंहानें बुद्धाच्या नाममालिकेंत सिद्धार्थ हा शब्द न घालतां, त्याचा पर्याय शब्द जो सर्वार्थसिद्ध तो घातला आहे. सिद्धार्थो मत्स्यं चखाद, हें वाक्य ऐकून, (१) बुद्धानें मासा खाल्ला हा अर्थ जसा भाविकाच्या मनांत उद्भवेल, तसा च (२) मोहरीनें मासा खाल्ला, हा अर्थ विरोधी थट्टेखोराच्या मनांत उद्भवेल. ग्रंथांतून सिद्धार्थ शब्द येतो, परंतु द्व्यर्थत्वानें तो थट्टेस पात्र होईल, हें त्या ग्रंथकाराच्या ध्यानांत यद्यपि आलें नाहीं, तत्रापि तें अमरसिंहाच्या ध्यानांत आलें व त्यानें तो शब्द मुद्दाम गाळला, असें मला वाटतें. तो च प्रकार अशोकाचा कां न व्हावा? प्रायः झाला असावा; व त्यानें देवानांप्रिय हा शब्द सामासिकभावनेनें योजिलेला नसावा, व्यस्तभावनेनें योजिलेला असावा.

२ वरील पृथक्करणानें एवढें निश्चित झालें कीं देवानंपिय असा समास धरून अर्थ नीट बसत नाहीं, संशयाला जागा रहाते. तेव्हां व्यस्त पदें धरून काय अर्थ निष्पन्न होतो तें पाहूं. दे वा नं पि य ह्या एकापुढें एक येणाऱ्या पांच अक्षरांचे असे दोन भाग पाडले असतां, दोन अर्थ निष्पन्न होतात. देवानां प्रियः हा एक अर्थ व देवेभ्यः प्रियः हा दुसरा अर्थ. प्राकृतांत चतुर्थीचें काम षष्ठी करते. देवानांप्रिय म्हणजे देवांचा लाडका व देवेभ्यः प्रियः म्हणजे देवांना लाडका. दोन्ही विभक्ती घेतल्या तरी मतलब एक च. देवानां प्रियः म्हणजे liked of the gods व देवेभ्यः प्रियः म्हणजे dear to the gods. ह्या दोन्ही अर्थांतून व्हिन्सेन्ट स्मिथ्चा Sacred हा अर्थ वाटेल तितकी ओढाताण केली तत्रापि निघत नाहीं. आपल्या Early History of India, 2nd. Ed. P. 166–Note मध्यें स्मिथ् येणें प्रमाणें लिहितो:—" His Sacred and Gracious Majesty " is a fair equivalent of देवानंपिय पियदसि which words formed an official title and cannot be rendered faithfully by etymological analysis.

स्मिथ्नें Sacred हा अर्थ कित्येक यूरोपीयन राजांच्या बिरुदावळीच्या उपमानांवरून काढिलेला आहे. इंग्लंडचे राजे आपणास धर्माचे व संस्थानाचे मुख्य समजतात व स्वतःस Sacred, High, Gracious वगैरे बिरुदें लावितात. तो च प्रकार अशोकानें केला असावा, असें स्मिथ्ला वाटलें इतकें च. परंतु स्मिथ्नें एक च गोष्ट ध्यानांत घ्यावयाची होती, ती ही कीं, इंग्लंडांतल्याप्रमाणें भारतवर्षांत धर्माचें आदिस्थान राजाच्या ठायीं कधीं हि व कोणीं हि मानिलेलें नाहीं. धर्माचें आदिस्थान भारतवर्षांत फार पुरातन कालापासून वेदादिग्रंथांच्या व त्यांचा आशय सांगणाऱ्या धर्मगुरूंच्या ठायीं अधिष्ठापिलेलें आहे. इंग्लंडांतल्याप्रमाणें भारतवर्षांत धर्म हा राजाचा अंकित नाहीं; राजा धर्माचा अंकित आहे. भारतवर्षांत वस्तुतः राज्य कोणाचें? तर धर्माचें. मोठमोठ्या राजांच्या व महान् महान् महंताच्या अशा उक्ती आहेत कीं, भारतवर्षांत **धर्मराज्य** आहे. या धर्मराज्याचीं, पुरोहित, राजा, अमात्य, दुर्ग, बल, कोश वगैरे अंगें आहेत. म्हणजे भारतवर्षांत राजा हा धर्मराज्याचें एक अंग आहे. इंग्लंडांतल्याप्रमाणें धर्माच्या वरती अधिकार करणारा नाहीं. तेव्हां, स्मिथ् म्हणतो त्या अर्थानें Sacred हें विशेषण अशोक आपणा स्वतःला खुळ्यासारखा लावील, हें बिलकुल संभवत नाहीं. आपण देवांचे किंवा देवांना लाडके आहोंत, असें अशोक स्पष्ट म्हणतो. ह्या [१० म्हणण्याचा आशय काय? इतर माणसें काय देवांचीं लाडकीं नाहींत कीं अशोकानें च तेवढी आपल्या लाडकेपणाची फुशारकी मिरवावी? तर तसें नाहीं. अशी फुशारकी अशोक मिरवीत नाहीं. अशोक एका वैदिक संप्रदायाला अनुसरून हे शब्द वापरीत आहे. भारतीय आर्यकुलांत फार पुरातन कालापासून असा एक संप्रदाय आहे कीं, आपलें पाळण्यांतील खरें नांव कोण्या हि आर्यानें प्रकट करूं नये; एखाद्या टोपण नांवानें आपली प्रथा करावी किंवा निदान मूळ नांवांत थोडा तरी फेरबदल करून मग तें प्रकट करावें. ह्याविषयीं सूत्रांतून स्पष्ट उल्लेख आहेत व हिंदुस्थानांत हा संप्रदाय अद्याप हि विद्यमान आहे. ऐतरेयोपनिषदाच्या तृतीय खंडाच्या शेवटीं ह्या पुरातन संप्रदायाचें एक नामांकित उदाहरण दिलें आहे. त्याला ब्रह्म दिसलें. तेव्हां इदं अदर्शम् असे उद्गार त्यानें काढिले. ह्या उद्गारांवरून त्याचें नांव इदंद्र असें पडलें. त्या इदंद्राला परोक्षत्वानें सर्व देव इंद्र असें म्हणूं लागले. कां कीं, देव परोक्षप्रिय आहेत. प्रत्यक्ष जें इदंद्र हें चतुरक्षरात्मक नांव तें परोक्षप्रिय देवांना आवडलें नाहीं, एतदर्थ त्यांनीं इंद्र हें अक्षरद्वयात्मक

परोक्ष नांव पसंत केलें. " **तं इदंद्रं सन्तं इंद्र इति आचक्षते परोक्षेण, परोक्षप्रिया इव हि देवाः ।** " ह्यांत, देव हे परोक्षप्रिय आहेत, ही गोष्ट प्रामुख्यानें लक्ष्यांत ठेवावयाची आहे. पशू जे आहेत तें प्रत्यक्षप्रिय असतात. म्हणजे इंद्रियांना जें सहज गोचर होईल तें पशूंना किंवा पशुतुल्य द्विपादांना पसंत किंवा प्रिय होतें. परंतु जे देव आहेत, जे ज्ञानी आहेत, त्यांना परोक्ष जें अनुमानादिप्रमाणजन्य ज्ञान तें प्रिय असतें. असे जे परोक्षप्रिय देव त्यांनीं इदंद्र हें जें प्रत्यक्ष नांव त्यांत फेरबदल करून इंद्र असें परोक्ष नामाभिधान पसंत केलें. आतां अशोकाच्या शिलाशासनांतील देवानं प्रिय पियदसि राजा या शब्दांत हा पुरातन संप्रदाय कसा प्रतीत होतो तें पहा. अशोकाचें मूळ पाळण्यांतील नांव अशोक. हें प्रत्यक्ष नांव स्वतः उच्चारणें किंवा योजणें पुरातन संप्रदायाच्या विरुद्ध. सबब, पियदसि ह्या परोक्ष नांवाचा अशोकानें उपयोग केला आहे. उपयोग करतांना असा परोक्ष नांवाचा उपयोग कां केला तें हि अशोक देवानंपिय ह्या शब्दांनीं व्यंजीत आहे. देवानां म्हणजे परोक्षप्रियाणां प्रियः अहं, असें अशोक व्यंजीत आहे. परोक्षप्रिय जे देव त्यांचा प्रिय जो परोक्ष नांवानें प्रथित पियदसि राजा तो असा हुकूम करतो इ. इ. इ.. शिलाशासनांत अशोक असें नांव अशोकानें कोठें हि कोरवलेलें नाहीं; पियदसि हें परोक्ष नांव च तो स्वतः सदा योजीत असे. कारण, तसा संप्रदाय भारतवर्षांत फार प्राचीन काळापासून होता. तात्पर्य, प्रियदर्शिन्, पियदसि, हें अशोकाचें परोक्ष नांव आहे. स्मिथ् म्हणतो त्याप्रमाणें पियदसि ह्या शब्दाचा अर्थ gracious असा नाहीं. मूळीं हें विशेषण नाहीं. हें विशेषनाम आहे. **दीपवंशांत** अशोकाला पियदसि ह्या च नांवानें उल्लेखिलेलें आहे. **दीपवंशांत** असा प्रयोग व प्रकार झालेला आहे, हें हि स्मिथ् विसरला आहे व अज्ञानानें gracious असें भाषान्तर करता झाला आहे.

३ स्मिथ् ज्याप्रमाणें पियदसि या शब्दाचा अर्थ गाफिलपणानें Gracious असा करतो, त्याप्रमाणें च इतर कित्येक लोक या शब्दाचा अर्थ Seeing bliss, आनंद पाहणारा असा तितक्या च गाफिलपणें करतात. खरा अर्थ असाः— परोक्षप्रियः देवाः । परोक्षं प्रियं येषां ते परोक्षप्रियाः । देवांना परोक्ष हें प्रिय आहे. तें परोक्ष अशोक पहातो. तेव्हां तो देवांना जें प्रिय तें पहातो. अर्थात् अशोक देवांना प्रिय असणार च. तेव्हां प्रियदर्शिन् याचा अर्थ Seeing inferentially असा आहे. अशोक ह्या साध्या प्रत्यक्ष तेवढ्या गोष्टी पाहून राज्य हांकणारा नव्हता. तर परोक्ष अनुमानानें विचक्षणा व अन्वीक्षण करून राज्यकारभार शिताफीनें चालविणारा धुरंधर मुत्सद्दी होता. ही गोष्ट प्रियदर्शिन् या शब्दानें व्यक्त होते. यद्यपि प्रियदर्शिन् या शब्दांत असा खोल अर्थ आहे, तत्रापि अशोकानें हा शब्द आपलें विशेषनाम केलें आहे व प्राचीन संप्रदायाचा बोज राखिला आहे. चाणक्यानें आन्वीक्षिकी विद्येचे मोठे गोडवे गायिले आहेत ते **कौटिलीय अर्थशास्त्र** या नांवाच्या नुकत्या च प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत पहावे.

४ आतां देवानं पिय पियदसि राजा या शब्दांचें भाषांतर करूं. देवांना लाडका जो पियदसि नांवाचा राजाः King पियदसि beloved of the Gods स्मिथ्चें Sacred and Gracious Majesty हें भाषांतर ह्यापुढें त्याज्य व दुष्ट मानावें हें उचित आहे. (भा. इ. १८३५)

धणबा–धणबा, गणबा, मोरबा हे शब्द संस्कृतांत धनपाल, गणपाल, मयूरपाल असे होते. त्यांचीं प्राकृत रूपें धणबाल, गणबाल, मोरबाल, अशीं झालीं. नंतर लचा लोप होऊन धणबा, गणबा, मोरबा अशीं वर्तमान मराठींत (सन १०००–१९०४) बनलीं. बा प्रत्यय पाल ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. जुन्या जैन नांवांत पाल शब्द बराच आढळतो.

(स. मं. शके १८२६)

धनबा [धनपाल] (धणबा पहा)

धनाजी [धनादित्य] (आदित्य पहा)

धनाबाई [धनाका (तरुण स्त्री) = धणाआ = धना] धनाबाई हें नांव मराठ्यांत आहे.

धाकी [धाकः] (धाकू पहा)

धाकू [धाकोऽनड्वान् (उणादि ३२७) हें नांव शूद्रांत फार आहे. धाकः = धाका (की–कें), धाक्या. ममतादर्शक धाकू] (भा. इ. १८३३)

धाक्या [धाकः] (धाकू पहा)

धांदलभट [स्थांडिल्यभट्टः = धांदिलभट = धांदलभट] स्थांडिल्यभट्टः म्हणजे स्थंडिलावर निजणारा तपस्वी. कांहीं नैसर्गिक कामाकरितां बाहेर गेला असतां व्रतार्थ स्थंडिलाकडे परत येण्याची जो घाई करतो तो.

धोंडभट [ढुंढि] (धोंडी पहा)

धोंडी [ढुंढि (गणपति) = धोंडी, धोंडभट, धोंडोपंत (भा. इ. १८३३)

धोंडोपंत [ढुंढि] (धोंडी पहा)

नवु [नर्मदे] (दासींचीं नांवें पहा)

नरद्या [नृशंसः = नरद्या] क्रूर, पापी.

नर्मदे [नर्मदे] (दासींचीं नांवें पहा)
नागरे [नागरिके] („)
नागाजी [नागादित्य] (आदित्य पहा)
नागूबाई [नागा (विशेषनाम) = नागूबाई]
नागेश [नाग + ईश = नागेश अथवा
नाक + ईश = नाकेश = नागेश]
नागोजी [नागादित्य] (आदित्य पहा)
नानबा [ज्ञानदेवः = नानबा, नाना, नानी F.]
नाना १ [ज्ञानदेवः] (नानबा पहा)
–२ [ज्ञानदेव] (नानू पहा)
नानाजी [ज्ञानी = नाना (knowing)]
नानी १ [ज्ञानदेवः] (नानबा पहा)
–२ [नना (आई) = ननी = नानी (स्त्रीनाम)]
(भा. इ. १८३४)
–३ [ज्ञानदेव] (नानू पहा)
नानू १ [ज्ञानदेव = ग्यान किंवा नान (एकशेष).
ममतादर्शक (ग्यानू, नानू)
स्त्रीलिंग (ग्यानी, नानी)] (भा. इ. १८३६)
–२ [ज्ञानदेवः याचा एकशेष = ज्ञानः = नाना, नानू]
नारा [नारद = नारअ = नारा] नारा शब्द नारायणाचा एकशेष आहे च. शिवाय नारद शब्दाचा हि अपभ्रंश आहे. नामदेवाच्या एका पुत्राचें नांव नारा होतें.
निवृत्तीनाथ [निर्वृति beatitude = निवृतीनाथ]
परसाजी, परसोजी [परशुरामादित्य = परस (एकशेष) + जी = परसाजी, परसोजी] (आदित्य पहा)
पांडुरंग [पांडुरांग = पांडुरंग] पांडुरांग असा उच्चार ग्रामजन व देशस्थ कोठें कोठें करतात. (भा. इ. १८३३)
पापा [पापः (संस्कृत पुरुषनाम) = पापा (पुरुषनाम)] (हें नाम सध्यां बाटलेल्या मुसलमानांत आढळतें)
(भा. इ. १८३४)
पिरी [प्रीति = पिरइ = पिरी (स्त्री नाम)]
(भा. इ. १८३३)
पिर्ती [प्रीति = पिर्ति, पिर्ती (स्त्रीनाम)]
(भा. इ. १८३३)
पिऱ्या १ प्रीतक = पिरअअ = पिरा, पिऱ्या (पुरुषनाम)]
(भा. इ. १८३३)
–२ [प्रियः = प्रियू = पिऱ्यू = पिऱ्यो = पिऱ्या (म्हाराचें नांव)]

पुंजा [पुंजराज = पुंजा (एक देश)] हें विशेषनाम खानदेशांत बरेंच आढळतें. (भा. इ. १८३५)
पुलुमायी – हें विशेषनाम शातवाहनवंशांतील राजांच्या नांवांत येतें. पुरुमायी = पुलुमायी. पुरुमायी म्हणजे पुष्कळ माया, लक्ष्मी ज्या जवळ आहे तो, श्रीमान्, धनवान्, लक्ष्मीवान्. पुरूरवस्, पुरुकुत्स, पुलोमन्, पुलुमन्, ह्या विशेषनामांतील आद्यावयव पुरु आहे, असें दिसतें. (भा. इ. १८३३)
पेंदा [वद् १ भाषणे. प्रियंवदः = पिअंवदो = पेंदो = पेंदा] पेंदा हें कृष्णाच्या मित्राचें नांव. (धा. सा. श.)
पेंद्या [उपेंद्रकः = (उलोप) पेंद्या, पेंदा] कृष्णाचा एक खेळगडी.

बगाजी [भगादित्य] (आदित्य पहा)
बगु [भग] (भगु पहा)
बगू [भर्गः = बगू, बगाजी]
बगोजी [भगादित्य] (आदित्य पहा)
बचंभट [वत्स = वच्छ = बचं (भट), बजं (भट)]
बचाजी [वत्स किंवा वर्चस्]
बची [वत्सा (मुलगी) = बाची, बची]
बचू [वासुः] (बाची १ पहा)
बजंभट [वत्स] (बचंभट पहा)
बजरंग [वज्रांग = बजरांग = बजरंग. यांतील आ चा अ झाला] हा शब्द अंजनीपुत्राचा वाचक आहे. (भा. इ. १८३३)
बंड, बंडू [भंड = बंड, बंडू (ममत्वदर्शक)]
बंडोपंत हें नांव मराठींत सामान्य आहे.
(भा. इ. १८३५)
बनशीधर १ [वंशीधर = बनशीधर. वंशी = मुरली]
–२ [वंशीधर (कृष्ण) = बनशीधर, वंशी (कृष्ण) = बनशी. वंशी (स्त्री) वाद्यविशेषः. वंशिन् (पुं.) वंशवाद्य ज्याच्या जवळ आहे तो. (भा. इ. १८३६)
बनी [वनिता = बणिआ = बणी = बनी] मराठींत स्त्रीनाम आहे. (भा. इ. १८३४)
बल्लाळ [मूळशब्द बालराज. त्याचें अपभ्रष्ट रूप बलराज. त्याचें बालल, त्याचें बालळ, त्याचें स्वरव्युत्क्रमानें बलाळ, त्याचें जोरदार बल्लाळ – बाल – बाळ – बाळजी – बाळाजी, बाळोजी. बल्लाळ व बाळाजी हीं दोन्ही रूपें एकाच व्यक्तीचीं वाचक असतात]
(सरस्वतीमंदिर शके १८२६)
बसन्त्ये [वसंतिके] (दासींचीं नांवें पहा)

-बा [पाद = पाअ = वाअ = बा.]
देवपादाः देवपाआ = देववाआ = देवबा.
गणपादाः = गणबा.
गोविंदपादाः = गोंदबा.
हरिपादाः = हरबा.
नारायणपादाः = नारबा.
महादेवपादाः = म्हादबा.
बल्लालपादाः = बाळोबा. इ. इ. इ.]
(भा. इ. १८३५)

बाची १ [वासूः (a young girl) = बाची, बचू]
-२ [वत्सा] (बची पहा)

बाचू [वासू = बाचू (पुत्रीनाम)] वासू म्हणजे मुलगी.

बाजीराव - इ. स. १२४१ त बाचीराज कर्नाटकांत अधिकारी होता. च चा ज होऊन बाजीराव हें आधुनिक नांव निष्पन्न झालें. (भा. इ. १८३२)

बाबण- [पाप्मन् = पापण = वावण = बाबण (विशेषनाम)] (शब्द-आबण बाबण पहा)

बामनजी [वामनादित्य] (आदित्य पहा)

बामह [मन्मथ] (मम्मट पहा)

बालाजी [बालादित्य] (आदित्य पहा)

बास [वयस्य = वअस्स = बास्स = बास = बाह = बा] विठ्ठलबास, कान्हबास वगैरे नांवें मानभावग्रंथकारांत फार. ह्या नांवांतील बास हा शब्द संस्कृत वयस्य शब्दापासून निघाला आहे व त्याचा अर्थ Companion, associate असा आहे.
मराठींत गणबा, गोंदबा, वासबा वगैरे शब्दांतील बा हा अवयव हि ह्या संस्कृत वयस्य शब्दापासूनच निघालेला आहे.
(भा. इ. १८३४)

बाळ [बाल] (स. मं. शके १८२७)

बाळक्या-की-क [बालक] (बाळा पहा)

बाळभट [बाल + भट = बाळभट] (भा. इ. १८३४)

बाळंभट [बल्हण = बल्लण = बाळण = बाळम्. बाळम् + भट = बाळंभट] बाळ म्हणजे मुलगा ह्या शब्दाशीं कांहींएक संबंध नाहीं. (भा. इ. १८३४)

बाळा-ळी-ळ [बालक = बाळअ = बाळा-ळी-ळ, बाळक्या-की-क] (स. मं. गोतवळा शके १८२७)

बाळाजी १ [बालराज] (बल्लाळ पहा)
-२ [बालादित्य] (आदित्य पहा)

बाळोजी [बालादित्य] ,,

बिकर्मजी [विक्रमादित्य] ,,

बिजे [विजये] (दासींचीं नांवें पहा)

बिजेसिंग [विजितसिंह = बिजेसिंग] (भा. इ १८३५)

बिजेसेन [विजितसेन] (विजेसेन पहा)

बिर्जा [वीर्या = बिर्जा (स्त्री नाम). कारंडव्यूह नागकन्यानामानि] (भा. इ. १८३४)

बिर्जे [विराजिके] (दासींचीं नांवें पहा)

बिळंभट [बिल्हण = बिल्लण = बिळम्.
बिळम् + भट = बिळंभट] (भा. इ. १८३४)

भगु [(भाई, विशेषनाम). भग = (पुं.) भगु, बगु] (भा. इ. १८३४)

भटंभट [बृहत्तम = भत्तम = भट्टम = भट्टम्.
भटम् + भट = भटंभट] (भा. इ. १८३४)

भलंदन - भलंदन हें एका ऋषीचें व गोत्राचें नांव आहे. भलंदन म्हणजे मराठींत अगडबंब पुरुष. (भा. इ.१८३४)

भागी १ [भागीरथी = भागी (स्त्री) (एकशेष)] (भा. इ. १८३४)
-२ भागधेयी (संस्कृत स्त्रीनाम) = भागी (धेय गळालें) स्त्रीनाम. (भा. इ. १८३४)

भामह [मन्मथ] (मम्मट पहा)

भिउजी [भीमादित्य] (आदित्य पहा)

भिकंभट [भीष्म = भीख्म = भिकम्.
भिकम् + भट = भिकंभट] (भा. इ.१८३४)

भिकम [विक्रमः = विक्कम = भिकम (शेट, भट)]

भिकमशेट [विक्रमश्रेष्ठिन् = विक्कमसेट्ठि = बिक्कमसेट = = भिक्कमशेट]

भिकाजी [भैक्ष्याजीव = भिक्खाजीअ = भिकाजी] begger. हे भिकाजी आले here comes the beggary fellow.

भिकुभट [भिक्षु = भिख्खु = भिकु] (भा. इ. १८३४)

भिमाजी, भिमोजी [भीमादित्य] (आदित्य पहा)

भीम [बिंब = भिंब (अर्धमागधी) = भीम] ठाण्याच्या बिंबदेवाला भीमदेव असें हि म्हणतात. (भा. इ. १८३२

भुंगे [भृंगारधारिणि] (दासींचीं नांवें पहा

मकाजी [मांकि = मक (मकाजी) मंख = मक (मकाजी)]

मंगे [मातंगिके] (दासींचीं नांवें पहा)

मंगळे [मंगलिके] ,,

मंजुळे [मंजुलिके] ,,

मढरी (पुत्र) [माठर (गोत्रनाम) माठरी (स्त्री) = माढरी = मढरी. वासिष्ठीपुत्र, गौतमीपुत्र, मढरीपुत्र, हीं नांवें शातवाहनांच्या वंशांत येतात. माठरक हें विदूषकादींचें नांव संस्कृत नाटकांत येतें. माठरोस्मि गोत्रेण (पतंजलि, महाभाष्य, Vol. I, P. 452 Kielhorn) (भा. इ. १८३३)

मध्व – मध्वाचार्य हा समास मधु + आचार्य किंवा मध्व + आचार्य असा दोन प्रकारांनीं सोडवितां येतो. म्हणजे द्वैतसंस्थापकाचें नांव मधु व मध्व असें दोन प्रकारचें असावें, असा निष्पाद होतो. मधु या शब्दाचा अर्थ गोड (विशेषण) व मध (नाम) असा आहे. (मध्व) मध्वक या शब्दाचा अर्थ भुंगा असा आहे. मधु हें संस्कृतांत देवदैत्य व मानव यांचें नांव आढळतें. मध्व हें नांव संस्कृतांत मनुष्याचें मध्वाचार्य ह्या समासाखेरीज इतरत्र कोठें आलेलें मला माहीत नाहीं. तेव्हां, प्रश्न असा उद्भवतो कीं, ह्या द्वैताचार्यांचें मूळ नांव मध्व कां मधु ? दोन्ही नांवें एका च व्यक्तीचीं असूं शकणार नाहींत. एक मधु तरी मूळ नांव असेल किंवा मध्व तरी असेल. मधु हें जर मूळ नांव असतें, तर त्यापासून तद्धित शब्द माधव असा होता. पण माधवमत असें कोणी म्हणत नाहीं. मध्वमत असा बोलण्याचा व लिहिण्याचा प्रचार आहे. सबब, द्वैताचार्यांचें मूळ नांव मध्व होतें, हा पक्ष खरा मानावा लागतो. मध्वक म्हणजे षट्पद, भुंगा, मध गोळा करणारा. परंतु मध्वक म्हणजे कांहीं मध्व नव्हे. मधु + अक = मध्वक, असा जर विग्रह असेल, तर मध्वक हा मूळ शब्द होईल, मध्व होणार नाहीं. मध्व हा शब्द अपभ्रंश म्हणावा लागेल. मध्व असा स्वतंत्र शब्द संस्कृतांत मध्वाचार्यांच्या पूर्वी नाहीं. तेव्हां एक च तोड रहाते. मध्व हा मध्वक शब्दाचा अपभ्रंश आहे. तात्पर्य, मध्व हा एका प्रकारचा प्राकृत शब्द आहे, असें म्हणावें लागतें. मध्वाचार्य फार विख्यात पुरुष झाला, त्यामुळें मध्व हा प्राकृत शब्द स्वतंत्र संस्कृत विशेषनाम म्हणून योजिला जाऊं लागला इतकें च. (भा. इ. १८३५)

मनसाराम १ [मनसा हें सापाच्या विषापासून संरक्षण करणाऱ्या देवीचें नांव.

दुर्गाराम, सीताराम, तसा मनसाराम.

मनसाराम हें मराठी विशेषनाम आहे.] (भा. इ. १८३६)

–२ [मनसः संज्ञायां (६–३–४) ह्या सूत्राप्रमाणें मनसा + राम = मनसाराम हा तृतीया अलुक् समास आहे] कांहीं वर्षांपूर्वी आज मनसाराम हें नांव पुण्यांत वरें च ऐकूं येत असे. (भा. इ. १८३६)

–३ [मनीषारामः (मनीषा + आरामः) = मनसाराम]

मनाई [मनायी (मनोःस्त्री) = मनाई = मनी (स्त्रीनाम). मनावी (मनोः स्त्री) = मनाउई = मनू] (भा. इ. १८३४)

मनी १ [मनसा = मणहा = मणी = मनी, मनु. (कारंडव्यूह किन्नरकन्यानामानि)] (भा. इ. १८३४)

–२ [मनावी, मनायी (मनुचें स्त्रीलिंग) = मनी]

मनु [मनसा] (मनी १ पहा)

मनू [मनावी] (मनाई पहा)

ममती [ममता (स्त्रीनाम) = ममती] ममती हें नांव शूद्रांत फार. (भा. इ. १८३३)

मम्मट – मन्मथ ह्या शब्दाचें अपभ्रंशांत वम्मह असें रूप होतें. व चा व होऊन वम्मह आणि म्म च्या दैर्घ्यामुळें व चा वा होऊन वामह. वामह ह्या प्राकृतिक शब्दाचें संस्कृत संस्करण भामह. मन्मथ ह्याच शब्दाचें न्म चें म्म व थ चें ट होऊन मम्मट.

प्राकृतिक म्हणजे मराठी वगैरे भाषा सुरू झाल्यावर हे दोघे ग्रंथकार झालेले आहेत, हें पाहिलें म्हणजे मम्मट व भामह हीं नांवें प्राकृतिक आहेत, हें तेव्हांच ओळखतां येतें. (भा. इ. १८३२)

मयु–१ " The earliest of these Indo-Parthian kings apparently was Maues or Mauas who obtained power in the Kabul valley and Panjab about 120 B. C., and adopted the title of Great king of Kings ".

ह्याप्रमाणें Vincent Smith (Early History of India, P. 202 First Edition), Maues हा कदाचित् Indo-Parthian वंशाचा राजा असावासा दिसतो, असें लिहितो. तात्पर्य, Maues Indo-Parthian असावा किं नसावा ह्या बद्दल इतिहासकारांस संशय आहे. Maues हा Indo-Parthian वंशाचा नाहीं, हें सिद्ध करण्यास मजजवळ कांहीं सामग्री जुळली आहे, ती इतिहासज्ञांच्या पुढें मांडण्याची परवानगी घेतों.

२ विष्णुपुराण–चतुर्थांश–अध्याय २४–अंक–१३:—

" ततश्चाष्टौ यवनाः चतुर्दश तुषाराः मुंडाश्च त्रयोदश एकादश मौनाः । "

असें वाक्य आहे. ह्यांत मौनाः म्हणून जो शब्द आहे तो व Maues हा शब्द एक च आहेत, असें मी म्हणतों.

३ अमरकोश- प्रथम कांड- स्वर्गवर्ग- ७२

" स्यात् किंनरः किंपुरुषस्तुरंगवदनोमयुः "

या श्लोकांतील मयुः हा शब्द व नाण्यांवरील Maues शब्द एक आहेत. Maues या अक्षरांचा उच्चार मयुस् अथवा मयुः- मयुस् हा किंनरवाचक शब्द आहे, म्हणून अमरसिंह सांगतो. तें जर खरें असेल, तर Maues हा राजा किंनरवंशीय होता, व Indo-Parthian नव्हता, असें म्हणावें लागतें.

४ विष्णुपुराणांत अकरा मौनांनीं राज्य केलें, असें सांगितलें आहे. Vincent Smith मयूंची याद येणेंप्रमाणें देतोः--

(1) Maues. (2) Onones. (3) Azes I (4) Azilises. (5) Azes II (6) Gondophares or Guduphara. (7) Abdagases. (8) Orthagnes (9) Arsakes. (10) Pakores. (11) Sanabares.

Vincent Smith हि विष्णुपुराणांतल्या प्रमाणें च अकरा मयूंनीं राज्य केलें, असें हिंदू व यूरोपीयन शोधकांच्या शोधांवरून म्हणतो. अर्थात् विष्णुपुराणांतील मौन म्हणजे युरोपीयन शोधकांचे व अमरसिंहाचे मयू होत ह्यांत संशय नाहीं. मयु पासून मौन हा अपभ्रंश असा निष्पन्न होतो. मयु तील यु चा उच्चार सानुनासिक होत असावा.

मयुँ = मऊँ = मउन = मौन

अनुनासिकाचा न असा उच्चार होतो. मयुन, मउन अशा परंपरेनें मौन असें अपभ्रष्ट रूप साधलेलें आहे व तें च विष्णुपुराणकर्त्यानें स्वीकारलेलें आहे. अमरसिंहानें मूळ मयु असें शुद्ध रूप दिलेलें आहे.

५ हे मयु ऊर्फ किंनर लोक अलकेस राहणाऱ्या किन्नराधिपतीचे म्हणजे कुबेराचे परिचारक होत. अलका हें नगर काश्मीराच्या उत्तरेस आहे. ह्या प्रदेशाच्या शेजारीं च पश्चिम दिशेस किंपुरुषवर्ष आहे. किंपुरुषवर्ष म्हणजे किन्नरांचा देश जंबुद्वीपाचा एक भाग आहे. मौर्यांचें राज्य बुडाल्यानंतर जो गोंधळ उडाला व जी बजबजपुरी माजली त्या कालांत कुबेराच्या ह्या मयु नामक परिचारकांनीं काबुल व पंजाब या दोन प्रदेशांत कांहीं काल आपली सत्ता उभारली.

६ तात्पर्य Maues ऊर्फ मयु वंशांतील राजे किन्नरजातीय होते, Indo-Parthian ऊर्फ पारदजातीय नव्हते, असें निश्चयानें म्हणतां येतें. (भा. इ. १८३५)

मऱ्या १ [मर्यः a young man = मऱ्या (शूद्रनाम)]

-२ [मर्य a young man = मऱ्या] a name of a man.

मानाजी, मानोजी [मानादित्य] (आदित्य पहा)

मायण [मात्रज्ञ] (सायण पहा),

मिरा (बाई) [मिहिरा (मिहिर शब्दाचें स्त्रीलिंग) मिहिर हें पुरुषनाम आहे. मिहिरा = मिइरा = मिरा (बाई)] (भा. इ. १८३३)

मिशरा [मसूरिका = मिशूरिआ = मिशरा (नायकिणीचें नांव)] मसूरिका म्हणजे पण्यस्त्रियांची मुख्य. मिशरा नायकीण पुण्यांत प्रसिद्ध होती. (भा. इ. १८३७)

मुक्ता, मुक्ती - हें स्त्रीनाम शूद्रांत आढळतें. बंधकी कुलटा मुक्ता (३५ धनंजयकोश)] कुटुंबांतून सुटलेली जी स्त्री ती मुक्ता, मुक्ती. (भा. इ. १८३३)

मुक्त्ये [मुक्तिके] (दासींचीं नांवें पहा)

मुधोपंत [मुग्धपंडितः = मुधोपंत]

मेनके [मेनके] (दासींचीं नांवें पहा)

मैना १ [मदनिका = मयनिआ = मैनी, मैना] स्त्रियांचें नांव आहे.

-२ [मेनका = मेणआ = मेणा = मैना] मैनाबाई म्हणजे मेनकाबाई.

मैनाबाई [मेना अथवा मेनका = मेणआ = मेणा = मेना = मैना] मैणाबाई, मेणाबाई असेहि उच्चार करतात. मैनानामक पाखराशीं कांहीं संबंध नाहीं. (भा. इ. १८३६)

मैनी [मदनिका] (मैना १ पहा)

मोरबा [मयूरपाल] (धणबा पहा)

यमी [यमुना = यमू, यमी (एकशेष)] (भा. इ. १८३६)

यमू [यमुना] (यमी पहा)

युधि - षत्वप्रक्रियेंत गवियुधिभ्यां स्थिरः (८-३-९५) हें सूत्र पाणिनि देतो. हलदन्तात् सप्तम्याः संज्ञायां (६-३-९) या सूत्राखालीं कांहीं पाणिनीनें गवियुधिभ्यां स्थिरः हें सूत्र दिलें नाहीं. म्हणजे गवि व युधि ह्या गो व युध् या शब्दांच्या सप्तम्या कांहीं पाणिनि गवियुधिभ्यां स्थिरः या सूत्रांत समजत नाहीं. गवि व युधि हीं पाणिनिमतें प्रातिपदिकें आहेत. गव्यूति व युधिंगम या समासांत गवि व युधि हे शब्द प्रातिपदिक असलेले स्पष्ट दिसतात. सबब गवि व युधि ह्या सप्तम्या घेऊन गविष्ठिर व युधिष्ठिर हे समास अलुक्समासांत काढण्याचें कारण नाहीं. (भा. इ. १८३६)

येशी [यशोदा = येशी, येसू (एकशेष)] (भा. इ. १८३६)

येसू [यशोदा] (येशी पहा)

रघाजी, रघुजी, रघोजी [रघुनाथादित्य] (आदित्य पहा)

रंभाजी [रंभ (वानराचें नांव) जित् = रंभाजी]

राउजी, राजाजी [राजादित्य] (आदित्य पहा)

रामा [अनुदात्तं प्रश्नान्ताभिपूजितयोः (पाणिनि ८-२-१००) अगमः पूर्वान् ग्रामान् राम ३ अ = रामा (आ Vocative)] मराठींत संबोधन अकारांत शब्दाचें प्लुत होऊन होतें.

रामाजी [रामादित्य] (आदित्य पहा)

रामानुज [रामानुजः मुख्यः एषां ते रामानुजकाः रामानुजकाः = रामानुज]
तो रामानुज आहे म्हणजे रामानुजाचा अनुयायी आहे.

रामोजी [रामादित्य] (आदित्य पहा)

रावत्या [रेवत्याः अपत्यं पुमान् रैवतिकः. रैवतिक = रैवतिअ = रैवत्या = रावत्या (शूद्रनाम)] (भा. इ. १८३४)

राही [राधा = राहा. राधी = राही]
राही हें नांव कुणब्यांत फार. (सरस्वतीमंदिर शके १८२६)

रुई [रोहिणि] (दासींचीं नांवें पहा)

रुप्या [रूप्यः = रुप्या (मूलार्थ सुंदर) मारवाडी पुरुषाचें नांव)] (भा. इ, १८३४)

रूपीबाई [रुक्मिणी = रुप्पि = रूपी]

लखजी [लक्ष्मणादित्य] (आदित्य पहा)

लखणशेट (लक्ष्मण = लख्खण = लखण] लखणशेट व शिरळशेट या शब्दांचा अर्थ एकच. (भा. इ. १८३४)

लखभट [लक्ष = लख्ख = लख. लख + भट = लखभट] लख्या, लखु, लखया वगैरे अपभ्रंश आहेत. (भा. इ. १८३४)

लखंभट [लक्ष्मण = लखण् = लखम्. लखम् + भट = लखंभट] (भा. इ. १८३४)

लखमल [रक्षामल्ल = रखमल, लखमल] (भा. इ. १८३६)

लखाजी, लखुजी [लक्ष्मणादित्य] (आदित्य पहा)

लल्लू [ललित = ललिअ = लल्य = लल्ल = लल्लू] लल्लूचा मूळ अर्थ सुंदर. त्यावरुन विशेषनाम. (ग्रंथमाला)

लाडी १ [लडहा (सुंदर) = लाडी (स्त्रीनाम)] (भा. इ. १८३४)

-२ [लटह] (लाडू पहा)

लाडू [लटह beautiful = लाडू, लाडीबाई]

लुकजी [लक्ष्मणादित्य] (आदित्य पहा)

लोलिंवराज [लोलंब (भ्रमर) = लोलंब = लोलिंव विशेषनाम) व = इ]

लोलू [लोहलः (अस्फुटवादी) = लोलू] लोलू अण्णा हें मराठींत विशेषनाम झालें आहे. अस्फुट बोलणाऱ्या मुलाला प्रथम प्रथम लोलू म्हणत.

वच्छे [वत्सिके] (दासींचीं नांवें पहा)

वाघूजी, वाघोजी [व्याघ्रादित्य] (आदित्य पहा)

वामनाजी, वामनोजी [वामनादित्य] (आदित्य पहा)

वारी [वर्या (स्वयंवरा बाला) = कन्या = वारी] वारी हें मराठींत स्त्रीविशेषनाम आहे. (भा. इ. १८३२)

वाली, वालू, वाल्ही [वाल्मीका = वाल्ही, वाली] वाली, वाल्ही, वालू हीं मराठींत स्त्रीनामें आहेत.

वाल्ह्या [वाल्मीकिकः = वाल्हीइआ = वाल्हीआ = वाल्ह्या] वाल्ह्या कोळी विशेषनाम.

विजेसेन [विजितसेन = विजियसेन = विजसेन, विजेसेन] (भा. इ. १८३५)

विष्णाजी, विष्ण्याजी [विष्ण्वादित्य] (आदित्य पहा)

विसाजी, विसोजी [विश्वनाथादित्य] (आदित्य पहा)

वीठु-सीयडोणी शिलालेखाच्या ४ थ्या व २७ व्या ओळींत वीठु हा शब्द आलेला आहे. म्हणजे हा शब्द शक ८७३ त प्रचलित होता. विष्णूचीं म्हणजे वीठूचीं देवळेंही होतीं. अर्थात्, पुंडलिकानें पंढरीस वीठूचें प्रतिष्ठापन करण्याच्या अगोदर निदान नर्मदेच्या उत्तरेस वीठूचीं देवळें असत; व त्या देवळांला सर्व जातीचे लोक देणग्या देत.
(सरस्वती मंदिर-संकीर्ण लेख)

शंकराजी, शंकरोजी [शंकरादित्य] (आदित्य पहा)

शवरे [शवरिके] (दासींचीं नांवें पहा)

शाम्या [शर्मन् = शाम्या] (भा. इ. १८३४)

शिउजी [शिवादित्य] (आदित्य पहा)

शिदू, शिदोजी, शिदोबा [सिद्ध = शिद, शिदू. सिदनाथवाडी, सिदोपंत, सिदनाथ, शिदोबा, शिदोजी इ इ.] (भा. इ. १८३३)

शिरळशेट-शिराळशेट [श्रीलश्रेष्ठिः = शिरळशेट = शिराळशेट] शिराळशेट म्हणजे धनाढ्य शेट. श्रील हें विशेषनामहि आहे. सामान्यनामहि आहे. (भा. इ. १८३४)

शिवाजी [शिवादित्य] (आदित्य पहा)

शेवंते [सीमंतिनि] (दासींचीं नांवें पहा)

सई [सती = सई. सईबाई = सती] (भा. इ. १८३४)

सखुली (ममत्वदर्शक) - ला - लें [सखी शब्दाचें ममत्वदर्शक सखु. सखु + ल = सखुल (ला-ली-लें)] (भा. इ. १८३४)

सगुण [सुगण् = सगुण] आत्माराम सगुण ह्यांतील सगुण शब्द सुगण् शब्दाचा अपभ्रंश आहे. (भा. इ.१८३६)

संतीदास [शांतिदास = संतिदास, संतीदास. शांति चें प्राकृतांत संति होतें] संतीदास हा एक मराठी ग्रंथकार झाला.

सबरे [शबरिके] (दासींचीं नांवें पहा)

संभाजी [शंभ्वादित्य] (आदित्य पहा)

संभू [स्वयंभू = सअअंभू = संभू. शंभु = संभू]

संभूजी [शंभ्वादित्य] (आदित्य पहा)

सयाजी [सह्यः = सय्या किंवा सखि = सया] बहुमानार्थी सय्याजी किंवा सयाजी. तात्पर्य सयाजी हा शब्द संस्कृत सह्य किंवा सखि ह्या दोन शब्दांपासून मराठींत आला आहे. (भा. इ. १८३४)

सवरे [शबरिके] (दासींचीं नांवें पहा)

सायण - मात्रज्ञ ह्या संस्कृत शब्दाचें मात्तन्न असें प्राकृत रूप होतें. त्याचें प्राकृतिक रूप मायण्ण. त्याचें मायण. तसेंच सर्वज्ञ ह्याचें सायण.

सायण व मायण हे दोन्ही शब्द प्राकृतिक आहेत. द्राविडी प्राकृतापासून द्राविडी प्राकृतिक. सायणाचार्य प्राकृतिक भाषा सुरू झाल्यावर झाले. (भा. इ. १८३२)

साळू [चारु = साळु, साळू, साळू म्हणजे सुंदर. साळू विशेषनाम] (भा. इ. १८३६)

सिद्नाथ, सिदोपंत [सिद्ध] (शिदू पहा)

सुंदरे [सुंदरि] (दासींचीं नांवें पहा)

सुनरी [सूनरी] (सूनरी पहा)

सुपडू, सुपडोजी १ [सुप्रतीक (मदन) = सुपडू, सुपडोजी (व्यक्तिनाम)]

सुपडोजी २ [सुभद्र, सुपर्ण]

-३ [सुप्रतिवर्मन् = सुपडोजी, सुपडू (शूद्रनाम)]

सुबराव [सुभ्रूक = सुब्रूअ = सुब्राव = सुबराव] ज्याच्या भिंवया सुंदर आहेत तो सुब्राव. मराठींत व्यक्तिनाम झालें आहे.

सुभद्रे [सुभद्रे] (दासींचीं नांवें पहा)

सूनरी [सूनरी (वैदिक) = सुनरी, सूनरी (स्त्रीनाम)] सुंदरी निराळी. (भा. इ. १८३३)

सूर्योजी [सूर्यादित्य] (आदित्य पहा)

सोनी [सुस्नाता = सुण्हाआ = सोण्ही = सोन्ही = सोनी किंवा सुवर्णा = सुअण्णा = सोण्णा = सोणी - सोनी (बालिकानाम)] (भा. इ. १८३४)

सोनू [सुतनु = सोनू (स्त्रीनाम)]

सोनूबाई [सुतनु = सुअणु = सोनू]

सोम्या [सौम्यक = सोम्या] आयुष्मान् भव सौम्य । असा आशीर्वाद संस्कृतांत प्राचीन कालीं देत. कोणाला ही सौम्य म्हणत. ह्या सौम्य शब्दापासून मराठी सोम्या शब्द निघाला आहे. (भा. इ. १८३४)

सोसपार्वती [सो, सोस् name of पार्वती = सोसपार्वती]

हजारीमल्ल [सहस्रमल्लः = हहजरमल्ल = हजारमल्ल = हजारीमल्ल] मारवाड्यांत नांव आहे.

हमजू, हमजा [अहंयु (लढवय्या) = हंजू = हमजू हमजा] हमजा हें नांव मुसलमानांत आहे पण तें संस्कृतोत्पन्न आहे. (भा. इ. १८३४)

हरणी [हरेणु र्ना सतीने स्त्री रेणुकाकुलयोषितोः (मेदिनी) हरेणु = हरणी] स्त्रीनाम. (भा. इ. १८३३)

हंसे [कलहंसि = हंसे (एकशेप)] (दासींचीं नांवें पहा)

हातमल [हस्तिमल्ल (गणपति) = हातमल] वाण्यांत नांव आहे.

हैबत [अहीवत् = हैबत (राव)] पुरुषनाम मराठ्यांत. (भा. इ. १८३४)

होणम्या [सुवर्णमयः = होणम्या] हें विशेषनाम आहे. होणम्या ! = रे सुवर्णमय !

हौशी [हंसी = हौशी (स्त्रीनाम)]

३ उपनाम–व्युत्पत्ति–कोश

अल्प विवेचन

कै. राजवाडे यांचे, उपनाम अगर आडनांव यांच्या व्युत्पत्ती-विषयीं विवेचनात्मक लेख भारत इतिहास संशोधक मंडळाचें शके १८३५ सालचें इतिवृत्त आणि भा. इ. सं. मंडळाचें शके १८३५ सालचें 'प्रथम संमेलन वृत्त' यांमध्यें प्रसिद्ध झालेले आहेत. पुढील कोशांत राजवाड्यांनीं आडनांवांच्या दिलेल्या व्युत्पत्ति कितपत सशास्त्रीय व समर्पक आहेत हें ठरविण्यास या कोशासोबतच हे लेख छापणें युक्त वाटल्यावरून ते या कोशाच्या सुरवातीसच छापले आहेत.

भा. इ. सं. मं. चें इतिवृत्त यांतील लेख

आडनांव–पर्वां सिन्नरास मला एक बेपारी साक्षर लाड-वंजारी भेटला. त्याच्या बोलण्यांत कुलनाम अथवा आडनांव या शब्दाऐवजीं गोत्र हा शब्द वारंवार आला. म्हणजे ज्याला आपण आडनांव किंवा कुलनाम म्हणतों त्याला तो गोत्र म्हणे. अपत्यप्रभृति गोत्र, ह्या पाणिनीय सूत्राला अनुसरून तो बोलल्यासारखा दिसला. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, त्याला पाणिनीय सूत्र माहीत होतें. अर्थ इतकाच कीं, त्याच्या जातींत पाणिनीनें नमूद केलेला संप्रदाय पूर्वापार प्रचलित होता. हा संप्रदाय म्हणजे गोत्रनामाला कुलनाम समजण्याचा प्रघात भारतवर्षांत फार प्राचीन आहे. हर्षचरितावर व्याख्या करणारा शंकर ह्या प्रघाताचा उपयोग करितो. उदाहरणार्थ–

। अनार्यः पुष्पमित्रः मौर्यंबृहद्रथंपिपेष
(हर्षचरित–षष्ठः उच्छ्वासः)

यावर शंकर अशी व्याख्या करितो.

मौर्य इति गोत्रनाम ।

तात्पर्य, गोत्रनाम म्हणजे कुलनाम ऊर्फ आडनांव.

प्रथम संमेलन वृत्तांतील लेख

भारतीय आर्यवंश

गोत्रें ब्राह्मणादींचीं

१ अपत्यं पौत्रप्रभृति गोत्रं (४–१–१६२) असें गोत्राचें लक्षण पाणिनीनें केलें आहे. सूत्रांतील प्रवराध्यायप्रसिद्ध जीं गोत्रें व प्रवराध्यायाप्रसिद्ध जीं गोत्रें त्या दोन्हींचा अंतर्भाव ह्या पाणिनिप्रोक्त गोत्रशब्दांत होतो असें म्हणतात. नातू आदिकरून जें अपत्य तें गोत्र होय. पुत्रादि जें अनंतरापत्य तें पाणिनीयमतें गोत्र नव्हे. उदाहरणार्थ कुंज हें ऋषिनाम घेतलें, तर अनन्तरापत्यार्थी कौंजि असा तद्धितशब्द साधतो; परंतु पौत्रादि गोत्रार्थक कौंजायन असा तद्धितशब्द होतो. कौंजि हा पुत्र व कौंजायन हे नातवापासून पुढले सर्व वंश्य. एको गोत्रे (४–१–९३) गोत्र विवक्षित असतां अपत्यप्रत्यय एक च होतो. मग शंभर पिढ्या कां होत ना. नाहीं तर फक् व इञ् ह्या प्रत्ययांची परंपरा सुरू होऊन ९९ प्रत्यय होऊं लागतील व अव्यवस्थाप्रसंग गुदरेल, म्हणजे कुंज हें ऋषिनाम घेतलें तर नातवापासून पुढें शंभर दोनशें पिढ्यांपर्यंत जेवढें म्हणून अपत्य होईल तेवढें सर्व गोत्रार्थी कौंजायनसंज्ञक होईल, अशी व्यवस्था पाणिनिकालीं असे. पुत्रार्थक रूपें निराळीं व गोत्रार्थकरूपें निराळीं. आश्वलायन, बौधायन वगैरे जे सूत्रकार झाले त्यांनीं गोत्राचें लक्षण असें केलें आहे :—

। विश्वामित्रो जमदग्निर्भरद्वाजोऽथ गोतमः अत्रिर्वसिष्टः कश्यप इत्येते सप्त ऋषयः। सप्तानामृषीणां अगस्त्याष्टमानां यदपत्यं तद्गोत्रमित्याचक्षते । इति बौधायनः । म्हणजे अगस्त्यासह आठ ऋषींचें जें अपत्य तें गोत्र होय असें बौधायन म्हणतो. बौधायन ऋषींच्या पुत्रादि सर्व अपत्याला गोत्र ही संज्ञा लावतो; स्वतः ऋषींना गोत्र ही संज्ञा लावीत नाहीं, किंवा पुत्राला वगळून नातवापासून च तेवढें गोत्र सुरू होतें असें म्हणत नाहीं. हा शेवटला प्रपंच पाणिनि करतो. पाणिनि सतरींचें अपत्य चें

ऋषीणाचें अपत्य याचा निर्बंध करीत नाहीं. बौधायन सप्तर्षीचें अपत्य म्हणून निर्बंध करतो. बौधायनादींचें हें लक्षण केवळ सामान्य असून सैल आहे. उदाहरणार्थ, खुद्द बौधायन हा शब्द गोत्रार्थक आहे. मूळपुरुष बुध-त्याचें अनन्तरापत्य बौधिः व गोत्रापत्य म्हणजे पौत्रादि अपत्य बौधायन. अशी बोलण्याची रीति बौधायनाच्या वेळीं होती. परंतु, शास्त्रीय लक्षण करतांना ती रीति लक्षांत न घेऊन, आठ ऋषींचें जें अपत्य तें गोत्रसंज्ञक होय असें सैल, अव्याप्त व अतिव्याप्त लक्षण बौधायनानें केलें आहे.

२ मूळ आठ ऋषि. अर्थात् ह्या मूळ ऋषींना गोत्रनामें नव्हतीं. ह्यांना पुढें प्रजा झाली. ह्या प्रजेला हि प्रप्रजा झाली व वंशविस्तार होऊन, वंशांत कित्येक प्रख्यात पुरुष उदयास आले. त्यांचे नातू वगैरे त्या त्या प्रख्यात पुरुषाचें नांव आपल्या व्यक्तिनामापुढें लावूं लागले. त्यामुळें असंख्य गोत्रें उत्पन्न झालीं. गोत्रें यद्यपि असंख्य झालीं, तत्रापि कोणत्या गोत्राचे कोण कोण पूर्वज यांची ओळख त्या त्या गोत्राला होती. ह्याचें कारण असें कीं, नित्यनैमित्तिक कर्मांत यजमानाला आर्षाचें प्रवरण अग्नीला उद्देशून करावें लागे. आर्ष म्हणजे अष्ट ऋषींचें अपत्य. त्या अपत्यांचें जें क्रमानें नामसंकीर्तन त्यांचें नांव प्रवरण. अमुतोऽर्वाञ्चो होता । अमुतो मूलभूतादृषेरारभ्यार्वाञ्चोऽर्वाग्जातान्मंत्रद्दशः क्रमेण तदपत्यसंबंधेन प्रार्थयते तममिम् । मूळ ऋषींपासून पुढें झालेले जे मंत्रद्रष्टे त्यांचें अग्नीकरितां जें नामसंकीर्तन तें प्रवरण. हें प्रवरण अग्नीसंबंधानें करावें लागल्यामुळें व अग्नीचें आराधन हें भारतीय आर्यांचें मुख्य कर्म पडल्यामुळें आर्ष प्रवरांची ओळख भारतीय आर्यांना रोज होत असे व आहे. गोत्रें जेव्हां असंख्य झालीं तेव्हां कोणाचे कोण हें ओळखण्याकरितां प्रवरांची मोजणी करावी लागली. ती सुमारें ४९ भरली. द्व्यामुष्यायण घेतले तर दोन चार प्रवर अधिक होतील. कित्येक दहा पांच प्रवर अधिक हि मानीत; परंतु, बौधायनकालीं ४९ प्रवर मानण्याची चाल पडली. तात्पर्य, असंख्य गोत्रें, ४९ प्रवर व ८ ऋषी अशी परंपरा उत्पन्न झाली.

३ गोत्रांचें हें वर्गीकरण दुसऱ्या एका प्रयोजनास्तव हि करणें प्राप्त होतें. भारतीय आर्यांत बहिणभावांचे विवाह इष्ट नाहींत; दैत्यासुरांत आहेत. एका च ऋषीपासून, एकाच पूर्वजापासून जीं स्त्रीपुरुषें निपजलीं त्यांचे शरीरसंबंध अशास्त्र समजण्याची चाल भारतीय आर्यांत फार पुरातनकालापासूनची आहे. गोत्रें जेव्हां असंख्य झालीं, तेव्हां कोण कुल कोणत्या दुसऱ्या कुलांचें सगोत्र आहे व सार्ष ऊर्फ सप्रवर आहे, हें निश्चित मापन करणें जरूर पडलें. कारण समानगोत्र व समानार्ष कुळांत शरीरसंबंध झाला असतां तो व्यभिचार होतो, अशी दृढ समजूत व शास्त्र असे. शास्त्रें व पुस्तकें व ग्रंथ झाल्यावर, हा प्रघात दृढ झाला असें मात्र बिलकुल समजूं नये. प्रघात शास्त्रांच्या व ग्रंथांच्या फार पूर्वीपासूनचा आहे. प्रत्येक ब्राह्मणाला अग्नीचें उपासन करावें लागे. तेव्हां प्रवरांचें संख्यापन आपोआप च होई. समजा कीं कोणी ब्राह्मण जामदग्न्य-वत्स-गोत्री आहे. तर त्याचे पंचार्षेय भार्गव, च्यावन, आप्नवान, और्व व जामदग्न्य हे होत; व तो जमदग्नीप्रमाणें, उर्वाप्रमाणें, अप्नवानाप्रमाणें, च्यवनाप्रमाणें व भृगूप्रमाणें अग्नीची प्रार्थना म्हणजे वरण करी. जामदग्न्या वत्सास्तेषां पंचार्षेयो भार्गवच्यावनाप्नवानौर्वजामदग्न्येति जमदग्निवदुर्ववदप्नवानवच्च्यवनवद्भृगुवदिति बौधायनः । यजमानादूर्ध्वान् मंत्रद्दग्भिरव्यवहितानां मूलभूतान् दृष्टक्रमेण संकीर्त्य तद्वत्तद्वदिति सादृश्यसंबंधेन अग्निं वृणीते प्रार्थयत इत्यर्थः । गोपीनाथदीक्षित ओक. होता अनुलोम संकीर्तन करी व अध्वर्यु प्रतिलोम संकीर्तन करी. तेव्हां अर्थात् च मूळ गोत्रप्रवर्तक व प्रवरप्रवर्तक यांचें संकीर्तन नित्य होई. अर्थात् आपले आर्ष कोण हें प्रत्येक ब्राह्मणाला माहीत असे. हा गोत्रोच्चरणाचा व प्रवरसंकीर्तनाचा प्रघात आज हजारों वर्षें ह्या भरतखंडांत अव्याहत चालला आहे. एका कुळाचे गोत्रप्रवर दुसऱ्या कुळानें घेऊं नये असा निर्बंध होता व आहे. यो वा अन्यः सन् अन्यस्य आर्षेयं वृणीते स वा अस्य तदृषिः इष्टं वीतं वृंक्ते । अशी स्थिति व निर्बंध असल्यामुळें एक ब्राह्मण दुसऱ्या ब्राह्मणाचे प्रवर घेत नसे. मग अनार्य ते घेतील व आपल्याला ब्राह्मण म्हणवितील ही शंका हि यावयास नको. हें गोत्रप्रवरसंकीर्तन नित्य होई त्यामुळें त्यांचें सरसहा विस्मरण होणें कालत्रयीं हि संभाव्य नसे, मग शक्य कोठून होणार?

४ कोणत्या हि गोत्राचा ब्राह्मण वेदाची कोणती हि शाखा स्वीकारी. प्रायः बापाची शाखा मुलगा स्वीकारी परंतु अन्य शाखा स्वीकारण्यास प्रत्यवाय नसे व नाहीं. एक काश्यप गोत्र आहे तर त्यांत आश्वलायन, आपस्तंब, हिरण्यकेशी, माध्यंदिन, काण्व, वगैरे सर्व शाखा आहेत. चरणाचा हि स्वीकार स्वेच्छेवर अवलंबून असे. चरण व शाखा ह्यांचें महत्त्व गोत्र व प्रवर यांच्या इतकें विवाहादिसंस्कारांत विशेष नाहीं. अर्थात् शरीरसंबंधीं किंवा अग्न्युपासनसंबंधीं कार्यांत शास्त्रकारांनीं चरण व शाखा ह्यांचा निर्देश बिलकुल केलेला नाहीं.

५ पाणिनि, बौधायन, आश्वलायन, आपस्तंब, शौनक, कात्यायन, पतंजलि, हीं गोत्रनामें आहेत, व्यक्तिनामें नाहींत. गार्ग्यनारायण, लौगाक्षिभास्कर, वगैरे जोड नांवांतील गार्ग्य व लौगाक्षि हे शब्द गोत्रवाचक आहेत. गोत्रवाचक आहेत म्हणजे

आधुनिक परिभाषेंत बोलावयाचें झाल्यास आडनांवें ऊर्फ उपनामें आहेत. गार्ग्यश्चासौ नारायणः, लौगाक्षिश्चासौ भास्करः, नारायण कोण तर गार्ग्य; व भास्कर कोण तर लौगाक्षि. पांच सातशें वर्षांपूर्वी भारतांत आडनांवें नव्हतीं असें म्हणणाऱ्यांनीं हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं गोत्रें हीं आडनांवें म्हणून ज्यांना म्हणतात किंवा कुलनामें म्हणून ज्यांना म्हणतात तीं च होत. ताम्रशिलापट्टांत ब्राह्मणांचीं व्यक्तिनामें व गोत्रनामें दिलेलीं आढळतात. पैकीं गोत्रनामें जीं दिलीं असतात तीं आडनांवें च होत. व्यक्तिनामें व आडनांवें सारखींच असल्यास किंवा इतर कारणास्तव वैशिष्टीकरणार्थ ग्रामनामें हि व्यक्तिगोत्रनामांना जोडीत. कशीं जोडीत तें पहावयाचें असल्यास ते ते ताम्रशिलापट्ट पहावेत. विस्तारभयास्तव व सहजोपलब्धिस्तव त्यांचें संकीर्तन करून व्यर्थ जागा आडवीत नाहीं.

६ बौधायनाच्या कालीं गोत्रसंख्या असंख्य झाली होती. तो म्हणतोः--

गोत्राणां तु सहस्राणि प्रयुतान्यर्बुदानि च ।
ऊनपंचाशदेवैषां प्रवरा ऋषिदर्शनात् ॥

गणसूत्रांत पाणिनि गोत्रनामें देतो तीं सुमारें तीन साडेतीन शें व्हावीं. बौधायनाच्या कालीं गोत्रें अर्बुद झालीं होतीं. अर्थात् पाणिनि व बौधायन ह्यांच्यांत अंतर कित्येक शेंकडों वर्षांचें असलें पाहिजे. सूत्रांतून जीं गोत्रनामें दिलेलीं आढळतात-बौधायन, कात्यायन, आश्वलायन इत्यादि-तीं फार तर शंभर दोनशें भरतील. परंतु, स्मृत्यनुसार जीं गोत्रनामें दिलेलीं आहेत त्यांची संख्या सुमारें ५००० पांच हजार भरते. निरनिराळे ग्रंथ पाहून मीं जीं गोत्रनामें जुळविलीं आहेत त्यांची एकंदर संख्या सुमारें ५००० भरते. पैकीं कांहीं नामें नीट कळलीं नाहींत. नकल करणाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळें व गाढ अज्ञानामुळें अनेकांचे उच्चार व अक्षरविन्यास अशुद्ध पडलेले आहेत. नाना ग्रंथांच्या तुलनेनें, श्रौतगृह्यसूत्रें, पाणिनि, पतंजलि संहिता, ब्राह्मणें, आरण्यकें, पुराणें व इतर धर्मशास्त्रग्रंथ पाहून गोत्रांचे शुद्ध पाठ तयार केले पाहिजेत. ते पाठ तयार करून मग त्यांची तुलना देशस्थांच्या गोत्रांची तोंडी याद तयार करून तिच्याशीं केली पाहिजे. ताम्रशिलापट्टांतून कित्येक अशीं गोत्रनामें आढळतात त्यांचा उल्लेख उपलब्ध गोत्रप्रवरांच्या यादींत सांपडत नाहीं. सैराय भारतवर्षांत जेवढा म्हणून ब्राह्मण आहे त्या सर्वांचीं गोत्रें जुळविलीं पाहिजेत. म्हणजे जो मोठा गोत्रोदधि तयार होईल, त्यावरून ब्राह्मणवंशावर, वेदाच्या लुप्त शाखांवर व गोत्रप्रवरांवर मोठा जाज्वल्य प्रकाश पडेल. भारतीय वंशशास्त्राचा ह्या पद्धतीनें अभ्यास करणें फार उपयोगाचें असून अगत्याचें झालें आहे. ब्राह्मणांच्या वंशांत अनार्य लोकांचा भ्रष्ट समावेश पूर्वी कधींतरी, कसातरी, व कोठेंतरी झाला असावा, असा शुष्क व सांशयिक तर्क कित्येक उत्कट कापालिकांनीं केलेला आहे. परंतु, विवाहादि संस्कारांत गोत्रप्रवरादिबाबींनीं ब्राह्मणांनीं आपल्या कुलांना इतकें सूक्ष्म बांधून घेतलें आहे कीं ऐतिहासिक कालांत अनार्यांचा ब्राह्मणवंशांत समावेश होणें परम दुर्घट नव्हे तर बिलकुल संभाव्य व शक्य नाहीं. कापालिकांच्या उपरिष्ट विधानाचा ह्याहून स्पष्टतर निषेध करण्याची आवश्यकता नाहीं.

७ भारतवर्षांत इतरत्र गोत्रपरंपरा अद्यापपर्यंत किती राहिली आहे तें सूक्ष्मपणें सांगण्यास जशीं साधनें उपलब्ध व्हावीं तशीं झालेलीं नाहींत. तेव्हां महाराष्ट्रांतील गोत्रपरंपरा तेवढी येथें देतों, सुमारें चारशें गोत्रनामें प्राकृत भाषेंत अपभ्रष्ट झालेलीं मीं जुळविलेलीं आहेत तीं देतों. त्यांवरून दिसेल कीं सध्यां देशस्थांत, कऱ्हाड्यांत व कोंकणस्थांत जीं कित्येक आडनांवें आहेत तीं पूर्वींचीं गोत्रनामें आहेत. तात्पर्य गोत्रनामें म्हणजे आडनांवें; दुसरें कांहीं नाहीं. संस्कृत गोत्रनामें व मराठी आडनांवें यांची यादीः—
(यापुढें दिलेल्या ३९१ आडनांवांचा कोशांत समावेश केला आहे.)

८ वरील यादींत देशस्थ, कऱ्हाडे व कोंकणस्थ, मराठे व प्रभू यांचीं आडनांवें ऊर्फ गोत्रनामें दिलीं आहेत. जयवन्त हें आडनांव प्रभूंत आहे. हें आडनांव येणेंप्रमाणें साधलें आहे.

द्रोणपर्वतजीवन्तादन्यतरस्याम् (४-१-१०३)
एभ्यो गोत्रे फग् वा । जैवंतायनः जैवन्तिः वा ।

जीवन्त नामक मूळ गोत्रोत्पादक पुरुषापासून जे उत्पन्न झाले ते जैवन्तायन किंवा जैवन्ति. जैवन्ति शब्दाचा मराठी अपभ्रंश जैवन्त किंवा जयवन्त. जय (जिंकणें) या शब्दाशीं जयवंत, जैवंत या प्रभुआडनांवाचा कांहीं एक संबंध नाहीं. तसें च, गुप्ते हें प्रभुआडनांव गौप्तेय ह्या गोत्रनामापासून आलेलें आहे. शालिवाहनाच्या चौथ्या शतकांतील गुप्त सम्राटाशीं या आडनांवाचा संबंध दिसत नाहीं. चित्रे व चौवळ हीं प्रभुआडनांवें चैत्रेयाः व चौवलाः या गोत्रनामांपासून निघालेलीं आहेत. अधिकारी, अधकारी, अदकारी हें हि प्रभु आडनांव अधिकारि या गोत्रनामापासून निघालेलें स्पष्ट दिसतें. तात्पर्य, सध्यांच्या प्रभुलोकांत निरनिराळीं गोत्रनामें ऊर्फ आडनांवें आहेत. प्रभू तेवढे सर्व दाल्भ्यगोत्री, हें मत इतिहासानभिज्ञ भटांचें व तदनुयायी प्रभूंचें आहे. ब्राह्मण व प्रभू दोघे हि खऱ्या इतिहासाला पारखे होऊन, वृथा वाद माजवून राहिलेले आहेत. जैवन्त, गुप्ते, चौवळ हीं आडनांवें जैवन्ति, गौप्तेय, चौवळ

या गोत्रनामांपासून ज्याअर्थी निघालेलीं आहेत, त्याअर्थी एके काळीं हीं तिन्हीं आडनांवें ऊर्फ गोत्रें ब्राह्मणांत होतीं हें निर्विवाद आहे. ब्राह्मणांत हीं गोत्रें ऊर्फ कुळें सध्यां लुप्त झालेलीं दिसतात; फक्त प्रभूंत मात्र तीं हयात आहेत.

अवटे, घोल्ये, मांडे, काळे, पांढरे, कुटे, बाबर, भोर वगैरे आडनांवें अवट्याः, गौह्ल्याः, मांड्याः, कालेयाः, पाण्डाराः, कौटाः, बाभ्रव्याः, भौराः, या गोत्रनामांवरून प्राकृतांत आलीं हें उघड आहे. पोरे हें शिंपी लोकांत आडनांव आहे व तें पौरेयाः या गोत्रनामापासून निघालेलें आहे, हें कोणी हि कबूल करील. ह्या व्युत्पत्तीचा अर्थ काय ? ह्याचा अर्थ इतका च कीं पूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व संकर ह्या सर्वांचीं समान गोत्रें असत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व ह्या तिन्हींचे अनुलोम व प्रतिलोम संकर मिळून एक कुळ होई व त्या कुळांतील सर्व व्यक्तींचा त्या कुळाच्या गोत्र-नामावर हक्क असे. पैकीं ब्राह्मणादि वर्णांचा क्षय झाला असतां, प्रभू, शिंपी वगैरे जातींत हीं गोत्रनामें ऊर्फ आडनांवें अद्याप हयात असलेलीं आढळतात. ह्या दृष्टीनें महाराष्ट्रांतील अठरापगड जातींतील सर्व आडनांवें गोळा केलीं असतां आर्यवंशाच्या इतिहासावर फार प्रकाश पडेल. कोटीवरी गोत्रें होतीं म्हणून बौधायन सांगतो. त्यांपैकीं गोत्रप्रवरग्रंथांत व पुराणांत सुमारें ५००० पांच हजार सांपडतात. बाकीचीं लक्ष्यावधि गोत्रें गेलीं कोठें ? असा अंदाज आहे कीं, ब्राह्मणांत लुप्त झालेलीं हीं हजारों गोत्रें इतर जातींच्या आडनांवांत बरीं च सांपडतील.

९ उपरिष्ट गोत्रमालिकेंत बरींच आडनांवें ऊर्फ गोत्रनामें देशस्थांचीं आहेत. पिंगळे, वाघ, गर्गे, भारदे, व्यास, भार्गव, पर्वते, अत्रे, कोशे, धुमे, गांडे, मांडे, मोगल, हरकारे, गायधनी, पराशरे, आसकारे, उसणारे, देव, आथर्वण, हंस, दुर्गे, पिटके, पारधी, पारखी, पिंपळे, मध्वे, कवी, नंदे, धोत्रे, भोळे, तिखे, मुंजे, तोरो, वगैरे शेंकडों आडनांवें ऊर्फ गोत्रनामें देशस्थांत आढळतात. महाराष्ट्रांतील जे देशस्थ लोक त्या सर्वांचीं जुनीं आड-नांवें जमविण्याचा उद्योग मीं चालविला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, शेंकडों गोत्रनामें आडनांवें झालेलीं ह्या लोकांत आढळतील. जोशी, कुळकर्णी, देशपांडे, देशमुख, पाटील, मुश्रीम, पेशवे, मुजुमदार वगैरे धंद्यावरून पडलेलीं आडनांवें व गांवावरून करप्रत्ययान्त आडनांवें देशस्थ लोकांत बरींच आहेत. तीं वगळलीं असतां, बाकीचीं जीं आडनांवें रहातात तीं सर्व गोत्रनामां-वरून निघालेलीं आहेत. देशस्थांत गोत्रें शेकडों आहेत. त्याहून कऱ्हाड्यांत व कोंकणस्थांत गोत्रें अगदीं च कमी–कऱ्हाड्यांत २४ चोवीस गोत्रें आहेत व कोंकणस्थांत १४ चौदा गोत्रें आहेत.

१० पैकीं गोत्रनामांवरून कऱ्हाड्यांत जीं आडनांवें आलेलीं मला ओळखलीं त्यांची यादी येथें देतों. (यापुढें ७३ आडनांवांची यादी दिली आहे. त्या यादींतील आडनांवांचा कोशांत समावेश केला आहे.)

शोधिले तर आणीक हि दहावीस अपभ्रंश निघतील. गोत्रनामांचे अपभ्रंश होऊन जीं हीं पाऊणशें आडनांवें निघालीं आहेत त्यांहून बाकीचीं आडनांवें गांवावरून किंवा धंद्यावरून पडलेलीं आहेत. अंबार्डेकर, मणेरकर, हिंगणकर, फणसळकर, वगैरे करप्रत्ययान्त नांवें ग्रामनामांवरून तत्रस्थ ह्या अर्थी पडलेलीं आहेत. सबनीस, शेखदार, सरदेसाई, पतकी, जोशी, पटवर्धन, दीक्षित, हुजूरबाजार वगैरे फारशी व हिंदी नांवें धंद्यावरून पडलेलीं आहेत.

११ कऱ्हाड्यांच्या प्रमाणें च कोंकणस्थांच्या आडनांवांची त्रिविध स्थिति आहे. कांहीं आडनांवें धंद्यांवरून, कांहीं गांवांवरून व बाकीचीं गोत्रांचे अपभ्रंश होऊन पडलेलीं आहेत. पैकीं गोत्रोत्पन्न आडनांवें ओळखलीं तेवढीं नमूद करितों. (येथें त्यांनीं १३१ आडनांवें दिलीं आहेत त्यांचा समावेश कोशांत केला आहे.

गोत्रनामांपासून निष्पन्न झालेलीं आणीक हि दहा पांच आडनांवें देतां येतील. ह्यां व्यतिरिक्त बाकीचीं आडनांवें गांवावरून किंवा धंद्यावरून पडलेलीं आहेत—पळणिटकर, पाटणकर, नगरकर, पिटकर, भुस्कुटे, मंगरूरकर, माखलकर, चिपळोणकर वगैरे कर किंवा इये, ए प्रत्ययान्त आडनांवें ग्रामनामावरून निघालेलीं आहेत. मंडलिक, वर्तक, पटवर्धन, भट, पुराणिक, पोतनीस, पेशवे, फडणीस, मुजुमदार, जोशी, राजवाडे, दीक्षित, देशमुख वगैरे आडनांवें धंद्यावरून पडलेलीं आहेत. देशस्थ-कऱ्हाड्यांच्याप्रमाणेंच कोंकणस्थांचा हि प्रघात असलेला दिसतो.

मूळ कोंकणस्थांचीं १४ गोत्रें:—१ काश्यप, २ शांडिल्य, ३ वासिष्ठ, ४ विष्णुवर्धन, ५ कौंडिन्य, ६ अत्रि, ७ कौशिक, ८ भारद्वाज, ९ गार्ग्य, १० कपि, ११ जामदग्न्य, १२ वत्स, १३ नितुंदिन, १४ बाभ्रव्य. पैकीं जामदग्न्य व वत्स; भारद्वाज, कपि व गार्ग्य; कौशिक व बाभ्रव्य; वासिष्ठ व कुंडिन; काश्यप व शांडिल्य; आणि विष्णुवर्धन व नितुंदिन; हीं समानप्रवर म्हणजे एका च मूळ ऋषीपासून उत्पन्न झालेलीं आहेत. जामदग्न्य वत्स हीं भृगूपासून; भारद्वाज, कपि व गार्ग्य हीं भरद्वाजापासून; कौशिक व बाभ्रव्य हीं विश्वामित्रापासून; वासिष्ठ व कुंडिन हीं वसिष्ठापासून; काश्यप व शांडिल्य हीं कश्यपापासून; विष्णुवर्धन व नितुंदन हीं अंगिरसापासून जन्म पावलीं, अशी

परंपरागत समजूत आहे. अत्रिगोत्र अत्रिऋषीपासून उद्भवलें. अगस्तीपासून जन्मलेलें एक हि गोत्र कोंकणस्थांत नाहीं.

हीं १४ गोत्रें ऊर्फ कुळें परशुरामानें प्रथम कोंकणांत वसविलीं. परशुराम दाशरथि रामाचा समकालीन होता असें पुराणें व इतिहास सांगतात. तें मान्य केल्यास रामाच्या वेळेपासून चितपावनांची वस्ती कोंकणांत आहे, असें होतें. तें कांहीं हि असो, कोंकणस्थांचीं प्रथम १४ गोत्रें होतीं. तीं वाढत वाढत कालान्तरानें ६० झालीं. साठ्ये हें ६१ वें कुळ आहे, असें कित्येक म्हणतात. परंतु, तें साधार आहे, असें म्हणण्याला जितका पुरावा मिळावा तितका मिळालेला नाहीं. साठे म्हणजे साठ व साठ्ये म्हणजे ६१ वा, असा अर्थ करून कित्येक लोक आपली स्वतःची फसवणूक करून घेतात इतकें च. साठे या शब्दाचा अर्थ साठ नसून, हा शब्द सार्ष्टि या ऋषिनामापासून निष्पन्न झालेला आहे, हें मागें दाखविलेंच आहे, असो. हीं मूळचीं साठ कुळें येणेंप्रमाणें:--

१ **काश्यप**—१ लेले, २ गानू, ३ जोग, ४ लवाटे, ५ गोखले

२ **शांडिल्य**—१ सोमण, २ गांगल, ३ भाटे, ४ गणपुले, ५ दामले, ६ जोशी, ७ परचुरे

३ **वासिष्ठ**—१ साठे, २ बोडस, ३ वोक, ४ बापट, ५ बागुल, ६ धारू, ७ गोगटे, ८ भाभे, ९ पोंगशे, १० विंझे, ११ साठ्ये, १२ गोंवंड्ये

४ **विष्णुवर्धन**—१ किडमिडे, २ नेने, ३ परांजप्ये, ४ मेहेंदळे

५ **कौंडिन्य**—१ पटवर्धन, २ फणशे

६ **नितुंदन**—१ वैशंपायन, २ भाडभोके

७ **भारद्वाज**—१ आचवल, २ टेणे, ३ दर्वे, ४ गांधारे, ५ घांघुरडे, ६ रानड्ये

८ **गार्ग्य**—१ कर्वे, २ गाडगीळ, ३ लोंढे, ४ माटे, ५ दाबके

९ **कपि**--१ लिमये, २ खांबेटे, ३ जाईल, ४ माईल

१० **जामदग्नि**--१ पेंडसे, २ कुंटे

११ **वत्स**—१ मालशे

१२ **बाभ्रव्य**—१ बाळ, २ बेहरे

१३ **कौशिक**—१ गद्रे, २ बाम, ३ भाव्ये, ४ वाड ५ आपटे

१४ **अत्रि**— १ चितळे, २ आठवले, ३ भाडभोळे,

एकूण उपनांवें ६०

ह्या साठ आडनांवांपैकीं बापट, धारू, किडमिडे, नेने, लिमये, माईल व भाडभोळे हीं आडनांवें ज्या गोत्रांपासून निघालीं तीं गोत्रें मजजवळील पांच हजार गोत्रांच्या यादींत नाहींत किंवा त्यांचा पत्ता मला लावतां आला नाहीं. बाकीच्या ५३ आडनांवांचा पत्ता लागला आहे. त्यावरून असें म्हणतां येईल कीं, ज्या कालीं गोत्रनामें प्रचारांत होतीं, परंतु तीं प्राकृत होत होतीं त्या कालीं हीं ५३ आडनांवें ऊर्फ गोत्रनामें सुरू झालीं. प्राकृत भाषा सुरू झाल्यानंतरचीं हीं साठ आडनांवें ऊर्फ गोत्रनामें आहेत. म्हणजे आजपासून अडीच हजार वर्षांपलीकडील हीं साठ आडनांवें नाहींत. मूळचीं चौदा गोत्रें संस्कृत आहेत, प्राकृत नाहींत. अर्थात् तीं अडीच हजार वर्षांपूर्वीचीं आहेत. चौदा गोत्रांचा एकेक पुरुष परशुरामानें कोंकणांत वसविला ह्या दंतकथेशीं वरील निगमन चांगलें जुळतें. ह्या साठ आडनांवांचीं पुढें सुमारें, अडीचशें आणीक आडनांवें कोंकणस्थांत झालीं. तीं सर्व सापेक्ष दृष्टीनें कमजास्त अर्वाचीन आहेत. ह्या अर्वाचीनांत हि जीं आडनांवें गोत्रनामांपासून निघालेलीं दाखविलीं आहेत, तीं अर्वाचीनांतील अत्यन्त प्राचीन व प्राचीनांतील अत्यंत शेवटलीं होत. ह्या अर्वाचीनांतील प्राचीन आडनांवांचा काल शक ५०० पासून शक १३०० पर्यंतचा धरण्यास कांहीं हरकत नाहीं. घैसास, गोळे, गोरे, वगैरे गोत्रोत्पन्न आडनांवें ह्या अर्वाचीनांतील प्राचीन आडनांवांपैकीं होत. गांवांवरून पडलेलीं नांवें गोत्रांवरून पडलेल्या आडनांवांनंतरचीं होत. फारशी नांवें अलीकडील दोनशें वर्षांतील आहेत. सध्यां इंग्रेजी आडनांवें पडण्याचा संभव आहे. मूळ चौदा गोत्रनामांपासून उत्पन्न झालेलें एक हि आडनांव कोंकणस्थांत नाहीं. गोत्रनामांपासून उत्पन्न झालेलीं आडनांवें देशस्थांत अति आहेत. मूळ चोवीस गोत्रनामांपासून निघालेलीं आडनांवें कऱ्हाड्यांत हि नाहींत. उदाहरणार्थ, आत्रे हें आडनांव देशस्थांत आहे. कोंकणस्थांत व कऱ्हाड्यांत हें अत्रिगोत्र आहे, परंतु उपनाम नाहीं. आत्रेय ऊर्फ आत्रे हें आडनांव बरीच शतकें चालू झाल्यावर तें घेऊन देशावर ब्राह्मण आले. तें घेऊन कोंकणांत किंवा कऱ्हाडप्रांतांत ब्राह्मण आले नाहींत. अर्थात्, कोंकणस्थांची व कऱ्हाड्यांची वस्ती कोंकणांत व कऱ्हाडप्रांतांत देशस्थांची वस्ती देशावर होण्याच्या पूर्वीची आहे, हें उघड आहे. आर्यांनीं सध्यांच्या महाराष्ट्रांत म्हणजे पूर्वींच्या दंडकारण्यांत वस्ती कोंकण व कऱ्हाडप्रांत ह्यांत वस्ती केल्यानंतर केली, हें कित्येक वर्षांपूर्वीं इतर आधारांनीं मीं सिद्ध केलें आहे. त्या सिद्धीला ह्या गोत्रविवरणानें हि पुष्टि मिळते.

करवीर, कोकने व भुसकुटे हीं आडनांवें प्रांतांवरून पडलेलीं आहेत व हीं आडनांवें मूळ चौदा गोत्रांची वस्ती अपरान्तांत

या गोत्रनामांपासून ज्याअर्थी निघालेलीं आहेत, त्याअर्थी एके काळीं हीं तिन्हीं आडनांवें ऊर्फ गोत्रें ब्राह्मणांत होतीं हें निर्विवाद आहे. ब्राह्मणांत हीं गोत्रें ऊर्फ कुळें सध्यां लुप्त झालेलीं दिसतात; फक्त प्रभूंत मात्र तीं हयात आहेत.

अवटे, घोल्ये, मांडे, काळे, पांढरे, कुटे, बाबर, भोर वगैरे आडनांवें अवट्याः, गौहल्याः, मांड्याः, कालेयाः, पाण्डाराः, कौटाः, बाभ्रव्याः, भौराः, या गोत्रनामांवरून प्राकृतांत आलीं हें उघड आहे. पोरे हें शिंपी लोकांत आडनांव आहे व तें पौरेयाः या गोत्रनामापासून निघालेलें आहे, हें कोणी हि कबूल करील. ह्या व्युत्पत्तीचा अर्थ काय? ह्याचा अर्थ इतका च कीं पूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व संकर ह्या सर्वांचीं समान गोत्रें असत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व ह्या तिन्हींचे अनुलोम व प्रतिलोम संकर मिळून एक कुळ होई व त्या कुळांतील सर्व व्यक्तींचा त्या कुळाच्या गोत्र-नामावर हक्क असे. पैकीं ब्राह्मणादि वर्णांचा क्षय झाला असतां, प्रभू, शिंपी वगैरे जातींत हीं गोत्रनामें ऊर्फ आडनांवें अद्याप हयात असलेलीं आढळतात. ह्या दृष्टीनें महाराष्ट्रांतील अठरापगड जातींतील सर्व आडनांवें गोळा केलीं असतां आर्यवंशाच्या इतिहासावर फार प्रकाश पडेल. कोटीवरी गोत्रें होतीं म्हणून बौधायन सांगतो. त्यांपैकीं गोत्रप्रवरग्रंथांत व पुराणांत सुमारें ५००० पांच हजार सांपडतात. बाकीचीं लक्ष्यावधि गोत्रें गेलीं कोठें? असा अंदाज आहे कीं, ब्राह्मणांत लुप्त झालेलीं हीं हजारों गोत्रें इतर जातींच्या आडनांवांत बरीं च सांपडतील.

९ उपरिष्ट गोत्रमालिकेंत बरींच आडनांवें ऊर्फ गोत्रनामें देशस्थांचीं आहेत. पिंगळे, वाघ, गर्गे, भारदे, व्यास, भार्गव, पर्वते, अत्रे, कोशे, धुमे, गांडे, मांडे, मोगल, हरकारे, गायधनी, पराशरे, आसकारे, उसणारे, देव, आथर्वण, हंस, दुर्गे, पिटके, पारधी, पारखी, पिंपळे, मघ्वे, कवी, नंदे, धोत्रे, भोळे, तिखे, मुंजे, तोरो, वगैरे शेंकडों आडनांवें ऊर्फ गोत्रनामें देशस्थांत आढळतात. महाराष्ट्रांतील जे देशस्थ लोक त्या सर्वांचीं जुनीं आड-नांवें जमविण्याचा उद्योग मीं चालविला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, शेंकडों गोत्रनामें आडनांवें झालेलीं ह्या लोकांत आढळतील. जोशी, कुळकर्णी, देशपांडे, देशमुख, पाटील, मुश्रीम, पेशवे, मुजुमदार वगैरे धंद्यावरून पडलेलीं आडनांवें व गांवावरून करप्रत्ययान्त आडनांवें देशस्थ लोकांत बरींच आहेत. तीं वगळलीं असतां, बाकीचीं जीं आडनांवें रहातात तीं सर्व गोत्रनामां-वरून निघालेलीं आहेत. देशस्थांत गोत्रें शेंकडों आहेत. त्याहून कऱ्हाड्यांत व कोंकणस्थांत गोत्रें अगदीं च कमी—कऱ्हाड्यांत २४ चोवीस गोत्रें आहेत व कोंकणस्थांत १४ चौदा गोत्रें आहेत.

१० पैकीं गोत्रनामांवरून कऱ्हाड्यांत जीं आडनांवें आलेलीं मला ओळखवलीं त्यांची यादी येथें देतों. (यापुढें ७३ आडनांवांची यादी दिली आहे. त्या यादींतील आडनांवांचा कोशांत समावेश केला आहे.)

शोधिले तर आणीक हि दहावीस अपभ्रंश निघतील. गोत्रनामांचे अपभ्रंश होऊन जीं हीं पाऊणशें आडनांवें निघालीं आहेत त्यांहून बाकीचीं आडनांवें गांवावरून किंवा धंद्यावरून पडलेलीं आहेत. अंबार्डेकर, मणेरकर, हिंगणकर, फणसळकर, वगैरे करप्रत्ययान्त नांवें ग्रामनामांवरून तत्रस्थ ह्या अर्थी पडलेलीं आहेत. सबनीस, शेखदार, सरदेसाई, पतकी, जोशी, पटवर्धन दीक्षित, हुजूरबाजार वगैरे फारशी व हिंदी नांवें धंद्यावरून पडलेलीं आहेत.

११ कऱ्हाड्यांच्या प्रमाणें च कोंकणस्थांच्या आडनांवांची त्रिविध स्थिति आहे. कांहीं आडनांवें धंद्यांवरून, कांहीं गांवांवरून व बाकीचीं गोत्रांचे अपभ्रंश होऊन पडलेलीं आहेत. पैकीं गोत्रोत्पन्न आडनांवें ओळखवलीं तेवढीं नमूद करितों. (येथें त्यांनीं १३१ आडनांवें दिलीं आहेत त्यांचा समावेश कोशांत केला आहे.

गोत्रनामांपासून निष्पन्न झालेलीं आणीक हि दहा पांच आडनांवें देतां येतील. ह्यां व्यतिरिक्त बाकीचीं आडनांवें गांवावरून किंवा धंद्यावरून पडलेलीं आहेत—पळणिटकर, पाटणकर, नगरकर, पिटकर, भुस्कुटे, मंगरूरकर, माखलकर, चिपळोणकर वगैरे कर किंवा इये, ए प्रत्ययान्त आडनांवें ग्रामनामावरून निघालेलीं आहेत. मंडलिक, वर्तक, पटवर्धन भट, पुराणिक, पोतनीस, पेशवे, फडणीस, मुजुमदार, जोशी राजवाडे, दीक्षित, देशमुख वगैरे आडनांवें धंद्यावरून पडलेलीं आहेत. देशस्थ-कऱ्हाड्यांच्याप्रमाणेंच कोंकणस्थांचा हि प्रघात असलेला दिसतो.

मूळ कोंकणस्थांचीं १४ गोत्रें:—१ काश्यप, २ शांडिल्य, ३ वासिष्ठ, ४ विष्णुवर्धन, ५ कौंडिन्य, ६ अत्रि, ७ कौशिक, ८ भारद्वाज, ९ गार्ग्य, १० कपि, ११ जामदग्न्य, १२ वत्स, १३ नितुंदिन, १४ बाभ्रव्य. पैकीं जामदग्न्य व वत्स; भारद्वाज, कपि व गार्ग्य; कौशिक व बाभ्रव्य; वासिष्ठ व कुंडिन; काश्यप व शांडिल्य; आणि विष्णुवर्धन व नितुंदिन; हीं समानप्रवर म्हणजे एका च मूळ ऋषीपासून उत्पन्न झालेलीं आहेत. जामदग्न्य व वत्स हीं भृगूपासून; भारद्वाज, कपि व गार्ग्य हीं भरद्वाजापासून; कौशिक व बाभ्रव्य हीं विश्वामित्रापासून; वासिष्ठ व कुंडिन हीं वसिष्ठापासून; काश्यप व शांडिल्य हीं कश्यपापासून; विष्णुवर्धन व नितुंदन हीं अंगिरसापासून जन्म पाविलीं, अशी

परंपरागत समजूत आहे. अत्रिगोत्र अत्रिऋषीपासून उद्भवलें. अगस्तीपासून जन्मलेलें एक हि गोत्र कोंकणस्थांत नाहीं.

हीं १४ गोत्रें ऊर्फ कुळें परशुरामानें प्रथम कोंकणांत वसविलीं. परशुराम दाशरथि रामाचा समकालीन होता असें पुराणें व इतिहास सांगतात. तें मान्य केल्यास रामाच्या वेळेपासून चित्पावनांची वस्ती कोंकणांत आहे, असें होतें. तें कांहीं हि असो, कोंकणस्थांचीं प्रथम १४ गोत्रें होतीं. तीं वाढत वाढत कालान्तरानें ६० झालीं. साठ्ये हें ६१ वें कुळ आहे, असें कित्येक म्हणतात. परंतु, तें साधार आहे, असें म्हणण्याला जितका पुरावा मिळावा तितका मिळालेला नाहीं. साठे म्हणजे साठ व साठ्ये म्हणजे ६१ वा, असा अर्थ करून कित्येक लोक आपली स्वतःची फसवणूक करून घेतात इतकेंच. साठे या शब्दाचा अर्थ साठ नसून, हा शब्द सार्ष्टि या ऋषिनामापासून निष्पन्न झालेला आहे, हें मागें दाखविलेंच आहे, असो. हीं मूळचीं साठ कुळें येणेंप्रमाणें:--

१ **काश्यप**—१ लेले, २ गानू, ३ जोग, ४ लवाटे, ५ गोखले

२ **शांडिल्य**—१ सोमण, २ गांगल, ३ भाटे, ४ गणपुले, ५ दामले, ६ जोशी, ७ परचुरे

३ **वासिष्ठ**—१ साठे, २ बोडस, ३ वोक, ४ बापट, ५ बागुल, ६ धारू, ७ गोगटे, ८ भाभे, ९ पोंगशे, १० विंझे, ११ साठ्ये, १२ गोवंडे

४ **विष्णुवर्धन**—१ किडमिडे, २ नेने, ३ परांजप्ये, ४ मेहेंदळे

५ **कौंडिन्य**—१ पटवर्धन, २ फणशे

६ **नितुंदन**—१ वैशंपायन, २ भाडभोके

७ **भारद्वाज**—१ आचवल, २ टेणे, ३ दर्वे, ४ गांधारे, ५ घांघुरडे, ६ रानडे

८ **गार्ग्य**—१ कर्वे, २ गाडगीळ, ३ लोंढे, ४ माटे, ५ दाबके

९ **कपि**--१ लिमये, २ खांबेटे, ३ जाईल, ४ माईल

१० **जामदग्नि**--१ पेंडसे, २ कुंटे

११ **वत्स**—१ मालशे

१२ **बाभ्रव्य**--१ बाळ, २ बेहेरे

१३ **कौशिक**--१ गद्रे, २ बाम, ३ भाव्ये, ४ वाड ५ आपटे

१४ **अत्रि**— १ चितळे, २ आठवले, ३ भाडभोके,

एकूण उपनांवें ६०

ह्या साठ आडनांवांपैकीं बापट, धारू, किडमिडे, नेने, लिमये, माईल व भाडभोळे हीं आडनांवें ज्या गोत्रांपासून निघालीं तीं गोत्रें मजजवळील पांच हजार गोत्रांच्या यादींत नाहींत किंवा त्यांचा पत्ता मला लावतां आला नाहीं. बाकीच्या ५३ आडनांवांचा पत्ता लागला आहे. त्यावरून असें म्हणतां येईल कीं, ज्या कालीं गोत्रनामें प्रचारांत होतीं, परंतु तीं प्राकृत होत होतीं त्या कालीं हीं ५३ आडनांवें ऊर्फ गोत्रनामें सुरू झालीं. प्राकृत भाषा सुरू झाल्यानंतरचीं हीं साठ आडनांवें ऊर्फ गोत्रनामें आहेत. म्हणजे आजपासून अडीच हजार वर्षांपलीकडील हीं साठ आडनांवें नाहींत. मूळचीं चौदा गोत्रें संस्कृत आहेत, प्राकृत नाहींत. अर्थात् तीं अडीच हजार वर्षांपूर्वीचीं आहेत. चौदा गोत्रांचा एकेक पुरुष परशुरामानें कोंकणांत वसविला ह्या दंतकथेशीं वरील निगमन चांगलें जुळतें. ह्या साठ आडनांवांचीं पुढें सुमारें, अडीचशें आणीक आडनांवें कोंकणस्थांत झालीं. तीं सर्व सापेक्ष दृष्टीनें कमजास्त अर्वाचीन आहेत. ह्या अर्वाचीनांत हि जीं आडनांवें गोत्रनामांपासून निघालेलीं दाखविलीं आहेत, तीं अर्वाचीनांतील अत्यन्त प्राचीन व प्राचीनांतील अत्यंत शेवटलीं होत. ह्या अर्वाचीनांतील प्राचीन आडनांवांचा काल शक ७०० पासून शक १३०० पर्यंतचा धरण्यास कांहीं हरकत नाहीं. घैसास, गोळे, गोरे, वगैरे गोत्रोत्पन्न आडनांवें ह्या अर्वाचीनांतील प्राचीन आडनांवांपैकीं होत. गांवांवरून पडलेलीं नांवें गोत्रांवरून पडलेल्या आडनांवांनंतरचीं होत. फारशी नांवें अलीकडील दोनशें वर्षांतील आहेत. सध्यां इंग्रेजी आडनांवें पडण्याचा संभव आहे. मूळ चौदा गोत्रनामांपासून उत्पन्न झालेलें एक हि आडनांव कोकणस्थांत नाहीं. गोत्रनामांपासून उत्पन्न झालेलीं आडनांवें देशस्थांत अति आहेत. मूळ चोवीस गोत्रनामांपासून निघालेलीं आडनांवें कऱ्हाड्यांत हि नाहींत. उदाहरणार्थ, अत्रे हें आडनांव देशस्थांत आहे. कोंकणस्थांत व कऱ्हाड्यांत हें अत्रिगोत्र आहे, परंतु उपनाम नाहीं. आत्रेय ऊर्फ अत्रे हें आडनांव बरींच शतकें चालू झाल्यावर तें घेऊन देशावर ब्राह्मण आले. तें घेऊन कोंकणांत किंवा कऱ्हाडप्रांतांत ब्राह्मण आले नाहींत. अर्थात्, कोंकणस्थांची व कऱ्हाड्यांची वस्ती कोंकणांत व कऱ्हाडप्रांतांत देशस्थांची वस्ती देशावर होण्याच्या पूर्वींची आहे, हें उघड आहे. आर्यांनीं सध्यांच्या महाराष्ट्रांत म्हणजे पूर्वींच्या दंडकारण्यांत वस्ती कोंकण व कऱ्हाडप्रांत ह्यांत वस्ती केल्यानंतर केली, हें कित्येक वर्षांपूर्वीं इतर आधारांनीं मीं सिद्ध केलें आहे. त्या सिद्धीला ह्या गोत्रविवरणानें हि पुष्टि मिळते.

करवीर, कोकने व मुसळटे हीं आडनांवें ग्रामांवरून पडलेलीं आहेत व हीं आडनांवें मूळ चौदा गोत्रांची वस्ती असल्यांत

झाल्यावर त्यांच्या वंशजांपैकीं त्या त्या प्रांतांत ज्या कोणीं वस्ती केली त्यांना मिळालेलीं दिसतात. जें चित्पावन कुल करवीर प्रांतांत जाऊन राहिलें त्याला करवीर हें आडनांव पडलें. चित्पावनप्रांतांतून जें कोंकणांत राहिलें त्याला कोंकणे हें विशिष्ट उपनाम प्राप्त झालें आणि भोजकट नामक जो देश तापीतीरीं विंध्याच्या दक्षिणेस होता त्यांत जो पुरुष चित्पावनप्रांतांतून जाऊन राहिला त्याला भोजकटीय, भोजकटे, भोसकटे, भुसकुटे हें आडनांव ऊर्फ आणणांव मिळालें. मूळ चित्पावनप्रांतांतून गांवोगांव चित्पावनांचा जसजसा प्रसार होत गेला, तसतशीं ग्राम-नामोत्पन्न आडनांवें प्रचलित झालीं. गोंधळेकर, कालेंकर, कापरेकर, केतकर ह्या आडनांवांत गोंधळी, कालें व केतकी या ग्रामनामांचा निर्देश होतो. येथें कर प्रत्यय केर या प्राकृत प्रत्ययाचा मराठी अपभ्रंश आहे. प्रथम ह्या आडनांवांचा उच्चार गोंधळीकेरः, कालेंकेरः, कापरेकेरः व केतकीकेरः असा होत असे. महाराष्ट्री प्राकृत लुप्त झाल्यावर ह्या आडनांवांतील केर प्रत्ययाचा कर असा उच्चार होऊं लागला. केर हा प्रत्यय तत्संबंधवाचक आहे. केतकर म्हणजे केतकीगांवचा. हा केर प्रत्यय स्मृत्यनुसार जे गोत्रनिर्णायक ग्रंथ झाले त्यांत कर्मारकेराः व वाकिनिकेराः म्हणून जीं गोत्रनामें येतात त्यांत दृष्टीस पडतो. आतां येथें असा प्रश्न उद्भवतो कीं, केतकी गांवावरून केतकर हें आडनांव पडलें कीं कितवाः ह्या गोत्रनामावरून केतकेराः हें आडनांव निघालें ? कितवकेराः म्हणजे कितवगोत्राचे. कितवगोत्राचे जे ते कितवकेर. कितवकेर=केतकेर, अशी हि परंपरा असूं शकेल. म्हणजे गार्ग्य गोत्रांत म्हणजे कुळांत कोणी कितव नांवाचा पुरुष झाला व कर्तेपणामुळें त्याच्यापासून कितव हें उपनाम सुरू झालें. त्या कितवानें कैत ऊर्फ केत हें नवीन गांव वसविलें व त्या गांवाला आपलें नांव दिलें म्हणजे गोत्रपुरुषनामावरून गांवाचें नांव पडलें, गांवावरून पुरुषाचें नांव पडलें नाहीं, असा अर्थ होतो. आणि हें च जास्त संभवतें. गांवावरून पुरुषाचें व तदुत्पन्न वंशाचें नांव पडलें असें धरल्यास, केत ह्या पुरुषाच्या अगोदर केत हें गांव होतें असें गृहीत धरावें लागतें. अपरान्तांत हें केत गांव केतकरांच्या अगोदर कोणीं वसविलें ? आर्यांच्या पूर्वी अपरान्तांत नागांची वस्ती होती. त्यांनीं हें गांव वसविलें असें म्हणण्यास विशेष कांहीं आधार दिसत नाहीं. तेव्हां, गांवाच्या अगोदर तें गांव स्थापणारा पुरुष होता, हें मान्य करणें हा एक पक्ष रहातो. कितव नांवाचा गोत्रनामप्रवर्तक कोणी एक पुरुष गार्ग्य-गोत्रांत झाला. त्याचे जे वंशज त्यांना केतकर व त्यानें जें गांव वसविलें त्याला केत हें नांव पडलें. केत ह्या नांवाला सुबकपणा आणण्याकरितां केतकीग्राम असें त्या गांवाला कोणी कवित्वसंपन्न वंशज म्हणूं लागले. मूळ नांव केतग्राम, केतकीग्राम नव्हे. मूळनाम केतकी असतें तर केतकीकर असें आडनांव प्रचलित असतें. परंतु, आडनांवाचा उच्चार केतकर असा आहे. तेव्हां मूळग्रामनाम केत हें च खरें व तें ग्राम गार्ग्यकुलोत्पन्न कितव या प्रख्यात व कर्त्या पुरुषानें वसविलें. मेहेंदळी, गोंधळी, हीं हि ग्रामनामें महेंद्र, गोधूलि, ह्या गोत्रप्रवर्तक म्हणजे आडनांव-प्रवर्तक पुरुषांपासून निघालेलीं आहेत. हा प्रकार प्राचीन ग्रामनामें व ग्रामनामप्रवर्तक गोत्रपुरुषांसंबंधानें झाला. अर्वाचीनकालीं पुण्यास राहणारा तो पुणेकर व मुंबईस राहणारा तो मुंबईकर, असा प्रघात आहे. पुणें व मुंबई यांच्या स्थापनेशीं या पुणेकराचा किंवा मुंबईकराचा बिलकुल संबंध नाहीं. प्राचीनकालीं मूळ-वसाहती च जेथें स्थापावयाच्या होत्या, तेथें मूळ गोत्रप्रवर्तक पुरुषाचें नांव व नंतर त्यानें स्थापिलेल्या गांवाचें नांव, असा प्रघात होता.

वर्तक, जोशी, देशमुख, भट, पटवर्धन, हीं कोंकणस्थांचीं आडनांवें धंद्याचीं दर्शक आहेत. पैकीं पट्टवर्धन ह्या कुलाचें नांव प्राचीन ताम्रपटांतून येतें. एका प्राचीन ताम्रपटांत एक नायकीण पट्टवर्धन कुलांत जन्मली म्हणून उल्लेख असल्याचें आठवतें. संदर्भ-पुस्तकें जवळ नाहींत म्हणून संदर्भ दिला नाहीं. पट्टवर्धनाचें काम ताम्रपट्ट कापण्याचें व तयार करण्याचें असावें. हें कुलनाम होतें त्या अर्थी त्या कालीं हा ताम्रपट्ट तयार करण्याचा धंदा पिढीजाद होऊन बसला होता, हें उघड आहे. तसें च पट्टवर्धन ब्राह्मण च होते असें दिसत नाहीं. ब्राह्मणेतर हि होते. कालान्तरानें धंद्याचा लोप होऊन, हें केवळ कुलनाम ऊर्फ आडनांव झालें.

रानड्ये हें गोत्रनाम आहे. मूळ गोत्र अरण्यवाटाः; त्याचा अपभ्रंश रण्णवाड. त्याचें प्राचीन मराठी राणवडे. त्याचें अर्वाचीन मराठी रानडे. रानडे यांच्या वंशांत उत्पन्न झाले ते रानड्ये. वाटाः हें गोत्रनाम प्रसिद्ध आहे. परंतु, अरण्यवाटाः हें प्रसिद्ध नाहीं, म्हणजे गोत्रप्रवरग्रंथांत नाहीं. लक्षावधि जीं गोत्रें होतीं त्यांत हें गोत्रनाम असावें. मनोहर, मधुमत्ते, भैरव, भोगले, फफे, पघे, नवांके, फाळके, फडके वगैरे हि अप्रसिद्ध गोत्रनामें असावीं. ह्या लक्षावधि अप्रसिद्ध गोत्रांचा निर्देश गोत्रप्रवरग्रंथांत करणारा पुरुष प्राचीन कालीं कोणी निपजला नाहीं, हें मोठें दुर्भाग्य होय. तत्रापि अशीं गोत्रें होतीं, हें अर्वाचीन कालांत उपलब्ध होणाऱ्या मराठी आडनांवांवरून निःसंदेह ताडतां येतें.

राजवाडे हें आडनांव दोन तऱ्हांनीं व्युत्पादितां येईल. राजवाटाः असें गोत्र असावें. किंवा राजवाड्यांतील अधिकारी अशी दुसरी व्युत्पत्ति होईल. पैकीं दुसरी व्युत्पत्ति दिनकरराव राजवाडे यांच्या चरित्रांत दिली आहे.

शिवाजीच्या राजवाड्यांत राजवाड्यांच्या कोण्या एका पूर्वजाला कांहीं एक अधिकार होता, त्यावरुन त्याच्या सर्व वंशजांनीं राजवाडे हें आडनांव पिढीजाद लावून घेतलें. राजवाड्यांचें मूळ आडनांव जोशी. हे शांडिल्यगोत्री जोशी मूळचे राहणार निवें म्हणून गांव रत्नागिरीजवळ आहे तेथचे.

अगस्तीसह एकंदर ऋषि आठ व प्रवर एकुणपन्नास. ह्या एकुणपन्नास प्रवरांखालीं लक्षावधि गोत्रें पडतात. एक भागवित्ति किंवा भागवित्तायन गोत्र घेतलें तर तें गार्ग्य, कपि, जामदग्नि व कौशिक ह्या चार मुख्य गोत्रांखालीं पडतें. म्हणजे भागवित्ति ऊर्फ भागवत जसे गार्ग्यगोत्री आहेत, तसेच ते कपिगोत्री, जामदग्निगोत्री व कौशिकगोत्री हि आहेत. कऱ्हाड्यांत भागवत काश्यपगोत्री व भारद्वाजगोत्री हि आहेत. म्हणजे एकंदर भागवत सहा निरनिराळ्या गोत्रांचे आहेत. ह्या सहा गोत्रांप्रमाणें भागवित्ति ऊर्फ भागवत हें हि गोत्रनाम च आहे. इतकें च कीं कोंकणस्थांत व कऱ्हाड्यांत तें आडनांव झालें आहे. गोत्रप्रवरग्रंथांत सांगितलेलीं दोन हजार गोत्रें त्या दोन हजार गोत्रांपैकीं प्रत्येकाखालीं पडतील. ह्याचा अर्थ इतका च कीं, हीं गोत्रनामें संस्कृत भाषा जेव्हां सररहा प्रचलित होती त्या कालीं ऋषिनामें ऊर्फ व्यक्तिनामें होतीं व तीं पुढें प्रजा जशी वाढत चालली तशीं कांहीं प्रत्यय लागून गोत्रनामें ऊर्फ आडनांवें झालीं. हीं आडनांवें सध्यां हि प्राकृत रूपानें महाराष्ट्रांत चालू आहेत. भाटे हें आडनांव शांडिल्य, कपि, गार्ग्य, जामदग्नि, अत्रि, भार्गव व गौतम, इतक्या गोत्रांत आहे. भाटे म्हणजे भ्राष्ट्रेयाः. गोडशे, गोरे, खुळे, आचार्य, फणशे, मुळ्ये वगैरे अनेक आडनांवें अशीं अनेकगोत्री आहेत. खुद्द गोत्रप्रवरग्रंथांत तीं च तीं गोत्रनामें निरनिराळ्या गणांत येतात. तो च प्रकार सध्यां हि दृष्टीस पडतो. ह्यावरुन एक गोष्ट निष्पन्न होते, ती ही कीं, पांच हजार गोत्रांपैकीं प्रत्येक गोत्राखालीं जर सारीं च पडूं शकतात, तर एकंदर गोत्रें ५००० × ५०००= २५०००००० दोन कोट पन्नास लाख होतात. बौधायन तर म्हणतो कीं गोत्रें अर्बुद आहेत. वरील गणित पहातां बौधायनाचें म्हणणें साधार दिसतें व बौधायनकालीं ब्राह्मणसंख्या किती मोठी होती याचा स्थूल अंदाज होतो.

देवरुखे, पळशे, सवाशे, शेणवई, तिर्गूळ, गोळक, वगैरेंच्या आडनांवांची हि वरीलप्रमाणें च व्यवस्था असलेली दिसेल, ह्यांचीं गोत्रें मीं अद्याप जमविलीं नाहींत.

क्षत्रिय दोन प्रकारचे, सार्ष व अनार्ष. पुरोहितप्रवरो राज्ञां, असें आश्वलायन श्रौतसूत्रांत म्हटलेलें आहे. तत्रापि, शुंग, मौर्य, गुप्त, शालिवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, बाण, इंद्र, चालुक्य, चौलुक्य, गुहिल, गांग, गुप्त, सिंद, वगैरे आडनांवें गोत्रनामें असलेलीं स्पष्ट दिसतात. ताम्रशिलापट्टांत हारीत, आंगिरसहारीत, काश्यप, कौंडिन्य, मानव्य, वगैरे गोत्रें क्षत्रियांचीं दिलेलीं आढळतात. वासिष्ठीपुत्र, गौतमीपुत्र, माठरीपुत्र, वगैरे नांवें जशीं शातवाहनवंशांत सांपडतात तशीं ब्राह्मणांतील आचार्यवंशपरंपरेंत हि सांपडतात. काळे, पांढरे, गोरे, गोळे, गाढवे, साठे, वगैरे गोत्रनामोत्पन्न आडनांवें मराठ्यांत अद्याप आहेत. त्यावरुन असें दिसतें कीं, मराठ्यांत ऊर्फ क्षत्रियांत ब्राह्मणांच्या प्रमाणें च गोत्रें आहेत. परंतु, इतकें खरें कीं, क्षत्रियांचीं गोत्रें व प्रवर त्यांना तोंडपाठ असण्यापेक्षां त्यांच्या पुरोहितांना जास्त तोंडपाठ असत. उघड च आहे, इतर विवंचनेपुढें गोत्रांकडे लक्ष्य देण्यास त्यांना वेळ नसे. ब्राह्मणानां राजार्पितानां राज्ञां वा ब्राह्मणार्पितानां, असें सूत्रवचन आहे. राजाला अर्पण केलेल्या ब्राह्मणाचें गोत्र जें राजाचें तें, व ब्राह्मणाला अर्पण केलेल्या राजाचें गोत्र जें ब्राह्मणाचें तें, असा प्रघात असे. वैश्यांची हि हीच तऱ्हा. जैन लोकांत गोत्रें आहेत. तीं हि गोत्रांचा अभ्यास करणाऱ्याला जुळविणें मोठें फलप्रद होईल यांत संशय नाहीं.

गाणगारि वगैरे तांडिन आचार्य सर्ववर्ण एकार्षेय मानीत. सर्ववर्णांचें आर्ष ' मानव ' असें तें म्हणत. त्याला आधार, मानव्यो हि प्रजा इति हि ब्राह्मणं । हा देत. परंतु, हें एकप्रवराचें व एकगोत्राचें मत श्रौतकर्मवरणांत मान्य करीत, विवाहादिसंस्कारांत मान्य करीत नसत. कारण, तसें केल्यास समानप्रवऱ्यांचा विवाह होऊं लागेल अशी अडचण येई व समानप्रवरांचा विवाह आर्यांना केव्हां हि मान्य नसे. तात्पर्य, एकप्रवरत्वाचें हें मत सर्वसंमत होण्यासारखें नव्हतें. तत्त्वतः सर्व प्रजा मनूपासून निघाली असें मानीत. परंतु व्यवहारांत असंख्य गोत्रें व असमानप्रवरविवाह चालू असत.

१२ येणेंप्रमाणें कऱ्हाडे, कोंकणस्थ व देशस्थ यांच्या गोत्रांची परंपरा आहे. सप्तर्षींपर्यंत यांचीं गोत्रें जातात व तेथपासून आतांपर्यंत व आपल्यापर्यंत वंश आणून भिडवितां येतो. अशा ह्या वंशांत अहिंदूंचा समावेश होण्याचा बिलकुल संभव व शक्यता नाहीं. अगस्तीसह आठ ऋषि, ४९ प्रवर व अर्बुद गोत्रें, नंतर प्राकृत गोत्रें व नंतर मराठी आडनांवें, अशी अव्याहत परंपरा आहे. भारतीय आर्यांचा वंश येणेंप्रमाणें महाराष्ट्रांत विनतूट व अस्खलित चालत आलेला आहे. वंशेतिहासाचीं आपल्या इकडे जितकीं साधनें आहेत तितकीं विपुल साधनें अन्यदेशांत व अन्य समाजांत क्वचित् च सांपडतील.

झाल्यावर त्यांच्या वंशजांपैकीं त्या त्या प्रांतांत ज्या कोणीं वस्ती केली त्यांना मिळालेलीं दिसतात. जें चित्पावन कुल करवीर प्रांतांत जाऊन राहिलें त्याला करवीर हें आडनांव पडलें. चित्पावनप्रांतांतून जें कोंकणांत राहिलें त्याला कोंकणे हें विशिष्ट उपनाम प्राप्त झालें आणि भोजकट नामक जो देश तापीतीरीं विंध्याच्या दक्षिणेस होता त्यांत जो पुरुष चित्पावनप्रांतांतून जाऊन राहिला त्याला भोजकटीय, भोजकटे, भोसकटे, भुसकुटे हें आडनांव ऊर्फ आणणांव मिळालें. मूळ चित्पावनप्रांतांतून गांवोगांव चित्पावनांचा जसजसा प्रसार होत गेला, तसतशीं ग्राम–नामोत्पन्न आडनांवें प्रचलित झालीं. गोंधळेकर, कार्लेकर, कापरेकर, केतकर ह्या आडनांवांत गोंधळी, कार्ले व केतकी या ग्रामनामांचा निर्देश होतो. येथें कर प्रत्यय केर या प्राकृत प्रत्ययाचा मराठी अपभ्रंश आहे. प्रथम ह्या आडनांवांचा उच्चार गोंधळीकेरः, कार्लेकेरः, कापरेकेरः व केतकीकेरः असा होत असे. महाराष्ट्री प्राकृत लुप्त झाल्यावर ह्या आडनांवांतील केर प्रत्ययाचा कर असा उच्चार होऊं लागला. केर हा प्रत्यय तत्संबंधवाचक आहे. केतकर म्हणजे केतकीगांवचा. हा केर प्रत्यय स्मृत्यनुसार जे गोत्रनिर्णायक ग्रंथ झाले त्यांत कर्मारकेराः व वाकिनिकेराः म्हणून जीं गोत्रनामें येतात त्यांत दृष्टीस पडतो. आतां येथें असा प्रश्न उद्भवतो कीं, केतकी गांवावरून केतकर हें आडनांव पडलें कीं कितवाः ह्या गोत्रनामावरून केतकेराः हें आडनांव निघालें? कितवकेराः म्हणजे कितवगोत्राचे. कितवगोत्राचे जे ते कितवकेर. कितवकेर=केतकेर, अशी हि परंपरा असूं शकेल. म्हणजे गार्ग्य गोत्रांत म्हणजे कुळांत कोणी कितव नांवाचा पुरुष झाला व कर्तेपणामुळें त्याच्यापासून कितव हें उपनाम सुरू झालें. त्या कितवानें कैत ऊर्फ केत हें नवीन गांव वसविलें व त्या गांवाला आपलें नांव दिलें म्हणजे गोत्रपुरुषनामावरून गांवाचें नांव पडलें, गांवावरून पुरुषाचें नांव पडलें नाहीं, असा अर्थ होतो. आणि हें च जास्त संभवतें. गांवावरून पुरुषाचें व तदुत्पन्न वंशाचें नांव पडलें असें धरल्यास, केत ह्या पुरुषाच्या अगोदर केत हें गांव होतें असें गृहीत धरावें लागतें. अपरान्तांत हें केत गांव केतकरांच्या अगोदर कोणीं वसविलें? आर्यांच्या पूर्वी अपरान्तांत नागांची वस्ती होती. त्यांनीं हें गांव वसविलें असें म्हणण्यास विशेष कांहीं आधार दिसत नाहीं. तेव्हां, गांवाच्या अगोदर तें गांव स्थापणारा पुरुष होता, हें मान्य करणें हा एक पक्ष रहातो. कितव नांवाचा गोत्रनामप्रवर्तक कोणी एक पुरुष गार्ग्य-गोत्रांत झाला. त्याचे जे वंशज त्यांना केतकर व त्यानें जें गांव वसविलें त्याला केत हें नांव पडलें. केत ह्या नांवाला सुबकपणा आणण्याकरितां केतकीग्राम असें त्या गांवाला कोणी कवित्वसंपन्न वंशज म्हणूं लागले. मूळ नांव केतग्राम, केतकीग्राम नव्हे. मूळनाम केतकी असतें तर केतकीकर असें आडनांव प्रचलित असतें. परंतु, आडनांवाचा उच्चार केतकर असा आहे. तेव्हां मूळग्रामनाम केत हें च खरें व तें ग्राम गार्ग्यकुलोत्पन्न कितव या प्रख्यात व कर्त्या पुरुषानें वसविलें. मेहेंदळी, गोंधळी, हीं हि ग्रामनामें महेंद्र, गोधूलि, ह्या गोत्रप्रवर्तक म्हणजे आडनांव–प्रवर्तक पुरुषांपासून निघालेलीं आहेत. हा प्रकार प्राचीन ग्रामनामें व ग्रामनामप्रवर्तक गोत्रपुरुषांसंबंधानें झाला. अर्वाचीनकालीं पुण्यास राहणारा तो पुणेकर व मुंबईस राहणारा तो मुंबईकर, असा प्रघात आहे. पुणें व मुंबई यांच्या स्थापनेशीं या पुणेकराचा किंवा मुंबईकराचा बिलकुल संबंध नाहीं. प्राचीनकालीं मूळ-वसाहती च जेथें स्थापावयाच्या होत्या, तेथें मूळ गोत्रप्रवर्तक पुरुषाचें नांव व नंतर त्यानें स्थापिलेल्या गांवाचें नांव, असा प्रघात होता.

वर्तक, जोशी, देशमुख, भट, पटवर्धन, हीं कोंकणस्थांचीं आडनांवें धंद्याचीं दर्शक आहेत. पैकीं पट्टवर्धन ह्या कुलाचें नांव प्राचीन ताम्रपटांतून येतें. एका प्राचीन ताम्रपटांत एक नायकीण पट्टवर्धन कुलांत जन्मली म्हणून उल्लेख असल्याचें आठवतें. संदर्भ-पुस्तकें जवळ नाहींत म्हणून संदर्भ दिला नाहीं. पट्टवर्धनाचें काम ताम्रपट्ट कापण्याचें व तयार करण्याचें असावें. हें कुलनाम होतें त्या अर्थी त्या कालीं हा ताम्रपट्ट तयार करण्याचा धंदा पिढीजाद होऊन बसला होता, हें उघड आहे. तसें च पट्टवर्धन ब्राह्मण च होते असें दिसत नाहीं. ब्राह्मणेतर हि होते. कालान्तरानें धंद्याचा लोप होऊन, हें केवळ कुलनाम ऊर्फ आडनांव झालें.

रानड्ये हें गोत्रनाम आहे. मूळ गोत्र अरण्यवाटाः; त्याचा अपभ्रंश रण्णवाड. त्याचें प्राचीन मराठी राणवडे. त्याचें अर्वाचीन मराठी रानडे. रानडे यांच्या वंशांत उत्पन्न झाले ते रानड्ये. वाटाः हें गोत्रनाम प्रसिद्ध आहे. परंतु, अरण्यवाटाः हें प्रसिद्ध नाहीं, म्हणजे गोत्रप्रवरग्रंथांत नाहीं. लक्षावधि जीं गोत्रें होतीं त्यांत हें गोत्रनाम असावें. मनोहर, मधुमत्ते, भैरव, भोगले, फफे, पघे, नवांके, फाळके, फडके वगैरे हि अप्रसिद्ध गोत्रनामें असावीं. ह्या लक्षावधि अप्रसिद्ध गोत्रांचा निर्देश गोत्रप्रवरग्रंथांत करणारा पुरुष प्राचीन कालीं कोणीं निपजला नाहीं, हें मोठें दुर्भाग्य होय. तत्रापि अशीं गोत्रें होतीं, हें अर्वाचीन कालांतः उपलब्ध होणाऱ्या मराठी आडनांवांवरून निःसंदेह ताडतां येतें.

राजवाडे हें आडनांव दोन तऱ्हांनीं व्युत्पादितां येईल. राजवाटाः असें गोत्र असावें. किंवा राजवाड्यांतील अधिकारी अशी दुसरी व्युत्पत्ति होईल. पैकीं दुसरी व्युत्पत्ति दिनकरराव राजवाडे यांच्या चरित्रांत दिली आहे.

शिवाजीच्या राजवाड्यांत राजवाड्यांच्या कोण्या एका पूर्वजाला कांहीं एक अधिकार होता, त्यावरून त्याच्या सर्व वंशजांनीं राजवाडे हें आडनांव पिढीजाद लावून घेतलें. राजवाड्यांचें मूळ आडनांव जोशी. हे शांडिल्यगोत्री जोशी मूळचे राहणार निर्वे म्हणून गांव रत्नागिरीजवळ आहे तेथचे.

अगस्तीसह एकंदर ऋषि आठ व प्रवर एकूणपन्नास. ह्या एकूणपन्नास प्रवरांखालीं लक्षावधि गोत्रें पडतात. एक भागवित्ति किंवा भागवित्तायन गोत्र घेतलें तर तें गार्ग्य, कपि, जामदग्नि व कौशिक ह्या चार मुख्य गोत्रांखालीं पडतें. म्हणजे भागवित्ति ऊर्फ भागवत जसे गार्ग्यगोत्री आहेत, तसेच ते कपिगोत्री, जामदग्निगोत्री व कौशिकगोत्री हि आहेत. कऱ्हाड्यांत भागवत काश्यपगोत्री व भारद्वाजगोत्री हि आहेत. म्हणजे एकंदर भागवत सहा निरनिराळ्या गोत्रांचे आहेत. ह्या सहा गोत्रां-प्रमाणें भागवित्ति ऊर्फ भागवत हें हि गोत्रनाम च आहे. इतकें च कीं कोंकणस्थांत व कऱ्हाड्यांत तें आडनांव झालें आहे. गोत्रप्रवर-ग्रंथांत सांगितलेलीं दोन हजार गोत्रें ह्या दोन हजार गोत्रांपैकीं प्रत्येकाखालीं पडतील. ह्याचा अर्थ इतका च कीं, हीं गोत्रनामें संस्कृत भाषा जेव्हां सरसहा प्रचलित होती त्या कालीं ऋषिनामें ऊर्फ व्यक्तिनामें होतीं व तीं पुढें प्रजा जशी वाढत चालली तशीं कांहीं प्रत्यय लागून गोत्रनामें ऊर्फ आडनांवें झालीं. हीं आडनांवें सध्यां हि प्राकृत रूपानें महाराष्ट्रांत चालू आहेत. भाटे हें आडनांव शांडिल्य, कपि, गार्ग्य, जामदग्नि, अत्रि, भार्गव व गौतम, इतक्या गोत्रांत आहे. भाटे म्हणजे भ्राष्ट्रेयाः. गोडशे, गोरे, खुळे, आचार्य, फणशे, मुळ्ये वगैरे अनेक आडनांवें अशीं अनेकगोत्री आहेत. खुद्द गोत्रप्रवरग्रंथांत तीं च तीं गोत्रनामें निरनिराळ्या गणांत येतात. तो च प्रकार सध्यां हि दृष्टीस पडतो. ह्यावरून एक गोष्ट निष्पन्न होते, ती ही कीं, पांच हजार गोत्रांपैकीं प्रत्येक गोत्राखालीं जर सारीं च पडूं शकतात, तर एकंदर गोत्रें ५००० × ५०००= २५०००००० दोन कोट पन्नास लाख होतात. बौधायन तर म्हणतो कीं गोत्रें अर्बुद आहेत. वरील गणित पहातां बौधायनाचें म्हणणें साधार दिसतें व बौधायनकालीं ब्राह्मणसंख्या किती मोटी होती याचा स्थूल अंदाज होतो.

देवरुखे, पळशे, सवाशे, शेणवई, तिर्गूळ, गोळक, वगैरेंच्या आडनांवांची हि वरीलप्रमाणें च व्यवस्था असलेली दिसेल, ह्यांचीं गोत्रें मीं अद्याप जमविलीं नाहींत.

क्षत्रिय दोन प्रकारचे, सार्ष व अनार्ष. पुरोहितप्रवरो राज्ञः, असें आश्वलायन श्रौतसूत्रांत म्हटलेलें आहे. तत्रापि, शुंग, मौर्य, गुप्त, शालिवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, दान, इंद, चालुक्य, चौलुक्य, गुहिल, गांग, गुप्त, सिंद, वगैरे आडनांवें गोत्रनामें असलेलीं स्पष्ट दिसतात. ताम्रशिलापट्टांत हारीत, आंगिरसहारीत, काश्यप, कौंडिन्य, मानव्य, वगैरे गोत्रें क्षत्रियांचीं दिलेलीं आढळतात. वासिष्ठीपुत्र, गौतमीपुत्र, माठरीपुत्र, वगैरे नांवें जशीं शातवाहनवंशांत सांपडतात तशीं ब्राह्मणांतील आचार्यवंशपरंपरेंत हि सांपडतात. काळे, पांढरे, गोरे, गोळे, गाढवे, साठे, वगैरे गोत्रनामोत्पन्न आडनांवें मराठ्यांत अद्याप आहेत. त्यावरून असें दिसतें कीं, मराठ्यांत ऊर्फ क्षत्रियांत ब्राह्मणांच्या प्रमाणें च गोत्रें आहेत. परंतु, इतकें खरें कीं, क्षत्रियांचीं गोत्रें व प्रवर त्यांना तोंडपाठ असण्यापेक्षां त्यांच्या पुरोहितांना जास्त तोंडपाठ असत. उघड च आहे, इतर विवंचनेपुढें गोत्रांकडे लक्ष्य देण्यास त्यांना वेळ नसे. ब्राह्मणानां राजार्पितानां राज्ञां वा ब्राह्मणार्पितानां, असें सूत्रवचन आहे. राजाला अर्पण केलेल्या ब्राह्मणाचें गोत्र जें राजाचें तें, व ब्राह्मणाला अर्पण केलेल्या राजाचें गोत्र जें ब्राह्मणाचें तें, असा प्रघात असे. वैश्यांची हि हीच तऱ्हा. जैन लोकांत गोत्रें आहेत. तीं हि गोत्रांचा अभ्यास करणाऱ्याला जुळविणें मोठें फलप्रद होईल यांत संशय नाहीं.

गाणगारि वगैरे तांडिन आचार्य सर्ववर्ण एकार्षेय मानीत. सर्ववर्णांचें आर्ष ' मानव ' असें तें म्हणत. त्याला आधार, मानव्यो हि प्रजा इति हि ब्राह्मणं । हा देत. परंतु, हें एकप्रवराचें व एकगोत्राचें मत श्रौतकर्मवरणांत मान्य करीत, विवाहादि-संस्कारांत मान्य करीत नसत. कारण, तसें केल्यास समानप्रवऱ्यांचा विवाह होऊं लागेल अशी अडचण येई व समानप्रवरांचा विवाह आर्यांना केव्हां हि मान्य नसे. तात्पर्य, एकप्रवरत्वाचें हें मत सर्वसंमत होण्यासारखें नव्हतें. तत्त्वतः सर्व प्रजा मनूपासून निघाली असें मानीत. परंतु व्यवहारांत असंख्य गोत्रें व असमानप्रवर-विवाह चालू असत.

१२ येणेंप्रमाणें कऱ्हाडे, कोंकणस्थ व देशस्थ यांच्या गोत्रांची परंपरा आहे. सप्तर्षींपर्यंत यांचीं गोत्रें जातात व तेथपासून आतां-पर्यंत व आपल्यापर्यंत वंश आणून भिडवितां येतो. अशा ह्या वंशांत अहिंदूंचा समावेश होण्याचा बिलकुल संभव व शक्यता नाहीं. अगस्तीसह आठ ऋषि, ४९ प्रवर व अर्बुद गोत्रें, नंतर प्राकृत गोत्रें व नंतर मराठी आडनांवें, अशी अव्याहत परंपरा आहे. भारतीय आर्यांचा वंश येणेंप्रमाणें महाराष्ट्रांत बिनतूट व अस्खलित चालत आलेला आहे. वंशेतिहासाचीं आपल्या इकडे जितकीं साधनें आहेत तितकीं विपुल साधनें अन्यदेशांत व अन्य समाजांत क्वचित् च सांपडतील.

दर सांगितलेल्या प्रथमसंमेलनवृत्ताशिवाय कै. राजवाडे यांनीं सरस्वतीमंदिर मासिक, ग्रंथमाला मासिक, भा. इ. सं. मंडळाचीं इतिवृत्तें व इतिहाससंग्रह मासिक यांतून आडनांवांच्या व्युत्पत्त्या प्रसिद्ध केल्या आहेत. शिवाय राजवाड्यांनीं कोशासाठीं म्हणून ज्या चिठ्ठ्या लिहून ठेविल्या होत्या, त्यांतही कांहीं आडनांवांच्या चिठ्ठ्या लिहिलेल्या आहेत.

या सर्व ठिकाणची आडनांवांची व्युत्पत्ति घेऊन तिचा सवावेश या पुढील कोशांत केला आहे. त्यांपैकीं प्रथम संमेलनवृत्तामध्यें आडनांवांच्या अगर गोत्रनामांच्या ३ याद्या दिलेल्या आहेत. त्यांत पहिली यादी ३९१ आडनांवांची असून तींत देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे, मराठे व प्रभु यांचीं आडनांवें दिलीं आहेत. हीं आडनांवें पुढील कोशांत देतांना हीं सर्वसामान्य आडनांवें आहेत हा अर्थ व्यक्त करण्यासाठीं त्यांचे पुढें ' स ' हें अक्षर खुणेसाठीं योजिलें आहे.

दुसरी यादी कऱ्हाडे ब्राह्मणांच्या आडनांवांची असून तींत ७३ आडनांवें आलीं आहेत. हीं आडनांवें कोशांत देतांना त्या प्रत्येकापुढें ' क ' हें अक्षर खुणेसाठीं योजिलें आहे.

तिसरी यादी कोंकणस्थांच्या आडनांवांची आहे. या यादींत गोत्रोत्पन्न आडनांवें १३१ दिलीं आहेत. हीं कोशांत देतांना त्यांचेपुढें ' कों ' असें अक्षर योजिलें आहे. शिवाय कोंकणस्थांचीं गांवावरून व धंद्यावरून जीं आडनांवें पडलीं आहेत तींही राजवाड्यांनीं या माहितींत दिलीं आहेत. तीं कोशांत देतांना त्यांचेपुढेंही ' कों ' हें अक्षर योजिलें आहे.

या शिवाय राजवाड्यांनीं इतिहाससंग्रह मासिकांत ' कोंकण व नागलोक ' असा निबंध प्रसिद्ध केला आहे. त्यांत कांहीं मराठ्यांच्या आडनांवांची व्युत्पत्ति दिली आहे. तीं आडनांवें या कोशांत घेतलीं असून तीं मराठ्यांचीं आहेत हें कळण्यासाठीं त्यांचे पुढें ' म ' हें अक्षर योजिलें आहे.

सरस्वतीमंदिर, ग्रंथमाला, इतिहाससंग्रह व भा. इ. सं मंडळाचीं इतिवृत्तें यांतून ज्या आडनांवांची व्युत्पत्ति घेतली आहे, ती कोशांत देतांना त्या आडनांवांचे पुढें ती ज्या पुस्तकांतून घेतली त्याचें नांव तेथें दाखल केलें आहे.

राजवाड्यांनीं कोशासाठीं लिहून ठेविलेल्या चिठ्ठ्यांतून ज्या आडनांवांची व्युत्पत्ति घेतली आहे, त्यांचेपुढें कोणतेंच अक्षर घातलेलें नाहीं. करितां कोणतेंही अक्षर नसलेली आडनांवाची व्युत्पत्ति ही त्यांचे चिठ्ठ्यांमधील व्युत्पत्ति आहे असें समजावें.

अ

अगस्ते – अगस्तिः (स)

अत्रे – आत्रेयाः (स)

अद्कारी, अधकारी, अधिकारी – अधिकारिः (स)

अधिकारी – अधिकारिः (क)

अंधे – १ अंधकः (स)

–२ अधलः (स)

अनंतपइ प्रभु – हें नांव वसईस सांपडलेल्या शक १०८२ च्या शिलालेखावर आहे. अनंतपति = अनंतपइ (ग्रंथमाला)

अंबार्डेकर – ग्रामनामावरून (क)

अवटे – अवट्याः (स)

अवतणे – अवतानाः (स)

अवस्ति – औत्साः (स)

अष्टपुत्रे – अष्टाकिपुत्रः (स)

आ

आगटे – आगस्त्याः (क) (स)

आंगरे – १ आंगिरसाः (स)

–२ अंगराजः = अंगराअ = आंगरा – रे. आंगरे हे अंगदेशांतील राजे मूळचे.

आगलावे – अग्निलोमन् (स)

आगलोवे – अग्निलोमन् (स)

आगाशे – १ आकशायेयाः (स)

–२ आकशायेयाः (कों)

आचवल – आश्वलाः (स) (कों)

आचारी – आचर्याः (स)

आचार्य – आचर्याः (स) (कों)

आचार्ये – आचर्याः (क)

आज्ये – अजाः (क) (स)

आठवेले – (अष्ट) पैलाः (कों)

आत्रे – आत्रेयाः (स)

आथर्वण – १ आथर्वणिक (पुरोहित) = आथर्वण. हें देशस्थांत आडनांव आहे.

–२ आथर्वणिकाः (स)

आद्ये – आद्यहयाः (क) (स)

आंबिके – आंबिकेयाः (स)

आराध्ये – राध् संसिद्धौ. आराधिकः = आराध्या
(आडनांव धंद्यावरून) (धा. सा. श.)
आसकारे – आयस्कारयः (स)
आश्वल – आश्वलायनाः (स)

इ

इडविडे – ऐलविलाः (स)

उ

उखळे – उलूखलः (स)
उंचमाने – उच्चैर्मन्यवः (स)
उपाध्ये – (पाध्ये पहा)
उंबरे – औदुंबरायणाः (स) (क)
उमराणी – कऱ्हाडप्रांतीं उमराणी हें आडनांव देशस्थ ब्राह्मणांत आहे. औदुंबरायणिः = उंबराअणि = उमराणी. उदुंबराचा पोर औदुंबरायण. त्याचा पोर औदुंबरायणि. (भा. इ. १८३३)
उसणारे – १ हें आडनांव महाराष्ट्रांत ब्राह्मणादिकांत आहे. हें उशीनरस् या संस्कृत जनपददेशवाचक शब्दापासून आलेलें दिसतें. (भा. इ. १८३२)
–२ औषीनराः (स)
उळवे – औलपीयाः = उळवे.

ए

एडके – ऐरवयाः (स)

ओ

ओगले – औकुलाः (स) कों)
ओगवे – १ औपगविः (स)
–२ औपगवः = ओगवे (औपगवस्य अपत्यं) (स)
–३ (उपगोः अपत्यं पुमान्) औपगवः = ओगवा.
ओगुले – औकुलाः (स)
ओझा – (पाध्ये पहा)
ओडलमने – औदलाः मन्याः च (स)
ओझे – औध्याः (स)
ओरपे – औलोप्याः (क) (स)

औ

औटे – अवट्याः (स)

क

कंक – कंक (क्षत्रिय) = कंक. एसाजी कंक हें नांव प्रसिद्ध आहे. हें घराणें भोराजवळ आहे. (भा. इ. १८३३)
कटके – काठकाः (कों) (स)
कट्टी – कृष्टिः = कट्टि, कट्टी. हें कानडा देशांत आडनांव आहे. कृष्टि म्हणजे विद्वान् माणूस. (भा. इ. १८३५)
कणव – कण्वाः (स)
कपटे – कापटुः (स)
करकरे – कर्तृकरः (agent) = करकरे (ब्राह्मण आडनांव कऱ्हाडे). (पाणिनि ३-२-२१)
करंजे – कौरंजिः (स)
करमरकर – कर्मारकेराः (स) (कों)
करवीर – प्रांतावरून (कों)
करवे [सं. करवीरकर – महाराष्ट्री – करवीअअ – मराठी – करवे] (म) (इतिहाससंग्रह)
कर्वे – कौरव्याः (स)
कर्वे (कोर्वे) – १ कौरव्याः (कों) (क)
–२ [कौरव्याः = कोरवे = करवे = कर्वे] कौरव्याः ब्राह्मणाः (कौमुदी)
कलवडे – कलवाट = कलवाड = कलवडे. कलवड गांवचा राहणारा तो कलवडे. (ग्रंथमाला)
कवंडळे – कामंडलेयाः (स)
कवडे – कौहडः = कोवडे = कवडे.
कवी – काव्याः (स)
कळफे – कालाकिः (स) (क)
कळशे [सं. कलश – महा. कलस – मरा. कळशे] (म) (इतिहाससंग्रह)
काखवटे – काक्षीवताः (स)
काजळे – कासलयः (क) (स)
काटे – कताः (स)
काठे – काथकाः (क) (स)
कांठे – काथकाः (क)
कांडदरे – कांडोदरिः (क)
काणव – कण्वाः (स)

काणे – १ कानीनाः (स) (कों)
–२ कर्णायनाः (कों)
–३ कर्णायनः (स)
–४ काण्वाः (कों)
काण्हेरे – काणिकेरः (स)
कातरणे – कातरायणाः (कों)
कातरे – कातरायणाः (स)
कात्रे – कर्तृणः (क) (स)
काथवटे – काक्षीवताः (स)
काथे – कथकाः (स)
कानडे – १ कार्णाटाः (कों) (क) (स)
–२ [कर्णाढकाः (the decendants of कर्णाटक proper name of a man) = कानाडे = कानडे] हें महाराष्ट्रांत कोंकणस्थ ब्राह्मणांत आडनांव आहे.
कानिट (करः) – कनिष्ठयः (स)
कानिटकर (केर प्रत्यय) – कनिष्ठिः (कों)
कानेटकर (केरः) – कनिष्ठयः (क)
कान्हेरे – काणिकेराः (कों)
कापडी – कापट्टः (क)
कापरे – कार्पूराः (कों) (स)
कापरेकर – कापरेकेर – ग्रामनामावरून (कों)
कापशे – कापिश्यायनाः (कों) (स)
कापसे – काप्याः = कापसे (प्य = पिय = पिज = पिस) (स)
कांबळे – काबल्याः (स)
कामळे – कंबलायनः (स)
कालेंकर – कालेंकेर – ग्रामनामावरून. (कों)
कालरस – कालशीर्षिः (स)
कावळे – १ कावल्याः (क) (स)
–२ कामलायन from कमल or कामल. कामल=कावळा-ळे. महाराष्ट्र ब्राह्मणांत आडनांव आहे.
–३ कामलाः (स)
काळीयै [सं. कालीय – महा. कालीअ – मरा. काळीयै, काळये, काळे] (म) (इतिहाससंग्रह)
काळे – १ कालेयाः (स) (क) (कों)
–२ काल्यायनाः (स)
–३ कालीय (म) (काळीयै पहा)
काळये – कालीय. (म) (काळीयै पहा)

किंकरे – कैंकरायणाः (स)
किराणे – करायणाः (क)
कुकडे – कौकंटिः (स)
कुंचे – कृत्स्नः (स)
कुंजे – कौंजायनाः (स)
कुटरे [सं. कोटकर–महा. कोट्टरअ–मरा. कुटरे] (म) (इतिहाससंग्रह)
कुटे – कौटाः (स)
कुंटे – कौटाः (मूळ कुटे–अनुनासिक आगंतुक) (कों) (स)
कुबेर – कौबरिकेयाः (स)
कुसळे – कौसल्यायनिः (स)
कुसे – कृत्स्नः (स)
केतकर – केतकीकेर – ग्रामनामावरून. (कों)
कैकेणी – किकायनाः (स)
कोकटे – [सं. कर्कोटक – महा. कक्कोडअ – मरा. कोकटे, गोकटे] (म) (इतिहाससंग्रह)
कोकणे – प्रांतावरून (कों)
कोंकणे – सं. कुकुण (म) (इतिहाससंग्रह)
कोकरे – सं. कुकुर. (म) (इतिहाससंग्रह)
कोकीळ – कोकिलाः (स)
कोटिभास्कर – १ कौटिश्चासौ भास्करः (क)
–२ कुटः (कौटिः) चासौ भास्करः = कौटिभास्करः- कौटि गोत्रांतील भास्कर. कौटिभास्कराचे वंशज जे ते कौटिभास्कर. कौ = को (कोटिभास्कर) (स)
कोटे – कौटाः (स)
कोठारे – कौठाराः (स)
कोतवाल – कोट्टपाल = कोटवाल = कोतवाल. (भा. इ. १८३२)
कोरडे – कौरंडजाः (स)
कोरवे – कौरव्याः (स)
कोले – क्रोष्टुकिः (क)
कोल्हे – १ क्रोष्टुकिः (क)
–२ क्रौष्टुकिः (स)
कोशे – १ कौशीतकेयाः (स)
–२ कौशिकाः (स)
–३ कौत्साः (स)
कौशिक – कौशिकाः (स)
क्षीरसागर–(क्षीरहृद = क्षीरसागर) = क्षीरसागर (स)

ख

खरे – खरिकाः (स) (कौं)

खाडे – खाडायनाः (स)

–२ खाडाः (स)

खांडे (कर) – खाडायनाः (क)

खानखोजे – [कान्यकुब्जः = कान्हकुज्जा = खानखोजा (एकवचन) खानखोजे (अनेकवचन). खानखुजा हें मधलें रूप.

हें खानखोजे आडनांव ब्राह्मणांत व इतर जातींत आहे. तेलंग, कानडे, बंगाली, गुर्जर, भुसकुटे (भोजकटीय) हीं आडनांवें जशीं देशावरून पडलीं आहेत, तसेंच खानखोजे हें आडनांव देशावरून पडलें आहे.

खापरडे – खर्परवाट = खापरवाड. खापरवाडचा राहणारा तो खापर्डे, खापरडे. (ग्रंथमाला)

खांबेटे – स्कांभायणाः (कौं)

खारकर – कारकरः (agent) = खारकर (परभू आडनांव) पाणिनि ३–२–२१

दिवा–विभा–निशा–प्रभा–कार–कर्माणि सुपि करोतेः टः

खेर – १ खदिराः (स)

–२ खेलकः (क)

खैर – खदिराः (स)

खोडके – क्षौद्रक्याः = खोडके

बाहीक देशांतील एक आयुधजीवि संघ.

खोडके हें मराठ्यांत एक आडनांव आहे.

खोले १ कोहलः (स)

–२ कहोलाः (स)

ग

गणपुले – १ गणपूरक = गणपुले

गणपूरक means the whip who secured the quorum at a meeting of the गण.

–२ गणपाः = गणपुले (स्वार्थे ल) (कौं)

–३ गणपतीच्या पुळ्याचे राहणार (स)

गद्रव – गर्धभः (स)

गद्रे – गाधरायणाः (स) (कौं)

गरदे – हें आडनांव कऱ्हाड्यांत आहे.

अगारदाही गरदः कुंडाशी सोमविक्रयी

(मनुस्मृति तृतीयोध्याय, १५८)

गरदः मरणहेतुद्रव्यस्य दाता (कुल्लूक)

गरद ब्राह्मण म्हणजे मारण्याच्या हेतूनें विषद्रव्य देणारा वैद्य ब्राह्मण— गरद याचा मराठी अपभ्रंश गर्दे, गरदे.

(भा. इ. १८३४)

गर्गे – गार्ग्याः (स)

गलगिल्ये – गालगिलाः (क)

गांगल – १ गांगाः = गांगल (स्वार्थे ल) (कौं) (स)

–२ गांगायनः (कौं)

गाडगीळ – १ गालगिलः (स)

–२ गालगिलाः (कौं)

गाडवे – गालवाः (स)

गांडे – गांड्याः (स)

गांड्ये – गांड्याः (स)

गात – गाधिनाः (स)

गाथ – १ गाथिनः (कौं)

–२ गाधिनाः (स)

गांधारे – गांधारायणाः (कौं)

गानू – ज्ञानायनाः (कौं)

गायकवाड – गोकवाट = गैकवाट = गायकवाड.

गोक + वाट = गोकवाट. वाट = क्षेत्र, जमीन, थळ. गोक नांवाच्या थळाचे वतनदार. गोचें गै असें जुन्या मराठींत रूप आहे. शूद्रादि लोकांच्या बोलण्यांत हें जुनें अपभ्रष्ट रूप येतें. (ग्रंथमाला)

गायतोंडे – १ गोतुंडाः = गायतोंडे (गोत्रनाम)

(भा. इ. १८३६)

–२ गोतुंडिकः = गायतोंडे (आडनांव)

गोतुंड हें ऋषिनाम आहे.

गायधनि – गाधिनाः (स)

गायधनी – गाधिनः (स)

गारदी – हें आडनांव महाराष्ट्र ब्राह्मणांत आहे.

अगारदाही = (अलोप) गारधी = गारदी. फ्रेंच Guarde पासून निघालेला गारदी शब्द निराळा.

(भा. इ. १८३४)

गिरपे – गैरायणाः (स)

गिरमे – ग्रैष्मायणाः (स)

गुचके – ग्लुकुचायनिः (स)
गुप्ते – १ गौप्तेय (स)
शालिवाहनाच्या चौथ्या शतकांतील गुप्त सम्राटाशीं या आडनांवाचा संबंध दिसत नाहीं.
–२ गौप्तेयाः (स)
गुळवे – गुडवाहक = गुळवाहअ = गुळवा = गुळवे (आडनांव – व्यापारी) (ग्रंथमाला)
गोकटे – कर्कोटक. (म) (कोकटे पहा)
गोखले – १ गोकल्याः = गोखले (स्वार्थेल) (स)
–२ गोकालिः (कौं) (स)
–३ गोकक्ष्याः = गोखले (स्वार्थेल) (कौं)
गोगटे – कौकंटिः (कौं)
गोंगले – गुग्गुलिः (स)
गोडबोले – (गौड) बोलयः (कौं)
गोडसे – गोष्ठश्व = गोठ्ठस्स = गोडस (सा–सी–सें) (भा. इ. १८३४)
गोडे – गोदायनाः (क)
गोंधळे – गौधिलिः (कौं) (स)
गोंधळेकर – गोंधळीकेर – ग्रामनामावरून. (कौं)
गोफणे – गोपवनाः (स)
गोरे – गौराः (कौं) (क)
गोवंड्ये – १ – कौमंडाः (स)
–२ – कौमंढाः (कौं)
गोळ्ये – गौरव्याः (कौं)
गोळये – गोलेयाः (स)
गौतम – गौतमाः (स)

घ

घरत – अगारस्थ = (अलोप) घारत, घरत
घाटगा – घाटघः, घाटघ्नः = घाटघा = घाटगा, घाडगा. घाट मारणारा तो घाटगा (घाटांत दरवडा घालणारा)
घाटघे – घाटघ्नः (घाडगे पहा)
घांटपांडे – घंटापथिकः = घांटपांडे
घांटपांडे हें ब्राह्मणांत आडनांव आहे.
घंटापथ म्हणजे राजमार्ग–तेथील कर वसूल करणारा जो अधिकारी तो घंटापथिक.
घांटपाडे असा मूळ उच्चार. नंतर घांटपाडे यांचें घांटपांडे झालें.

घाटे – घाट = मर्यादा. देशाच्या मर्यादेवर जकात गोळा करणारा अधिकारी जो तो घाटा. (ग्रंथमाला)
घांटे – घांटिकः (घांट्या पहा)
घांट्या – घांटिकः (a bard who sings in chorus ringing a bell in presence of God's images) = घांट्या, (plu) घांट्ये, घांटे
घांट्ये – घांटिकः (घांट्या पहा)
घाडगा – घाटघः, घाटघ्नः (घाटगा पहा)
घाडगे – घाटघ्नः (a robber in the घाटs) घाटघे, घाडगे (आडनांव झालें आहे).
घाडघा – घाटघातः = घाडगा, घाडघा (आडनांव मराठा)
घारत – अगारस्थ. (घरत पहा)
घारपुरे – कारपूरयः (कौं) (स)
घुगरे – गुग्गुलिः (क)
घुले – गुह्लिलाः (कौं)
घोडके – गौरिकिः (स)
घोडमुखे – घोटमुखाः (स)
घोले – गुह्लवः (स)
घोल्ये – १ गौह्लयाः (स)
–२ (गुह्लु) गौह्ल्याः (स)

च

चवंडे – छमंडः (पोरका) = चवंडा. चवंडे हें ब्राह्मणांत देशस्थांत आडनांव आहे. (भा. इ. १८३३)
चांद्राते – चंद्रात्मन् = चंदरत = चाँदरात = चांदराते (अनेकवचन). ज्यांच्या घरीं चांदरात झडते ते चांदराते, अशी व्युत्पत्ति हि होईल. (भा. इ. १८३२)
चारणे – चारायणः (स)
चितळे – १ आसिताः = चितळे (अलोप स्वार्थेल.) (कौं)
–२ असित (स)
चित्रे – १ चैत्राः (स)
–२ चैत्रेयाः (स)
–३ चित्रकरः (painter) = चित्रे (परभू आडनांव) चित्रकः (painter) पाणिनि ३-२-२१
चिपळोणकर – ग्रामनामावरून (कौं)

चोरघा १ चोरघातः = चोरघा.

अमनुष्यकर्तृके च (३-२-५३)

चोरघा हें मराठ्यांत आडनांव आहे.

-२ चोरघ्नः = चोरघा. आडनांव आहे.

चोरघे – चोरघातः = चोरघा (आडनांव).

चोरे – चतुरकः = चोरे (आडनांव).

चोळके – चौलुक्याः (स)

चौधरी – हा शब्द चक्रधारी या संस्कृत शब्दापासून निघालेला आहे. चक्र म्हणजे पांच-चार गांवांचा समूह. त्यांचें काम पहाणारा जो तो चक्रधारी. **चक्रधारी = चकरधारी = चअरधारी = चवधारी = चौधारी = चौधरी.**

चक्र म्हणजे व्यापाऱ्यांचा वगैरे संघ. त्यांचा जो मुख्य तो हि चौधरी या शब्दानें म्हणजे चक्रधारी या शब्दानें ओळखला जात असे व जातो.

चौधरी हा शब्द हिंदी, बंगाली, गुजराथी वगैरे गौड भाषांत आहे.

चतुर्धर असें एक विशेषनाम एका ग्रंथकाराचें (उदा. नीलकंठ चतुर्धर) सापेक्षतः बऱ्याच अर्वाचीन ग्रंथकारांचें आहे. हा चतुर्धर शब्द संस्कृत नाहीं. चौधरी या प्राकृत शब्दाचें संस्कृतीकरण करून हा चतुर्धर शब्द बनविलेला आहे. तेव्हां ह्या चतुर्धर शब्दाकडे विशेष लक्ष देणें नलगे. चौधारी हा उच्चार अशिष्टांत अद्याप ऐकूं येतो. (भा. इ. १८३५)

चौवळ – चौवलः, चौवलः (स)

छ

छत्रे – छत्रिणः (कों) (स)

ज

जगदळे – सिंघण यादवाच्या इ. स. १२२२ तल्या एका लेखांत **जगदळ पुरुषोत्तम** असें एका अधिकाऱ्याचें नांव आलें आहे. (भा. इ. १८३२)

जडे १ जाडायनः (क)

-२ जाडायनाः (स)

जन्ये – जायनिः (क)

जमदग्नि – जामदग्न्यः (स)

जयवन्त – द्रोणपर्वतजीवन्तादन्यतरस्याम् (४-१-१०३)

एभ्यो गोत्रे फग् वा । जैवंतायनः जैवन्तिः वा ।

जीवन्त नामक मूळ गोत्रोत्पादक पुरुषापासून जे उत्पन्न झाले ते जैवन्तायन किंवा जैवन्ति. जैवन्ति शब्दाचा मराठी अपभ्रंश जैवन्त किंवा जयवंत. जय (जिंकणें) या शब्दाशीं जयवंत, जैवंत या प्रभु आडनांवाचा कांहीं एक संबंध नाहीं. (प्र. सं. वृत्त)

जरकारे – जारत्कारवः (स)

जाइल – जायनिः (कों)

जामडे – जामदग्नाः (स)

जालंधर – जालंधरिः (स)

जेधे – यौधेयः = जउधेआ = जइधा = जेधा. the जेधाs are योधेयs from यौधेयपुर = जोधपुर.

जोग – (प्राचीन) योगाः (कों)

जोगदेव – सिंघण यादवाच्या इ. स. १२२२ तल्या एका शिलालेखांत **जोगदेव** हा **दंडनायक** होता असें म्हटलें आहे. (भा. इ. १८३२)

जोगधर – युगंधराः = (कों) (स)

जोगळेकर - १ यौगोलिः = जोगळेकर (केर प्रत्यय) (कों)

– **२** यौगोलिः = जोगोळि (कर) = जोगळेकर (स)

जोशी – **१** धंद्यावरून (कों) (क)

-२ मूळ संस्कृत ज्योतिषी; त्याचें प्राकृत जोइसी; त्याचें वर्तमान मराठी जोशी. जोइसी, जोइशी हें रूप १७ व्या व १६ व्या शतकांतील कित्येक मराठी वांटपपत्रांत येतें. (सरस्वतीमंदिर शके १८२६)

झ

झा [उपाध्याय] (पाध्ये पहा)

ट

टट्टू – त्वन्द्रक (तट्टू पहा)

टाकरे – तत्करः (master's obedient servant doing that, servant तस्य करोति = तत्करः) = टाकरे = ठकरे (परभु आडनांव) (पाणिनि ३-२-२१)

टिके – तैकायनिः (स)

टिकेकर – तैकायनिः (स)

टेणे – टैकायणाः (कौं)
टोळे – स्थौलेयाः (कौं)

ठ

ठकार – स्थागारिकः one who polices the harem = टकार, ठकार.
ठाकरे – तस्करः (टाकरे पहा)
ठाकूर – ठक्कुर – (देवप्रतिमा) ठक्कुरिक one who serves a deity = ठाकूर (आडनांव)
ठोंबरा – १ स्तंबेरमः = ठोंबेरा = ठोंबरा
–२ स्तंबेरमः = ठंबेरा = ठोंबरा
ठोले – स्थौलाः (स)

ड

डाकणे – दाकायनाः (स)
डुवल – दुर्बल = डुब्बल = डुबल. दुर्बल म्हणजे षंढ, खोजा, अंतःपुररक्षक. डुबल हें आडनांव ब्राह्मणांत व मराठ्यांत आहे.
डिके – दिश्याः (स)
डेकणे – दाकायनाः (स)
डोळे – दौलेयाः (स)

ढ

ढवळे – धवलाः (क) (स)
ढेकणा – दिदृक्षेण्यः (ढेकणे पहा)
ढेकणी – दिदृक्षेण्यः (ढेकणे पहा)
ढेकणे – १ दिदृक्षेण्यः worthy to be seen (vaidik) = ढेकण्या, डेकणे-णा-णी (हें महाराष्ट्रांत ब्राह्मणांत आडनांव आहे).
–२ दाकायनाः (स)
ढोर –धौर (कुलिकाः) (क) (स)
ढोले – धौलाः (क) (स)

ण

णंदे – १ नानान्द्राः (स)
–२ सं. नंदक. (म) (नंदे पहा)

त

तखे [सं. तक्षक – महा. तखअ – मरा. तखे, तिखे]
(म) (इतिहाससंग्रह)
तट्टू – हें आडनांव देशस्थ ब्राह्मणांत आहे.
(त्वष्ट् ऋ) त्वष्टृ = तट्टु = टट्टू, तट्टू.
(भा. इ. १८३३)
तळेकर – सं. तलकर = तळेकर (तल प्रांतांत राहणारे)
(म) (इतिहाससंग्रह)
ताटके – तार्काः (क) (स)
तांबे – ताम्रायणाः (स) (क)
तांबोळी – तांबुलिकः (वागळे पहा)
ताम्हणे – ताम्रायणाः (स)
तारणे – तार्णायनाः (स)
तिके – तैकायनिः (स)
तिखे – १ तैकायनिः (स)
–२ तृक्षाः (स)
–३ तितिक्षाः (स)
–४ तक्षक (म) (तखे पहा)
तितरे – सं. तित्तिरि (म) (इतिहाससंग्रह)
तिरशिंगे – त्रैशृंगः (स)
तुरुक – तरुक्षाः (स)
तुळपुळे – १ तौल्वलयः (कौं)
२ – तौल्वलयः (स)
तुळवे – तौलमीयाः (आडनांव आहे)
तेले – तैलेयः (स)
तोरो – तरुक्षाः (स)

थ

थिटे – आधिधेयाः (स)

द

दंडके – दांडकीयाः (दांडके पहा)
दडपे – दण्डपायनाः (स)
दंडे – दंडिः (स)
दत्ते – दात्तेयाः (स) (क)

दर्वे – दार्भिः (कों)
दर्व्ये – दार्भिः (स)
दवणे – दामनीयाः = दावणे = दवणे. अष्टाध्यायी ५-३-११६
दळवी – (शेणवी पहा)
दांडके – दांडकीयाः = दांडके, दंडके.
दावक – ज्ञापक = दापक = दाबक (ग्रंथमाला)
दांडे – १ दंडिः (स)
–२ दाण्डाः (स) (कों)
दांडे (कर, केर प्रत्ययापासून) – दांडिनायनाः (कों)
दांडेकर – दांडिनायनाः = दांडेकर (केर) (स)
दातार – दात्रेयाः (कों)
दाते – १ दातेयः (कों)
–२ दात्तेयाः (स)
दाभणे – दार्भायणाः (स)
दामले – १ दामाः = दामले (स्वार्थे ल) (कों)
–२ दामाः (स)
दारवटेकार – द्वारप्रकोष्ठहारी = दारवठेकार, दारवटेकार.
दारवठेकार – द्वारप्रकोष्ठहारी.
दारवठेकार – द्वारपथ = दारवठा, दारोठा, दारवंठा, वारोठा.
दावलभक्त – दावालः = दावल. दावालश्चासौ भक्तश्च दावलभक्त. (स)
दीक्षित – धंद्यावरून (क) (कों)
दिमोटे – द्वैमत्याः (स)
दुर्गे – दौर्गायणाः (स)
दुळीप [सं. दिलीप. मरा – दुळीप, धुळप] (म)
(इतिहाससंग्रह)
देव – १ दैवदत्ताः = देव (एकशेष) (स)
–२ देवाः (कों) (स) (क)
देवल – देवलः (कों)
देवळे – देवल हें आडनांव सध्यां महाराष्ट्र ब्राह्मणांत आहे. (मनुस्मृति-अध्याय तिसरा. श्लोक १५२ कुल्लूकः) – देवलः प्रतिमापरिचारकः । देवकोशोपभोजी च नाम्ना देवलको भवेत् । देवल म्हणजे प्रतिमेचा परिचारक ब्राह्मण. देवल हें आडनांव निराळें. तें देवल ऋषिनामापासून आलें आहे. (भा. इ. १८३४)
देवस्थळी – देवस्थानिः (स) (क)
देशमुख – धंद्यावरून (कों)
देसाई – देशपति = देसवई = देसाई.
(ग्रंथमाला – मंगळवेढें येथील शिलालेख)

ध

धराधर – धरधर (कृष्ण) = धराधर (आडनांव)
धाकरस – १ दाध्रेकच्छिः (क)
–२ दाध्रेकर्षिः (स)
धुमे – धौम्याः (स)
धुरू – अध्वर्युः = धुरु (आडनांव आहे)
धुळप – सं. दिलीप. (म) (दुळीप पहा)
धोत्रे – दौहित्राः (स)

न

नकटे – नैकटिः (स)
नगरकर – १ नागरक = नगरकर } नागरक म्हणजे town clerk } कौटिल्य-अर्थशास्त्र
नगरक शब्दाला र जोडला आहे (आडनांव)
नगरकर म्हणजे नगर शहरांतला राहणारा हा शब्द निराळा.
–२ ग्रामनामावरून. (कों)
नंदे – १ नंदिः (स)
–२ नानान्द्राः (स)
–३ [सं. नंदक – महा. णंदअ – मरा. – नंदे, णंदे] (म) (इतिहाससंग्रह)
नरटे – नाराट्यः (स)
नराणे – १ नाराणाः (कों)
–२ नारायणाः (स)
नवघरे – नवग्रामाः (स)
नवरंगे – नवरंग = केशरीवस्त्र. नवरंगे – केशरी वस्त्र रंगविणारे किंवा वापरणारे. हें आडनांव आहे. (ग्रंथमाला)
नवाथे – १ नपात्यः (स)
–२ नपात्याः (क)
नाखरे – नैकरिः (क) (स)
नाग [सं. नाग – महा – नाग – मरा – नाग] (म)
(इतिहाससंग्रह)
नागवे [नागपति = नागवइ = नागवी = नागवे] (म)
(इतिहाससंग्रह)
नाचण – नृत्यायनाः (स)
नाचणे – नृत्यनाः (स)
नाटेकर – नाटेराः (स)

नाणवटी – नाणवंटक = नाणवटी. नाण्याचा बटवडा करणारा जो तो, सराफ. नाणावटी, नानावटी, हें आडनांव गुजराथ्यांत अद्याप आहे.

नामांकनं = नाआंअणं = नाणँ

हा शब्द संस्कृतांतून प्राकृतांत आला आहे.

(भा. इ. १८३४)

नांदे – नंदिः (स)

निचुरे – १ [सं. निष्ठूरिक – महा – निट्ठरिअ – मरा – निचुरे] (म) (इतिहाससंग्रह)

–२ निचोराणिः (स)

नित्सुरे – निचोराणिः (स)

नेकणे – नैकर्णिः (कों) (स)

नेवरे – नैकरिः = (नेअरि) नेवरे (कों)

प

पंगे – पैंग्याः (स)

पंचनदीकर – पांचनदाः (स)

पटवर्धन – धंद्यावरून (कों) (क)

पठाण – प्रात्तायनाः (स)

पंडित – पांडाः (क)

पंड्ये – पांडेयाः (कों)

पतकी – धंद्यावरून (क)

परचुरे – परिकुराः (कों)

परजपे, परांजपे – परश्वासौ जपश्च. (स)

पराशर – पाराशर्य्याः (स)

पराशरे – पाराशर्य्याः (स)

पर्वते – १ पर्वताः (कों) (स)

–२ (पर्वतस्य अपत्यंपुमान्) पार्वतः = पर्वत, पर्वते.

पलित – पलतः (स)

पळनिटकर – ग्रामनामावरून (कों)

पळशे – पालाशिनः (स)

पागे – प्रागे (हयाः) (एकशेष) (कों) (स)

पाटणकर – ग्रामनामावरून (कों)

पाटील [पट्टकील = पाटैल्ल, पाटेल, पाटील] अशोकाच्या वेळीं कापसाचे विणलेले पट्ट लिहिण्याकरितां वापरीत. जमिनीच्या मालकीची नोंद ह्या पट्टांवर करीत व ते पट्ट कीलकांत म्हणजे वेळूच्या पोकळ कांडांत घालून सुरक्षित ठेवीत. पट्टकील म्हणजे पट्ट ज्यांत ठेविले आहेत तीं वेळूचीं पोकळ कांडें. हे पट्टकील ज्याच्या ताब्यांत असत त्या गांवच्या ग्रामणीला पट्टकीलक म्हणत. पट्टकीलक या शब्दाचा अपभ्रंश पट्टकील. पट्टकील या शब्दाचा मराठी अपभ्रंश पाटैल्ल, पाटेल, पाटील.

(रा. मा. वि. चंपू पृ. १९२)

पाटाण – प्रात्तायनाः (स)

पाठारे – प्रस्थाहारकाः (प्रभु)

१ पाताणे ऊर्फ पाठारे परभू ऊर्फ प्रभू हे लोक कोंकणांत कोठून आले, एतत्संबंधानें निश्चित अशी माहिती बिलकूल नाहीं. पाताणे हा शब्द पत्तन ह्या शब्दाचा अपभ्रंश असावा असा कित्येकांचा तर्क आहे, परंतु तो साधार नाहीं. पत्तन ह्या संस्कृत शब्दाचा मराठी अपभ्रंश पातन होईल किंवा पातण होईल, परंतु पाताण होणार नाहीं. पट्टण ह्या शब्दापासूनही पाताणे हा मराठी शब्द निघूं शकत नाहीं. पट्टण ह्या संस्कृत शब्दाचा मराठी किंवा गुजराथी अपभ्रंश पाटण होतो, पाताण होत नाहीं. सबब, अन्हिलपट्टण किंवा अनहिलपत्तन या शहरांशीं पाताण्यांचा संबंध जोडतां येण्यास अशी ही भाषिक अडचण येते. शिवाय, इतर ऐतिहासिक पुरावा, पाताणे अनहिलपत्तन शहरीं किंवा प्रांतीं मध्ययुगीन काळीं राहात होते असा, बिलकुल उपलब्ध नाहीं. करितां, पट्टण, पाटण, पतन व अनहिलपट्टण किंवा अनहिलपत्तन या शब्दांशीं पाताणे या मराठी शब्दाचा कांहीं एक संबंध नाहीं हें स्पष्ट झालें.

२ पाठारे या मराठी शब्दाचा तर पट्टण, पट्टन, पतन व अनहिलपट्टण किंवा अनहिलवाट किंवा अनहिलवाड या शब्दांशीं दूरचाहि आपभ्रांशिक संबंध नाहीं. पाताणे या मराठी शब्दांत पत्तन या संस्कृत शब्दांतील प, त, न, या अक्षरांचें समानास्तित्व तरी आहे, फक्त त चा ता कां व कसा झाला, एवढेंच विषमत्व उरतें. परंतु पाठारे ह्या मराठी शब्दांत पत्तन ह्या संस्कृत शब्दांतील प हें एक अक्षर तेवढें समान आहे, बाकी सर्व अक्षरें विषमान आहेत. पट्टन ह्या संस्कृत शब्दांतील पाठारे ह्या मराठी शब्दांत प हें एक अक्षर समान आहे. बाकीचीं सर्व अक्षरें विषमान आहेत. सबब, कोणतीही घालमेल केली, तरी पत्तन किंवा पट्टन अथवा पाटण ह्या शब्दापासून पाठारे हा मराठी शब्द निर्वचितां येणें मुष्कील आहे.

३ इतर कोणत्याहि संस्कृत शब्दापासून पाठारे हा मराठी शब्द यथायोग्य निर्वचिलेला माझ्या पहाण्यांत नाहीं.

४ पाताणे व पाठारे अशीं दोन नांवें ह्या लोकांचीं प्रसिद्ध आहेत. पाताणे प्रभू व पाठारे प्रभू, किंवा नुसतें पाताणे किंवा पाठारे अशा चार तऱ्हांनीं ह्या जातीचा निर्देश लौकिकांत होत असलेला आढळतो. प्रस्थपुरवहान्ताच्च (४-२-१२२) ह्या सूत्रावर भाष्य करतांना पतंजलि वाहीक देशांतील एका गांवाचा उल्लेख असा करतोः—पातानप्रस्थं नाम वाहीक ग्रामः। वाहीक देशांत म्हणजे सध्यांच्या पंजाबाच्या पूर्वभागांत पातानप्रस्थ नांवाचें एक गांव आहे, असें पतंजलि म्हणतो. पातानप्रस्थ हें त्या तर्फेतील प्रमुख गांव होतें, हें तदवयवीभूत प्रस्थ ह्या शब्दावरून उघड आहे. प्रस्थं म्हणजे प्रकर्षेण प्राचुर्येण स्थीयते यत्र इति प्रस्थं. जेथें पुष्कळ लोकांची वस्ती असे त्या मोठ्या गांवांला प्रस्थ म्हणत. अशा मोठ्या गांवावरून त्या गांवाच्या भोंवतालील तर्फेला किंवा तालुक्याला नांव पडे. त्या कालीं तर्फेला किंवा तालुक्याला आहार ही एक संज्ञा असे. पातानप्रस्थ ह्या मोठ्या गांवावरून सभोंवतालील तर्फेला पातानप्रस्थाहार असें नांव पडलें. ह्या पातानप्रस्थाहारांत राहाणारे जे लोक त्यांना पातानप्रस्थाहारकाः म्हणत. पातानप्रस्थाहारकाः ह्या लांबलचक अष्टाक्षरी नांवांतील "पूर्वोत्तरपदयोर्वा लोपो वाच्यः" ह्या वार्तिकाप्रमाणें उत्तरपदाचा लोप होऊन पातानकाः असा एक संक्षेप होई व पूर्वपदाचा लोप होऊन प्रस्थाहारकाः असा दुसरा संक्षेप होई. अशा तऱ्हेनें वाहीक देशांतील पातानप्रस्थाहार प्रांतांत राहाणाऱ्या ह्या लोकांना उच्चारसौलभ्यार्थ पातानक व प्रस्थाहारक अशीं दोन नांवें पडलीं. पैकीं पातानक ह्या संस्कृत शब्दाचा मराठी अपभ्रंश पाताणा आणि प्रस्थाहारक ह्या संस्कृत शब्दाचा मराठी अपभ्रंश पठ्ठारा, पाठारा.

५ पतंजलीचा हा पातानप्रस्थ शब्द हेमचंद्रानें आपल्या द्व्याश्रयमहाकाव्याच्या सोळाव्या सर्गाच्या तेविसाव्या श्लोकांत वातानुप्रस्थ अशा अपभ्रंशरूपानें योजिला आहे. प्रस्थपुरवहान्त व योपध जे सांकाश्य फाल्गुनीवह, नांदीपुर व वातानुप्रस्थ शब्द सत्संबंधक सोदाहरण व्याख्यानाच्या निमित्तानें हेमचंद्रानें वातानुप्रस्थ हा प्रस्थान्त शब्द उद्धरिला आहे. पतंजलीचा पातानप्रस्थ शब्द हेमचंद्राजवळील महाभाष्याच्या पोथींत वातानुप्रस्थ असा लिहिलेला असल्यामुळें हेमचंद्रानें तो भ्रष्ट पाठ उद्धरिला आहे, हें सांगावयाला नको. वातानुप्रस्थे भवः नृपः ब्राह्मणः वैश्यः अथवा कोपि जनः वातानुप्रस्थकः। वातानुप्रस्थ ऊर्फ पातानप्रस्थ गांवांत किंवा प्रांतांत राहणाऱ्या मनुष्याला वातानुप्रस्थक ऊर्फ पातानप्रस्थक म्हणत.

६ पातानप्रस्थ ह्या पतंजलिकालीन ग्रामनामाचा व प्रांतनामाचा पाआणपत्त पानपत असा सध्यां दिल्ली प्रांतांत व महाराष्ट्र देशांतील मराठी भाषेंत उच्चार प्रचलित आहे. ह्याचा अर्थ असा होतो कीं, हे पाताणे ऊर्फ पाठारे प्रभू लोक मूळचे पंजाबांतील पानपत तालुक्यांत राहणारे लोक होते. ते पंजाबांतील ऋग्यजुर्वेदी ब्राह्मणांबरोबर व क्षत्रियांबरोबर दक्षिणारण्यांत व विशेषतः कोंकण किनाऱ्यास वसाहत करण्यास आले. केव्हां आले त्याचाही स्थूल अंदाज करतां येतो. शकाच्या अकराव्या शतकांत झालेल्या अनहिलपट्टणच्या हेमचंद्राला वातानुप्रस्थ असा उच्चार माहीत होता. ह्या वातानुप्रस्थ शब्दाचा अपभ्रंश बाताणे, बाआणे, बाणे असा झाला असता, पाताणे असा झाला नसता; सबब पाताणे लोक हेमचंद्राच्या वेळीं म्हणजे शक अकराशेंत अनहिलपट्टणाहून कोंकणांत उतरले असल्याचा संभव नाहीं व हे लोक अनहिलवाड प्रांतांतील मूळचे राहणारे नव्हत. हे लोक ज्याप्रमाणें शक अकराशेंच्या सुमारास अनहिलवाड प्रांतांतून कोंकणांत उतरले असण्याचा संभव नाहीं, त्याप्रमाणेंच महाराष्ट्री भाषा ज्या कालीं महाराष्ट्रांत जिवंत बोलत असत त्या कालींहि उतरले असण्याचा संभव नाहीं. महाराष्ट्रींत पातानप्रस्थ ह्या शब्दाचें रूपांतर पाआणपठ्ठ असें होऊन तद्द्वारां मराठींत पापपाठ असें रूप निपजलें असतें. तसा अपभ्रंश ज्या अर्थी मराठींत झालेला नाहीं, पाताण असा अपभ्रंश झालेला आहे, त्या अर्थी महाराष्ट्रांत महाराष्ट्री भाषा बोलली जात असतां हे लोक कोंकणांत उतरले असल्याचा संभव नाहीं. म्हणजे शकपूर्व २०० पासून शकोत्तर ११०० पर्यंतच्या अवधींत हे लोक महाराष्ट्रांत व कोंकणांत उतरले नाहींत. पातान ह्या संस्कृत शब्दाचा पाताण असा अपभ्रंश चंड ज्या प्राकृत भाषेचें व्याकरण देतो व ज्याला आर्ष प्राकृत म्हणून सोईखातर कित्येक यूरोपियन नांव देतात, ती आर्ष प्राकृत भाषा प्रचलित असतां म्हणजे शकपूर्व २०० च्या पूर्वी किंवा सुमारास हे लोक कोंकणांत उतरले असले पाहिजेत. त्या कालीं ह्या लोकांना पातानकाः व प्रस्थाहारकाः ह्या संज्ञा पडून त्यांचीं आर्ष प्राकृत रूपें पाताणे व पाठारे अशीं त्या कालीं प्रचलित झालीं.

(रा. ले. सं. भा. २)

पांडरे – पाण्डाराः (स)

पांडे – पांडाः (स)

पांढरे – पाण्डाराः (स)

पापके – पापिकाः (स)

पाताणे – पातानकाः (पाठारे पहा)

पाध्ये – उपाध्याय = पाध्या = पाध्ये (अनेकवचन).
उपाध्याय = उपाध्या = उपाध्ये (अनेकवचन).
उपाध्याय = उवज्झा = ओझा = झा.
(सरस्वतीमंदिर)

पानसे – पानस्यः (स)

पारखी – १ पार्षतिः (कों)
–२ पार्षतिः = पारखइ = पारखी (स)

पारणे – पारणाः (स)

पारधी – पारिधेयाः (स)

पाळंदे – हें आडनांव पालद ह्या पाणिनीय शब्दाचा अपभ्रंश दिसतो. प्रस्थोत्तरपलद्यादिकोपधादण् (४–२–११०) ह्या सूत्रांतील पलदी शब्दाला अण् प्रत्यय लागून पालद झालें. पलदी प्रांतांत किंवा गांवांत राहणारा जो तो पालद. मराठींत अनुस्वार होतो; ह्या नियमानें पाळंद (मंग, कदांचित् इ. इ.). (भा. इ. १८३२)

पिंगळे – पिंगलाः (स)

पिंगे – पिंगाः (क)

पिंजरे [सं. पिंजरक – महा. पंजरअ – मरा. पिंजरे] (म) (इतिहाससंग्रह)

पिटकर – ग्रामनामावरून (कों)

पिटके – १ पेटकाः (स)
–२ पैटाकाः (स)

पिठरे [सं. पीठरक] (म) (इतिहाससंग्रह)

पिठे – पैष्ठाः (स)

पित्रे – पैत्र्याः (स) (क)

पित्र्ये – पित्र्यः (पितरः देवताः अस्य) = पित्र्या. पित्र्ये, पित्रे अनेकवचन. माहाराष्ट्र ब्राह्मणांत आँडनाँव.
(भा. इ. १८३३)

पिंपळे – १ पैप्पलः, पैप्पलाः (स)
–२ पिप्पलाः (क)

पुत्रे – पुत्रिणः (स)

पुनवे – पौणमासाः (स)

पुराणिक – धंद्यावरून (कों)

पुरोहित – पौरोहितिकाः (क) (स)

पूर्णपात्रे – पूर्णपात्र Taking from friends at festivals by free chothes, garlands etc वैजयंती कोश = पूर्णपात्रे हें आडनांव आहे.

पेठे १ – पैष्ठाः (स)
–२ पैठीनस्यः (स)
–३ पैष्ठाः (कों)

पेंडसा – पिंडसः (भिक्षु, भिकारी) = पेंडसा.
(भा. इ. १८३३)

पेंडसे – पिंडिकाक्षाः (कों)

पेशवे – धंद्यावरून (कों)

पै – हें आडनांव ब्राह्मणांत आहे. ह्याचें मूळ पति.
(ग्रंथमाला)

पोंक्षे – पवनाशाः (कों) (स)

पोटे – प्रौष्टिकाः (स)

पोतनीस – धंद्यावरून (कों)

पोते [सं. पोतक – महा. पोतअ – मरा. पोते] (म)
(इतिहाससंग्रह)

पोरे – पौरेयाः, पौरिः (स)

पोळ – पौलाः (स)

प्रभु – प्रभुः (स)

प्राणी – पारणाः (क)

फ

फडणीस – धंद्यावरून (कों)

फणशे – पानस्याः (क)

फणसळकर – ग्रामनामावरून. (क)

फणसे – पानस्याः (कों)

फणिवर – [सं. फणिवर] (म) (इतिहास संग्रह)

फाटक – फाण्टाः (स) (कों)

फाँटक – फाण्टाः (कों)

फाळके – स्फालकः (शत्रोः) = फाळका (आडनांव)

फुले – पुलहाः (स)

ब

बखले – बाष्कलिः (स)

बखले (बाखले) – बाष्कलिः (क)

बगळे – बालाकयः (स)

बडिये – पटिकाः (कों)

बद्रे – बादरायणाः (स) (क)

बंदरे – बादरायणाः (क)
बरवे – बाभ्रव्याः (स) (कौं)
बरुड – भरुंड (स)
बर्गे – १ भार्गाः (स)
–२ वर्गिन् (टोळीचा मुख्य) = बर्गी = बर्गा. मराठ्यांना बंगाली लोक बर्गे म्हणतात. हें मराठ्यांत आडनांव आहे.
बर्जे – भ्राजाः (क)
बर्मे – भारमाः (स)
बलाके – बलाकयः (स)
बहिरे – बाहिरिकाः (स)
बळाके – बालाकयः (क)
बाकरे – १ वार्कलिः (क)
–२ वार्कलयः (स)
बागुल – वागुरुः (कौं) (स)
बाण – वर्णकाः (स)
बाताडे – वातण्ड्याः (स)
बापट्ये – वापिकाः (कौं)
बावर – बाभ्रव्याः (स)
बाम – वाम (देवाः) (कौं)
बामणे [सं. वामन–महा. बामण–मरा. बामणे] (म) (इतिहाससंग्रह)
बारगीर – स्वारग्रीविः (स)
बारशे – वार्ष्याः (स)
बाळ – बालेयाः (कौं) (स)
बिंब (गोत्रनाम किंवा आडनांव) याला अक् व इ हे प्रत्यय लागून बैंबकि हा अपत्यवाचक शब्द होतो.
(महिकावतीची बखर पृ. ७८)
बिरजे – [सं. विरजा.] (म) (इतिहाससंग्रह)
बुदले – बुयादुलाः (क) (स)
बुरुड – भरुंड (स)
बुलाखे – बौधाक्षाः = बुडाखे = बुलाखे
बेंद्रा – द्वींद्रियक. (बेंद्रे पहा)
बेंद्रे – द्वींद्रियक = बेंद्रा (having two limbs), बेंद्रे.
(बेनरे) बेंद्रे – वैहीनरयः (कौं)
बेरड – वैरडिः (स)
बेले – बैलेयः, वेल्याः (स)
बेल्हे – वैल्याः (स)
बेहरे – बाहिरिकाः (कौं) (स)
बैल – पैलाः (स)
बोडस – १ वृद्धोक्षः = बुड्ढोरस = बोडोस = बोडस (आडनांव ब्राह्मण) (भा. इ. १८३४)
–२ बौधाक्षाः (कौं)
–३ बोधाक्ष (बोडास) (स)
–४ [मूर्धशयः = बोडस. शी २ स्वप्ने]
(धा. सा. श.)
बोडास – बौधाक्षाः (कौं)
बोधनी – बौधायनाः (स)
बोरे – भौराः (स)
बोले – बौलिः (स)
बौरे – भागुरि = भाउरि = भौरे = बौरे (आडनांव) (भा. इ. १८३७)
ब्रह्मे – भारमाः (स)

भ

भट – धंद्यावरून (कौं)
भद्रे – भद्रः = भद्रा, भद्रे (आडनांव)
भर्मे – भारमाः (स)
भवान्ये – भामाण्याः (स) (कौं)
भस्मे – भस्मायनाः (कौं)
भागवत – भागवित्तिः (कौं) (स) (क)
भाजके – बाह्यस्काः (स)
भाटे – भ्राष्ट्रेयाः (क) (कौं)
भाडभोके – १ वलभोकिः (कौं)
–२ वलभोकिः = वडभोक = भाडभोके (स)
भाडले – भंडिलायनाः (स)
भाणवसे – भाणवेशाः (स)
भानू – १ भानवः (कौं)
–२ भानोरपत्यं भानवाः = भानू (पतंजलि) (च)
भाभे – वाभ्याः (कौं) (स)
भारदे – भारद्वाजाः (स)
भार्गव – भार्गवाः (स)
भार्गे – भार्गवाः (स)
भावे – १ वाहविः (कौं) (स)

–२ बाह्वादिभ्यश्च (४–१–९६)
बाहु इत्येवमादिभ्यः शब्देभ्योऽपत्ये इञ् प्रत्ययो भवति । बाहविः ।
बाहुर्नाम कश्चित् । तस्यापत्यं बाहविः (–काशिका)
बाहविः = बाहवीयः
बाहवीयः = भावीया = भाव्या (एकवचन)
भाव्ये (अनेकवचन)
भावे (आधुनिक)
(कै. राजवाडे यांच्या एका नोटबुकावरुन)

भाव्ये – १ वाव्हियाः (कौं)
–२ वाव्हियः (स)

भासल – भाषण्याः (क) (स)

भासे – [सं. वासुकि] (म) (वासे पहा)

भिडे – बिदाः (कौं) (स)

भिशे – भैषज्याः (स)

भिसे १ – भैषज्याः (स)
–२ भिषक् = भिसाओ = भिसा (ए.) भिसे (अ.) वैद्य, भिसे हीं महाराष्ट्रांत आडनांवें झालीं आहेत.
(भा. इ. १८३२)

भुरके – भौरिकः (राज्ञः कोशागारे सुवर्णाध्यक्षः) = भुरिका = भुरका; अनेकवचन भुरके. हें आडनांव महाराष्ट्रांत सोनार लोकांत आहे. अर्थात्, पूर्वीच्या सात–आठशां वर्षांपलीकडील राजाच्या पदरीं हे भुरके असावे. धंद्यावरून आडनांवें या देशांत पूर्वीप्रमाणें आतां हि पडतात. जसे पेशवे, मुतालीक, फडनीस वगैरे. पुरातनः— राजाध्यक्ष, राजोपाध्ये, भुरके इ. इ. इ. (भा. इ. १८३३)

भुरे – १ भौरिकायनिः (स)
–२ भौराः (स)

भुसकुटे – १ भोजकट (देश) प्रांतावरुन. (कौं)
–२ भोजकटीय (खानखोजे पहा)

भुस्कुटे – ग्रामनामावरुन. (कौं)

भेडे – भेलिहः (कौं)

भेंडे – भिंदिः (स)

भोइटा – भूम्ष्ठिः (८–३–९७ पाणिनि) = भोइटा (आडनांव)

भोगले – भोगलाः (स)

भोजकटीय – भोजकट (देश) प्रांतावरुन. (कौं)

भोजकटे – भोजकट (देश) प्रांतावरुन (कौं)

भोर – १ भौरिकायनिः (स)
–२ भौराः (स)

भोरे – भौराः (स)

भोले – १ भौलिकायनिः (स)
–२ बाहुलिः (स)

भोसकटे – भोजकट (देश) प्रांतावरुन. (कौं)

भोसले १ [भोज (क्षत्रियवाचक शब्द. चेऊल – चंपावती येथें यादववंशी क्षत्रिय होते.)
भोज या शब्दाला स्वार्थक ल प्रत्यय लागून भोजल व त्याचा अपभ्रंश भोसल (ला–ली–लें)]
(महिकावतीची बखर पृ. ७९) व (भा. इ. १८३२)
–२ होय्सळ किंवा पोय्सळ (आडनांव–म्हैसूरप्रांतांत दोरसमुद्र येथें यदुवंशीय क्षत्रिय या आडनांवाचे होते.
पो – वो – बो – भो.
पोय्सळ यांचें मूळ गांव शशकपुर.
शशकपुर याचा अपभ्रंश ससोदें किंवा शिसोदें. भोसले हे शिसोदें गांवचे राहणारे हें बखरींतून मशहूर आहे.
(महिकावतीची बखर पृ. ७९)

भोळे – बाहुलिः (स)

भौम (आडनांव) – भूमिपासून अपत्यवाचक शब्द भौम. भौमचा अपभ्रंश भोम.
भौमचा आणखी एक मराठी अपभ्रंश बोंब.
बोंब शब्दाला स्वार्थक ल लागून बोंबल (ला–ली–लें) व बोंबल्या हे मराठी शब्द होतात.
पेणखोपवली रस्त्यावर बोंबल्या विठोबा आहे. त्याच्या नांवांत हाच शब्द येतो. त्या शब्दाचा बोंब (शंखध्वनि) किंवा बोंबील (मासा) या शब्दाशीं कांहीं संबंध नाहीं.
(महिकावतीची बखर पृ. ७८)

म

मंगरूरकर – ग्रामनामावरुन (कौं)

मटंग – मृदुंगीयाः (कौं)

मटंगे – मृदुंगीयाः (स)

मंडके – मांडूकेयाः (स)

मंडलिक – धंद्यावरुन (कौं)

मणेरकर – ग्रामनामावरुन (क)

मत्से – मात्साः (क) (स)

मध्ये – माधव्याः (स)
मरठे – अस्मरथाः (स)
मराठे १ – अस्मरथाः (स)
–२ आश्मरथ्याः (कों)
मसणे १ मषणाः (स)
–२ मणसणाः (स)
महाडीक – महाटवीकः = महाडीक (मराठ्यांचें आडनांव)
महाबळ – महावाल्याः (कों)
महाले – महल्लक (अंतःपुरांतला स्त्रीरक्षक) = महालअ = महाला; अनेकवचन महाले. जिवा महाला हा शिवाजीचा एक विश्वासू अनुयायी होता. सध्यां महाल्यांची वस्ती सिंहगडाभोंवतीं आहे. (भा. इ. १८३३)
माखलकर – ग्रामनामावरून. (कों)
मांगळे – मांगलः (स)
माचे – मत्साः (स)
माजरे, मांजरे – माजिरकाः (स)
मांडके – मांडूकेयाः (स)
मांडे १ – मांडिः (स)
–२ मांडव्यः = मांडे a surname
–३ मांड्याः (स)
माढरे, मांढरे – माठर्य a patronomic = माढरे, मांढरे, मांढरा–री. a surname among महाराष्ट्रिकs.
माधवे – माधव्याः (स)
माध्यंदिन – मध्यंदिनः (स)
मानवी – मानव्याः (स)
माने – मानेयाः (स)
मायदेव १ – देवमायाः (कों)
–२ – सिंघणयादवाच्या इ. स. १२१५ तल्या एका ताम्रपटांत मायीदेव पंडित असें विशेषनाम आलेलें आहे. (भा. इ. १८३२)
मारणे – मारायणाः (स)
मालसे – मलकाशाः (कों)
माळवे – मालव्याः = माळवे.
बाहीक देशांतील एक आयुधजीवि संघ.
माळवे हें एक आडनांव आहे.
माळी – माल्याः (कों) (स) (क)
मुजुमदार – धंद्यावरून (कों)
मुंजे १ – मौंजिकाः (स)

–२ मौंजायनाः (स)
मुंडरे – मौंडाराः (स)
मुंडले – मौंडाराः (क) (स)
मुद्गल – मुद्गलाः (स)
मुसळे – मौसल्याः (स)
मुळ्ये – मूलपाः (क)
मुळ्ये – मूलपाः (स)
मेढी – मेधिन् = मेढी
हें महाराष्ट्रब्राह्मणांत आडनांव आहे. (भा. इ. १८३४)
मेहेंदळे – महेंद्राः (कों)
मैत्र – मैत्रेयाः (स)
मैत्रायणी – मैत्राण्याः (स)
मैत्रे – मैत्रेयाः (स)
मोखे – मौखाः (स)
मोगरे [सं. मुद्गर – महा. मोग्गर – मरा – मोगरे] (म) (इतिहाससंग्रह)
मोग्रे – मुग्रिः (स)
मोगल १ – मुद्गलाः (स)
–२ मौद्गल्याः (स)
मोघे – मौखाः (क) (स)
मोडक – महोडकिः (कों) (स)
मोने – मौनाः (कों) (स)
मोरे – मौर्याः (स)
म्हात्रे – महात्रेयः (स)
म्हाबळ – महावाल्याः (कों) (स)

य

योगी – (प्राचीन) योगाः (क)

र

रटाटे – ललाटिः (कों) (स)
रणदिवे – अरण्येदीपकाः = रणदिवे (lights in a forest i. e. useless persons)
(संज्ञायां २–१–४४ पाणिनि)
राक्षे – राक्षायणः (स)
राजमान्या – राजानं मन्यः = राजमान्या (मराठ्यांचें आडनांव) (भा. इ. १८३४)

राजवाडे १ – राजवाट = राजवाड = राजेवाडी. राजवाड गांवचा राहणारा तो राजवाडे. (ग्रंथमाला)

–२ धंद्यावरून (कों)

रानडे – रानडे याचें मूळ रूप रानवडे. अरण्यवाट = रण्णवाड = राणवाड = रानवाड = रानवड.

रानवड नांवाच्या गांवांत किंवा थळांत राहणारा तो रानवडा अथवा रानडा. हें आडनांव व इतर पुष्कळ आडनांवें कुळवाचक आहेत. ब्राह्मण, मराठे, शूद्र व अतिशूद्र या सर्वांत रानडे हें आडनांव आहे. रानडे नांवाच्या कुळांत चातुर्वर्ण्यांतील जाति व उपजाति येतात. (ग्रंथमाला)

रानड्ये – अरण्यवाटाः = रण्णवाड = (प्राचीन मराठी) राणवडे = (अर्वाचीन मराठी) रानडे. (कों) रानडे यांच्या वंशांत उत्पन्न झाले ते रानड्ये.

रावण – रावणाः (स)

रुखे – वृक्षाः (स)

रुषी – ऋक्षाः (स)

रेंभे – रेभ्याः (स)

रोगणे – रहूगणाः (स)

रोड्ये – रोदकिः (कों) (स)

ल

लंके – लांकायनाः (स)

लघाटे – लघुघाट = लघाट. लघाटांवर राहणारा, काम करणारा, तो लघाटा. (ग्रंथमाला)

लद्दू – लादः (स)

लवकर – लोपकृतः (स)

लंवकर – लोपकृतः (क)

लवाटे – लव्यारदंडिः (स) (कों)

लागू – लिगुः (कों)

लाटे – लालाटिः (स) (कों)

लिंबकर – लिपिकरः लिबिकरः (scribe) = लिंबकर = लिंबकर (पाणिनि ३–२–२१) परभू आडनांव.

लिमये – या आडनांवाचा निमये असा पाठ कोंकणांत देवाच्या गोठण्यास गोडबोले यांच्या येथें सांपडला. गोत्रांत निमिः, निमयः असें नाम आहे. निमयः = लिमये

(भा. इ. १८३५)

लुचके – ग्लुकुचायनिः (स)

लुले – लुलायाः (स)

लेणे – लायनाः (कों)

लेंभे – रेभाः, रेभ्याः (स)

लेले १ – लैलेहिः (कों)

–२ लैलेभिः (स)

लोकरे १ – लोहकारयः (क)

–२ लौहकारयः (स)

लोहकरे – लौहकारयः (स)

व

वझे – वधिकाः (स)

वझ्ये – वधिकाः (कों)

वणवे [पर्णपति = वण्णवइ = वणवी = वणवे] (म)

(इतिहाससंग्रह)

वर्जे – भ्राजाः (क) (स)

वर्णे – वरेण्यायनिः (स)

वर्तक १ – वर्तनिक (Road-cess-collector) = वर्तक.

–२ धंद्यावरून (कों.)

वर्त्तक – जमाबंदीचा कारकून (भा. इ. १८३२)

वष्ट – त्वाष्ट्राः (स)

वळे – बलिः (स)

वाकडे – (पर्ण) वल्काः (स)

वाकणकर – वाकिनिकेराः (क) (स)

वाकळे – (पर्ण) वल्काः (स)

वागळे – वाग्गुलिकः तांबूलकरंकवाही। वाग्गुलिकः=वागुलिआ = वागुलिया = वागुळया = वागळया = वागळे (अनेकवचन). हें आडनांव सारस्वतांत सध्यां आहे. इतर जातींत आहे कीं नाहीं हें माहीत नाहीं. **तांबोळी** (तांबुलिकः) हें आडनांव देशस्थ ब्राह्मणांत सध्यां आढळतें. (भा. इ. १८३२)

वाघ – व्याघ्राः (स)

वाटवे १ – वाटव्यः (स)

–२ वाटव्याः (स)

वाड १ – वाटाः (कों) (स)

–२ वाटः (स)

वानवळा – वनपालः = वनवाळा = वानवळा; किंवा उपायनपालः = वाणवाळा = वानवळा.

वासे [सं. वासुकि – महा. वासुइ – मरा. वासे, भासे] (म)

(इतिहाससंग्रह)

विश्वामित्र – वैश्वामित्राः (स)

वैळे १ – ऐलाः (स)
  –२ विलवः (स)
वैद्य १ – बैदाः (कों) (क) (स)
  –२ शूलगवं यो वेत्ति असौ वैद्यः (आश्वलायन-गृह्यसूत्र नारायणीयवृत्ति) शूलगव प्रकरणांत आहे.

वैद्य हें आडनांव कोंकणस्थ, कऱ्हाडे ब्राह्मणांत आहे. वैद्य म्हणजे वैद्यकी औषधांचा धंदा करणारी जात निराळी.

वैशंपायन – वैशंपायनाः (कों) (स)
वोक – मौकाः (कों) (स)
वोझे – बौध्याः (क) (स)
व्यास – व्यासाः (कों) (स)

श

शारंगपाणी – शार्ङ्गपाणि = शारंगपाणी, सारंगपाणी. (भा. इ. १८३६)

शार्ङ्गपाणि – शार्ङ्ग (खाः) पाणिः च = शार्ङ्गपाणि. (कों)
शिखावत – शिखापत्तिः (स)
शिंत्रे – श्वैत्रकाः (अनुनासिक आगंतुक) (कों)
शिंदा [(शक ९०० तील) सिंदः = शिंदा] (रा. मा. वि. चंपू पृ. १८९)
शिरवटे – श्रीपथाः (स)
शिर्के [शिरीषक] (म) (शिर्खे पहा)
शिर्खे [सं. शिरीषक-महा. शिरीखअ – मरा. शिर्खे, शिर्के] (म) (इतिहाससंग्रह)
शुके – शौकेयाः (स)
शुक्ल्या – शुक्रियः (शुक्रो देवता अस्य) = शुक्ल्या. शुक्रये, शुक्रे अनेकवचन. महाराष्ट्र ब्राह्मणांत हें आडनांव आहे. (भा. इ. १८३३)

शेखदार – धंयावरून. (क)
शेखावत – शिखापत्तिः (स)

शेणवी व दळवी – महाराष्ट्रांत शेणवई ह्या नांवाचे जे स्वदेशबांधव आहेत त्यांच्या नांवाची व्युत्पत्ति नाना प्रकारची केलेली निरनिराळ्या ठिकाणीं सांपडते. कित्येकांच्या मतें शेणवई असें रूप नसून शेणवी असें शुद्ध रूप आहे. ह्या लोकांच्या मतें शेणापासून झाले ते शेणवी! गोव्याकडे पोर्तुगीज लोक शेणवयांना सनाय म्हणून हाक मारतात; परंतु हा शेणवई ह्या शब्दाचा केवळ अपभ्रंश आहे. श्येन नामक प्राण्यापासून ज्यांची मूळ उत्पत्ति कल्पिली ते शेणवई असाही मालवणास एका गृहस्थानें समासव्यवच्छेद केला! असे नाना प्रकारचे अर्थ ह्या शब्दाचे विनोदानें झालेले आहेत. त्यांत विशेष कांहीं मतलब नाहीं. कोंकणी भाषेंत शेणय असा एक शब्द आहे. त्याचा अर्थ पंतोजी आहे. तिकडे ब्राह्मणांपेक्षां शेणव्यांची लोकसंख्या जास्त असल्यामुळें शिक्षकाचा धंदा शेणवीच करीत आले आहेत. ज्याप्रमाणें आंग्लोइंडियन लोकांत पंडित म्हणजे पंतोजी समजण्याचा प्रघात आहे, त्याचप्रमाणें गोव्याकडे अस्सल पोर्तुगीज लोकांत पंतोजीस शेणय म्हणण्याचा प्रघात आहे. सारांश, शेणय हा शेणवी शब्दाचा अपभ्रंश आहे. तेव्हां शेणय शब्दाचा आश्रय करून शेणवी शब्दाची व्युत्पत्ति करतां येणें शक्य नाहीं. शेणवी शब्दाची खरी व्युत्पत्ति येणेंप्रमाणें आहे. शेणवी शब्द मूळ शेणवई असा आहे. शेणवई हें रूप मूळचें शेणवइ असें आहे. शेणवइ = सेण्णवइ = सैन्यपति, अशी ह्या शब्दाची परंपरा आहे. सैन्य शब्दाचें सेण्ण प्राकृत रूप आहे; व पति शब्दाचें वइ प्राकृत रूप आहे. चोलवइ = चोलपति, वाणरवइ = वानरपति, घरवइ = गृहपति, अशीं रूपें सेतुबंध काव्यांत अनेक ठिकाणीं आलीं आहेत. तात्पर्य, सैन्यपति शब्दाचें सेण्णवइ व सेण्णवइ शब्दाचें शेणवी असें अपभ्रष्ट रूप आहे. शेणवी शब्दाच्या जोडीचाच दळवी शब्द आहे. हा शब्द दळवै ह्या रूपानें ज्ञानेश्वरींत येतो. दळवैपणा हें भाववाचक नाम ज्ञानेश्वरींत अनेक वेळां आलें आहे. दळवी = दळवै = दळवइ = दलपति, अशी ह्या शब्दाची परंपरा दिसते. शेणवी व दळवी ह्या दोन्ही शब्दांचा अर्थ एकच. दळवी व शेणवी हे दोन्ही शब्द ज्ञानेश्वरांच्याहीपेक्षां जुने आहेत; व ते धंदा किंवा पेशा ह्यांचे वाचक आहेत. ह्यावरून दळवी व शेणवी ह्यांची मूळ जात कोणती तें मात्र निश्चून सांगतां यावयाचें नाहीं, परंतु सात आठशें वर्षांपूर्वी अलीकडल्यापेक्षां जातिनिर्बंध जास्त कडक होते असें मानल्यास शेणवी व दळवी ह्यांची जात धंयावरून क्षत्रियांची ठरते. हा केवळ व्युत्पत्तिदृष्ट्या विचार झाला. धर्म, आचार, शरीराचा आकार, वगैरेंचा ह्या बाबींसंबंधानें विचार करून मग कायमचा सिद्धान्त बांधला पाहिजे.

(सरस्वतीमंदिर शके १८२६)

शेवक – सेवकाः (स)
शेष – शैशयः (स)
शेषे १ – शैशयः (स)
  –२ शैषयाः (स)
श्रीखंडे – श्रीकंठ a district in North India = श्रीखंडे. श्रीकंठपदलांछनः called श्रीकंठ.
श्रोत्री – श्रोत्रियाः (क) (स)

स

संक [सं. शंख – महा. संख – मरा – संक] (म)
(रा. ले. सं. भा. २)
संकपाल [सं. शंखपाल (नागानंद नाटक)] (म)
(रा. ले. सं. भा. २)
सटवे – सार्थवाहक = सठवाहअ = सठवा = व्यापारी.
सटवे हें आडनांव महाराष्ट्रांत प्रचलित आहे. (ग्रंथमाला)
सबनीस – धंद्यावरून (क)
संबुस – शंबुः (स)
समंध – संबंधिः (स)
समुद्र – सामुद्रिक = सामुद्रिआ = समुद्या = समुद्रे = समुद्र.
हें आडनांव देशस्थ ब्राह्मणांत आहे. (भा. इ. १८३२)
सरदेशमुख – सर्वदेशमुख्यः = सरदेशमुख.
येथें सर हा शब्द फारसी नाहीं.
सरदेसाई – धंद्यावरून (क)
सरवटे १ – शारद्वताः (क) (स)
–२ श्रीपथाः (स)
ससनारे – शासनाहारः = ससनारे (आडनांव)
noe who prepares copperplates.
सरपाटील – सर्वपट्टकीलः = सरपाटील.
सर शब्द फारसी नाहीं.
सरवटे – शारद्वताः (स) (क)
साकरे १ – शार्कराः (स)
–२ सांकराः (कौं) (स)
साखरे १ – शर्कराक्षाः (स)
–२ शार्कराः (कौं)
–३ शाक्राः (क)
साठये – सार्ष्टेयाः (कौं) (स)
साठे १ – सार्ष्टिः (कौं)
–२ सार्ष्टिः (स)
–३ शाठ्यायनिः (स)
–४ शठः = शाठ्यः = साठ्या = साठये = साठे
(कै. राजवाडे यांच्या एका टिपणवहीवरून)
साडमाने – साद (मा) नाः = साडमाने = सांद्रमणिः (स)
साढमानी – सांद्रमणिः (कौं)
सातपुते – सात्वतपुत्राः (स)
सात्ये – सात्वकिः (स)
साधले – शांडिलाः (क)
सांधले – शांडिलाः (क)
साने –१ – श्वानेयाः (कौं) (स)
–२ सायणाः (कौं)
–३ सायणः (स)
सापळे १ – श्वाफल्काः (कौं)
–२ श्वाफल्कः (स)
साफळे – श्वाफल्काः (स)
साबणे १ – सावर्णिः (स)
–२ श्यापर्णाः (स)
साबणें – श्यापर्णेय = साबणें a surname
सांबारे – शांबरायणाः (स)
सामग–क – श्यामगुः (स)
सारंगपाणी – शार्ङ्गपाणि (शारंगपाणी पहा)
सारवटे – शारद्वताः (स) (क)
सावणे – श्यापर्णाः (स)
साळके १ – शालाक्याः (स)
–२ सालंकायनाः (स)
साळवे – साल्वेयाः (स)
साळवणी – शाल्यायनिः (स)
साळुंके – शालंकायनाः (स)
सित्रे – श्वैत्रकाः (स)
सिंत्रे – श्वैत्रकाः (स)
सिधये १ – सिद्धाः (स)
–२ सिद्धाः (सिद्धेयाः) (कौं)
सुंदर – शौनरयः (स)
सुदामे – सौदामेयाः (स)
सुनरे – शौनरयः (स)
सुरवे – सुरपतिः (इंद्र) = सुरवे (आडनांव) हें आडनांव मराठ्यांत आहे.
सुरुड – स्वरुंड (स)
सुर्वे – सुर्वे हें आडनांव प्रभु, मराठे वगैरे जातींत आहे.
सुरपति = सुरवइ = सुरवै = सुर्वे. (ग्रंथमाला)
सुलाखे १ – स्वलोक्याः (स)
–२ सुनाश्वः (स)
–३ सुराक्षः (स)
सुलोखे – स्वलोक्याः (स)
सूर – सुराः (क)

सेटे – शैताः = सेटे = श्रेष्ठिः (स)
सैंडे १ – सैंधवाः (कों)
–२ सैन्धवाः (स)
सेवक – सेवकाः (स)
सोर्णाये – शौणायनाः (स)
सोणे – शौनकाः (स)
सोनिये – शौणायनाः (कों)
सोनी १ – शुश्रूषेण्यः (सोन्या पहा)
–२ सोनी, सोहोनी, सोनिये, सोने—
नडादिभ्यः फक् (४-१-९९)
नडादिगणांत शोण शब्द येतो.
शोणिः = सोनि, सोनिये, सोन्ये, सोने, सोहोनी, सोहनी.
(कै. राजवाडे यांच्या एका नोटबुकावरून)
सोनीये – शौणायनाः (स)
सोने – १ – शौनकाः (स) (कों)
–२ सौन्याः (कों)
–३ सौन्यः (स)
सोन्या – शुश्रूषेण्यः worthy to be heard (Vaidik) = सोन्या, सोनी (हें कोंकणस्थांत सोनी आडनांव आहे)
सोन्ये – शौणायनाः (कों)
सोपटे – सौपिष्ठाः (स)
सोमण – १ सौम्यानिः (स)
–२ सौमिनिः (स) (कों)
सोवनी – सौमिनिः (कों) (स)
सोहनी – सौमिनिः (कों) (स)

ह

हजारी – साहस्रिकः = हजारी. सहस्रं भृतिः यस्य, ज्याचें वेतन हजार नाणीं आहे. हजारी हें परदेशांत आडनांव आहे.
हर्षे – हार्यश्वाः (क) (स)
हवे – (इद्ध) हव्याः (एकशेष) (कों) (स)
हंस – हंसाः (स)
हंसे – हंसकायनाः (स)
हाटे – हाटिकः (हाट्ये पहा.)
हाट्ये – हाटिकः = हाटिआ = हाट्या. अनेकवचन हाट्ये, हाटे. हें आडनांव महाराष्ट्रांत आहे. बाजारांत व्यापार करणारा जो तो हाट्ये. (भा. इ. १८३४)
हावडे – हापत्तिः (स)
हारकारे – हार्करिः (स)
हान्ये – हारीताः (कों) (स)
हार्शे – हार्यश्वाः (स)
हिंगणकर – ग्रामनामावरून. (क)
हुचमणे – उच्चैर्मन्यवः (स)
हुजूरबाजार – धंद्यावरून (क)
हेर – हैयुराः (स)

४ जातिनाम–व्युत्पत्ति–कोश

अधिकारी – (प्रभू पहा)

अरब – वाजिवाहार्वगंधर्वहयसैंधवसप्तयः (अमर – द्वितीय कांड – क्षत्रियवर्ग ४५) येथें अर्वन् शब्द घोडा या अर्थी आलेला आहे. क्षीरस्वामी अर्वति याति इति अर्वा अशी व्युत्पत्ति करतो. व्युत्पत्ति हटानें वाटेल तशी होते. माझ्या मतें अर्वन् शब्द देशवाचक आहे. ज्यांना सध्यां अरब म्हणतात त्यांचें मूळ नांव अर्वन् व त्यांच्या देशाचें हि नांव अर्वन्. अर्व देशांतील घोडा तो अर्वन्. हा देशवाचक अर्व शब्द ऋग्वेदांत येतो.

(भा. इ. १८३४)

ओस्वाल १ – ऊर्जस्वल = ओस्वाल (माधवचंपू)

(जातिविशेष)

–२ अश्वपालः = ओस्वाल (ब्राह्मणाची एक जात)

काठी [कांथिकः = कांठी, काठी] काठेवाडांतील लोकांना काठी म्हणतात.

कातकरी [कातवडी पहा]

कातवडी [कृत्तिपट्टिन् = कातवडी] कातवडी, काथोडी, कोठोडी व कातकरी हीं एकाच जातीचीं नांवें आहेत. कृत्ति म्हणजे कातडें व पट्ट म्हणजे वस्त्र. कातड्याचें वस्त्र पांघरणारा तो कृत्तिपट्टिन्. (महिकावतीची बखर पृ. ८४)

कायस्थ १ – कायस्थ, कायथ, काइत, काइथ हा शब्द काय व स्थ या शब्दांच्या संहितेपासून निघाला आहे. क्षत्रियात् शूद्रायां जातः कायस्थः । काय म्हणजे मूळ धन. त्यावर उपजीविका करणारा जो तो कायस्थ. काये, कायेन वा तिष्ठति यः स कायस्थः । ह्याचा मूळ धंदा व्याजबट्टा करण्याचा दिसतो नंतर लेखन, चित्रकर्म हीं कामें ह्याला नेमून दिलीं, असें दिसतें.

–२ अथवा बोटांचीं शेवटें म्हणजे काय. त्याच्या साह्यानें उपजीविका करणारा जो तो कायस्थ. हाताच्या बोटाच्या शेवटांनीं लेखन, चित्रकर्म साधावयाचें. तेव्हां लेखन चित्रकर्म हा मूळ धंदा. त्यानंतर इतर धंदे.

या दोन व्युत्पत्त्या दिल्या आहेत. पैकीं दुसरी व्युत्पत्ति बरी दिसते. कारण, धर्मशास्त्रांतर्गत जातिविवेकप्रकरणांत दिलेल्या लेखनकर्माशीं ह्या दुसऱ्या व्युत्पत्तीचा मेळ चांगला बसतो. मनुसंहिता, याज्ञवल्क्य, मुद्राराक्षस व मृच्छकटिक यांत हा शब्द येतो. कायस्थ इति लघ्वी मात्रा (मु. १; मृ. ९; या. १-३३६)

(भा. इ. सं. मं. अहवाल १८३२ पान १६)

कारावर (चांभार) – निषादापासून वैदेहीच्या (वैश्यापासून ब्राह्मणीचे ठायीं झालेल्या स्त्रीच्या) ठाईं झालेला तो कारावर. लोककार, कांस्यकार, चर्मकार, रथकार, सुवर्णकार ह्या शब्दांत कार हें जें पद आहे त्याचा अर्थ शिल्पी असा आहे. कारावर ह्या शब्दांतील कार ह्या पदाचा अर्थ शिल्पी असाच आहे. कारणां शिल्पिनां अवरः कनिष्ठः नीचः कारावरः । कारांत म्हणजे शिल्पांत जो अत्यंत गलिच्छ धंदा करणारा तो कारावर. कारावरो निषादात्तु चर्मकारः प्रसूयते (मनुस्मृति अध्याय १०, श्लोक ३६) चामड्याचे शिल्प करणारा.

(राजवाडे लेखसंग्रह भा. २ अंत्यजोद्धार पृ. १३३)

कुणबी [कुलपति = कुळवइ = कुळवी = कुणबी] कुणबी म्हणजे शूद्र नव्हे. कुणबी म्हणजे जमीन करणारा.

(रा. मा. वि. चंपू पृ. १९३)

कुळंबी – मनुस्मृतीच्या सातव्या अध्यायांतील ११९ वा श्लोक व त्याची कुल्लूकव्याख्या अशी आहे:—

दशी कुलं तु भुंजीत विंशी पंच कुलानि च ।
ग्रामं ग्रामशताध्यक्षः सहस्राधिपतिः पुरम् ॥ ११९

“ अष्टागवं धर्महलं षड्गवं जीवितार्थिनां । चतुर्गवं गृहस्थानां त्रिगवं ब्रह्मघातिनां ” इति हारितस्मरणात् षड्गवं मध्यमं हलं इति तथाविधहलद्वयेन यावती भूमिर्वाह्यते तत्कुलं इति वदति । तद्दशग्रामाधिपतिर्वृत्त्यर्थं भुंजीत । एवं विंशत्यधिपतिः पंच कुलानि शताधिपतिर्मध्यमं ग्रामं सहस्राधिपतिर्मध्यमं पुरम् ॥ ११९ ॥

एकेक नांगर सहा बैलांनीं ओढावा; अशा नांगराला षड्गव नांगर म्हणतात. अशा दोन नांगरांनीं जेवढी जमीन वाहिली जाते तेवढीला कुल अशी संज्ञा आहे. अशी कुल्लूकभट्टांनीं कुल ह्या शब्दाची शक्ति सांगितली. तात्पर्य, कुल व वाहणें हे दोन शब्द मनुसंहितेपासून किंवा तत्पूर्वीपासून भारतवर्षांत प्रचलित आहेत. सहा बैलांनीं जेवढी जमीन नांगरली व वाहिली जाते तिचें नांव कुल. ह्या कुल शब्दाचा उच्चार मराठींत आदेश–

प्रक्रियान्वयें कुळ असा होतो. कुल शब्द जसा संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे तसाच कुळ शब्द मराठींत नपुंसकलिंगी आहे. लहानशा खेड्यांतील लागवडीखालील जमीन पांच सहा कुळें असते व मोठ्या गांवांत पांचपंचवीस कुळें असते. एकेका कुलाचा म्ह. सहा बैलांनीं वाहिल्या जाणाऱ्या जमिनीचा जो कर्ता त्याचें नांव कुलपति. कुलपति ह्या संस्कृत शब्दाचें महाराष्ट्री रूप कुलवइ; आणि कुलवइ ह्या महाराष्ट्री शब्दाचें मराठी रूप प्रथमारंभीं कुळवी व नंतर कुणबी. ह्या शब्दाचे कुळंबी, कुनबी असेहि अपभ्रंश सध्यां आहेत. पूर्वी कुणबी ही जात नव्हती, केवळ धंदा होता. तो सध्यां जात झाला आहे. प्रायः शूद्र जमीन वाहतात; म्हणून शूद्रांना सध्यां कुणबी अशी संज्ञा महाराष्ट्रांत प्राप्त झाली आहे. जमीन वाहणारा जर मराठा क्षत्रिय किंवा धनगर किंवा महार किंवा कुंभार असेल तर सरकार किंवा सावकार त्या मराठ्याला किंवा धनगराला किंवा महाराला किंवा कुंभाराला आपलें कुळ म्हणतात. कुळें दोन प्रकारचीं-मिराशी किंवा उपरि. वंशपरंपरेनें जमीन वाहणारीं जीं तीं मिराशी व एका मोसमापुरतें जमीन वाहणारीं जीं तीं उपरि. सारांश, कुलपति, कुलवइ, कुळवी, कुणबी, कुळंबी हा शब्द फार पुरातन आहे. (भा. इ. १८३२)

कुळवाडी [कुलपालकः (दोन बैलांनीं नांगरली जाणारी जमीन करणारा) = कुळवाडी. कुलपालिका = कुळवाडीण]

कोळी १ – कुपिनिन् = कुइलि = कोळी one who plies his trade of fishing with कुपिनी a bamboo instrument called खून.

–२ कूलिन् = कोळी (समुद्रतीरचा) कोळी म्हणजे समुद्रतीरचा माणूस. कोल या शब्दापासून निघालेला कोळ शब्द व लोक या समुद्रतीरच्या कोळ्यांहून निराळे.

(भा. इ. १८३५)

–३ कूलिन् = कूळी = कोळी. कूलिन् म्हणजे समुद्राच्या किंवा नदीच्या किंवा गिरिणदीच्या काठीं राहून उपजीविका करणारा मनुष्य. ह्यावरून इंग्रजी कूली शब्द निघाला आहे.

(महाराष्ट्राचा वसाहतकाल पृ. २१०)

गुज्जर किंवा गुर्जर – गुह्यराज् = गुजराअ = गुज्जर.

गुज्जर शब्दाचें पुन्हा संस्करण गुर्जर.

गुह्यराज् हें गुह्यक लोकांनीं आपणांस घेतलेलें भूषविणारें नांव.

(भा. इ. १८३५)

गोहेल – गुहेरः (protector, guardian) = गोहेल. गोहेल ही एक रजपुतांची कुळी आहे.

चितपावन – क्षेत्रपावन = चेत्तपावन (महाराष्ट्री) = चित्पावन. परशुराम क्षेत्राला पवित्र करणारे ब्राह्मण ते चित्पावन हीच या शब्दाची व्युत्पत्ति खरी. क्षितिपावन = चितिपावन चितपावन. पृथ्वीला पवित्र करणारे जे ब्राह्मण. (भा. इ. १८३३)

चित्पावन – १ हा शब्द 'चित्पावन' व चित्तपावन अशा दोन रूपांत आढळतो. विशेष प्रतिष्ठितपणें बोलावयाचें किंवा लिहावयाचें असलें म्हणजे 'चित्तपावन' हें रूप योजतात. परंतु सामान्य रोजच्या उपयोगांत चित्पावन हें रूप हमेशा येतें.

–२ ह्या शब्दाची व्युत्पत्ति अनेकांनीं अनेक प्रकारांनीं केलेली आहे (१) चितेपासून पावन झालेले जे ते चित्पावन. (२) चित्त पावन ज्यांचें झालें ते चित्तपावन. (३) तिसरी व्युत्पत्ति जरा चमत्कारिक आहे. 'इजिप्त' ह्या शब्दाचा अपभ्रंश 'चित्' आहे, असें गुंजीकर म्हणतात। ह्यांपैकीं एकही व्युत्पत्ति ऐतिहासिक नाहीं; सबब ग्राह्य करण्याला अडचण येते. (१) स्मशानांत मेलेलीं शवें जिवंत झालीं व त्या पुरुषांना पुढें जी संतति झाली, ती 'चित्पावन' या नांवाची मालक झाली, हा आधार पहिल्या व्युत्पत्तीला देतात; ऐतिहासिक रीत्या आधार आधेयाच्या पूर्वकालीन असावा लागतो, मानवी व्यवहारांत शक्य असावा लागतो, व साक्षात् घडला असल्याचा त्याला पुरावा असावा लागतो. ह्या तिन्ही बाबी प्रस्तुत आधारांत विद्यमान नाहींत. कां कीं, आधेयाच्या पश्चात् आधाराची कल्पना केलेली दिसते. चितेवर ठेवलेलीं शवें उठल्याची हकीकत फारशी शक्य दिसत नाहीं. आणि यदाकदाचित् शक्य मानिली, तत्रापि ती कालदशादींनीं परिछिन्न नाहीं. अर्थात् ही व्युत्पत्ति ग्राह्य नाहीं. (२) दुसऱ्या व्युत्पत्तीला आधार धर्मभ्रष्ट झालेल्यांच्या चित्त-शुद्धीचा देतात. तोही कालदशादींनीं विशिष्ट नाहीं, सबब तो हि इतिहास नाहीं. (३) तिसरी व्युत्पत्ति हि कालदेशादि–अनिर्देशास्तव अग्राह्य च होय. 'इजिप्त' शब्दांतला जो 'जित्' त्याचा अपभ्रंश 'चित्' अशी कल्पकानें कल्पना बसविली आहे. ह्या पद्धतीनें वाटेल त्या शब्दापासून वाटेल तो शब्द निघूं शकेल. उदाहरणार्थ, चितागांग वगैरे. परंतु ऐतिहासिक सत्यतेच्या कक्षेंत येण्यास त्याला अनेक अडचणी येतील. सबब ह्या तिन्ही व्युत्पत्त्या अग्राह्य होत. अर्थात्, सह्याद्रिखंड, शतप्रश्नकल्पलता वगैरे संस्कृत परंतु अर्वाचीन ग्रंथ ह्या प्रकरणीं बिलकूल विश्वास्य दिसत नाहींत.

३ तेव्हां आतां ह्या शब्दाची व्युत्पत्ति ऐतिहासिक पद्धतीनेंच लाविली पाहिजे. म्हणजे एखाद्या विश्वसनीय लेखांत ह्या शब्दाचें

रूप कसें येतें तें पाहून त्यावरून ह्या शब्दाचें मूळ शोधिलें पाहिजे. चित्पावन किंवा चित्तपावन हा शब्द शालिवाहनाच्या चवदाव्या शतकाहून प्राचीन अशा लेखांत किंवा ग्रंथांत आढळत नाहीं. त्यापुढें शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीपासून हा शब्द विशेष आढळूं लागतो. पेशवे चित्पावन होते, त्यामुळें ह्या शब्दाला जगप्रसिद्धि आली व चित्पावन कोण, कोठील वगैरे चिकित्सा सुरू झाली. पेशव्यांच्या आधीं या शब्दाच्या व तद्वाच्य अर्थाच्या कडे, अर्थात्, कोणीं यत्किंचित्हि लक्ष दिलें नव्हतें.

४ चित्तपावन हा शब्द सह्याद्रिखंड किंवा शतप्रश्नकल्पलता या संस्कृत ग्रंथांखेरीज इतर स्वतंत्र हस्तलिखितांत सांपडतो कीं काय हें पाहात असतां, कोंकणांत अलीबागेस एका गृहस्थाच्या दप्तरांत किरवंतांच्या संबंधानें मला एक संमतिपत्र चार पांच वर्षांपूर्वी (हा लेख भा. इ. संशोधक मंडळाच्या शके १८३३ च्या इतिवृत्तांत छापलेला आहे) सांपडलें होतें, त्यांत हा शब्द आढळला. पत्र 'पूर्तकाली' कागदावर लिहिलें आहे. हें बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत केव्हां तरी लिहिलें असावें. शक, मास, तीथ, वार वगैरे कशाचाहि उल्लेख पत्रांत नाहीं; त्यामुळें नक्की वर्ष सांगतां येत नाहीं.

५ संमतिपत्रांतील एक सही अशी आहे:—

" संमतोयमर्थः सदाशिव (भ) ट्ट दीक्षित चितळे चित्तपावनस्थ धर्माधिकारी "

ह्या ओळींत **चित्तपावनस्थ** हा शब्द आला आहे. ह्याचा अर्थ काय, तें आपणास पहावयाचें आहे. कोंकणस्थ, देशस्थ, करहाटकस्थ, गोमांतकस्थ, गोकर्णस्थ इत्यादि सजातीय प्रयोगांत स्थ हा शब्द स्थलवाचक नामांशीं जोडलेला आढळतो. त्याप्रमाणेंच चित्तपावनस्थ ह्या समासांत चित्तपावन या स्थलवाचक नामाशीं 'स्थ' हा शब्द जोडलेला आहे, असें म्हणावें लागतें. चित्तपावनस्थ ह्या सामासिक शब्दाचा अर्थ चित्तपावनजनस्थ असा हि होईल. परंतु कऱ्हाडे, किरवंत, पळशे, शेणवी, सुतार, पांचकळशी, अशा प्रत्येक जातीला पृथक् पृथक् धर्माधिकारी नेमण्याचा संप्रदाय आपल्या देशांत प्राचीन काळीं नव्हता व सध्यां नाहीं. तेव्हां चित्तपावन म्हणजे चित्तपावन लोक अथवा जन असा अर्थ येथें घेतां येत नाहीं. चित्तपावनस्थ म्हणजे चित्तपावनप्रांतस्थ किंवा चित्तपावनग्रामस्थ असा च अर्थ स्वीकारणें अपरिहार्य आहे. ह्या अर्थस्वीकाराला दुसरें हि एक प्रमाण आहे. संमतिपत्राच्या दुसऱ्या सहींत

" संमतमिदं महादेव भट खरे
म्हाहागरकर प्रांत धर्माधिकारी "

प्रांत धर्माधिकारी असे शब्द आहेत तेव्हां येथें धर्माधिकारित्व स्थलविशिष्ट आहे, जनविशिष्ट नाहीं, हें स्पष्ट आहे. तात्पर्य, चित्तपावन हें स्थलनाम आहे, लोकनाम नाहीं.

६ चित्तपावन हें स्थल किंवा प्रांत कोंकणांत कोठें असावा ? हें स्थल किंवा प्रांत तो असावा कीं, जेथें किंवा ज्यांत किंवा ज्याच्या आसपास चित्तपावनांच्या साठ आडनांवांत गर्भित असलेलीं ग्रामें आहेत, साठ आडनांवांतून जीं आडनांवें गुणांवरून किंवा धंद्यांवरून पडलीं तीं गाळून बाकीचीं जीं आडनांवें उरतात तीं सर्व ग्रामांवरून निघालेलीं आहेत. हीं ग्रामें ज्या प्रदेशांत असतील तो सर्व प्रदेश चित्तपावनसंज्ञक होय. आतां, प्रस्तुतकालीं हें नांव प्रचलित नाहीं, हें स्पष्ट च आहे. नाहीं तर ह्या नांवाच्या व्युत्पत्तीसंबंधानें इतका घोटाळा माजला नसता. हा घोटाळा सह्याद्रिखंडलेखनकालापासून चालू आहे. म्हणजे, सह्याद्रिखंडलेखनकालीं हि चित्पावन हा शब्द इतका रूढ व प्राचीन होऊन गेला होता कीं, त्याचा उगम लोकांस कळेनासा झाला होता.

७ चित्पावनांच्या आडनांवांत 'साठे' असें एक आडनांव येतें; हें साष्टिकः या शब्दापासून साठिआ (एकवचन), साठिए, साठिये, साठ्ये, साठे अशा परंपरेनें निष्पन्न झालेलें दिसतें. तेव्हां साष्टि हा प्रांत चित्तपावन प्रांतांत पुरातनकालीं मोडत असावा. 'दावक' हें एक चित्तपावनांचें आडनांव आहे. दापपल्ली, दापोली या शब्दांतील जो दाप तेथील राहाणारा जो तो दापक. दापकः = दावकः = दावका, अशा परंपरेनें दावक, दावके हें आडनांव आलेलें आहे. अशी च परंपरा आणखी कांहीं आडनांवांची दाखवितां येईल. सारांश, दापोली हरणईपासून साष्टीपर्यंतचा जो मुलूख तो पुरातनकाळीं चित्तपावन या संज्ञेनें मशहूर असावा. मालशे, पोंगशे वगैरे आडनांवें माल (मालवण), पोंग ? वगैरे प्रांतवाचक शब्दांवरून निघालेलीं स्पष्ट दिसतात. चित्पावनांच्या आडनांवांसंबंधानें एक स्वतंत्रच लेख मी लिहिणार आहें; त्यांत कोंकणस्थांच्या सर्व आडनांवांचा छडा लावण्याचा प्रयत्न करण्याचा माझा विचार आहे.

८ आतां चित्पावन किंवा चित्तपावन ह्या शब्दाचा अर्थ काय तो पाहूं. क्षितिपावन किंवा चितिपावन या शब्दाचा अपभ्रंश चित्पावन हा शब्द आहे. 'क्ष' चा 'छ' व 'छ' चा 'च' होऊन

क्षितिपावन = छितिपावन
= चितिपावन
= चित्पावन

असा अपभ्रंश होतो. क्षितौ पावनः क्षितिपावनः । पृथ्वीवर जो सर्वांना पावन करितो तो. क्षितिपावन अथवा चिति या शब्दाचा

अर्थ हि पृथ्वी असा आहे, तेव्हां चितिपावन असा हि मूळ शब्द असेल. चित्पावन याचें भारदस्त पुन्हा संस्कृतीकरण 'चित्तपावन' हें आहे. (भा. इ. १८३३)

जिनगर – अजिनकर = जिनकर = जिनगर. ऋभुभ्योऽजिनसंधं (मा वा. सं. ३०–१५) अजिनसंधं चर्मसंधातारं (महीधर-वेददीप ३०–१५) चर्म ऊर्फ चामडें जोडणारा जो तो अजिनकर. तात्पर्य हा शब्द वेदकालापासूनचा आहे. जिनगरांना ह्याचा अभिमान असावा. (भा. इ. १८३३)

ठाकर – तस्कर (a thievish tribe) = ठक्कर, ठाकर. पूर्वेतिहासकालीं तस्कर ही एक रानटी जात होती. त्यांचे वंशज ठाकर. (महिकावतीची बखर पृ. ८४)

ढोर – धिग्वण्या–योगवाज्जातः पुत्रो दुर्भरसंज्ञकः ।
स कुर्याच्चर्मपात्राणि जीवनाय निरंतरम् ॥
जातिविवेकः ॥
डोहरु इति ख्यातः ॥

धिग्वणीच्या ठाईं अयोगवापासून झालेला जो पुत्र तो दुर्भर होय. तो चामड्याचीं पात्रें करितो. दुर्भर = डुह्हरं = ढोर. (भा. इ. १८३४)

तांडेल–तांडा म्हणजे नावांचा किंवा नावेंतील खलाशांचा समूह. तांड्याचा जो पुढारी तो तांडेल. तांडेल-तांडेला हा धंदावाचक शब्द आहे. तंडक (समूह, ओळ) + इरः (प्रेरक, चालविणारा) = तंडकेर (तांड्याचा चालक). तंडकेर = तांडिल (नावांचा किंवा नाविकांचा पुढारी). (महिकावतीची बखर पृ. ८०)

तांबट [ताम्रकुट्ट = तामउट्ट = तामुट = तामट = तांबट] (भा. इ. १८३२)

तिरगूळ – अपरान्तांत म्हणजे उत्तर कोंकणांत सह्याद्रींत त्रिकूट नगर होतें. येथील राजांना व प्रजांना त्रैकूटक म्हणत. त्रैकूटक याचा प्राकृत अपभ्रंश वृद्धि जाऊन त्रिगुडअ असा होणें शक्य आहे. त्रिगुडअ याचें स्वल्पोच्चारित रूप त्रिगुड. हा त्रिगुड शब्द पद्मपुराणकारानें योजिला आहे, व तो प्राकृत आहे. ह्या त्रिगुड शब्दाचा मराठी अपभ्रंश तिर्गुळ तात्पर्य, तिर्गुळ हे ब्राह्मण आहेत व ते त्रिकूट ऊर्फ त्रिगुड या उत्तर कोंकणांतील प्रांतांत राहणारे होते जुन्नर व त्याखालील तळकोंकण यांत तिर्गुळांची वस्ती अद्याप हि आहे. त्रिकूट येथील राजे अभीर होते व त्रैकूटक ऊर्फ त्रिगुड ब्राह्मण दुष्टाचारवान् होते, सबब पद्मपुराणकाराच्यामतें पंक्तिदूषक होते. (भा. वार्षिक इ. १८३६)

तुषार – (१) विष्णुपुराणाच्या चतुर्थांशाच्या चोविसाव्या अध्यायाच्या तेराव्या कलमांत खालील वाक्य आहेः—

"ततश्चाष्टौ यवनाः, चतुर्दश तुषाराः,
मुंडा श्च त्रयोदश, एकादश मौनाः ।"

ह्या वाक्यांतील चतुर्दश तुषार कोण व कोठील हें शोधावयाचें आहे.

(२) Historian's History of the World च्या सातव्या खंडाच्या ६० व्या पानावर खालील वाक्य आहेः—

"Strabo says that the nomadic peoples of the Asii, Pasiani, Tochari, and sacaraucæ, dwellers in the land of the Sacæ, beyond the Jaxartes, *opposite to the* Sacæ and Sogdians came and took Bactria from the Greeks."

ह्या वाक्यांत Tochari, तोखारी, म्हणून शकदेशांत रहाणारे जे परके लोक वर्णिले आहेत ते च विष्णुपुराणांतील तुषार होत. चौदा तुषारांनीं राज्य केलें, म्हणून विष्णुपुराणकर्ता लिहितो. (भा. इ. १८३५)

तुषार = तुखार = तोखार. हे तुषार यवनांचे व मौनांचे समकालीन असावे. B. C. १४० नंतर ह्या तुषार लोकांचें नांव ऐकूं येतें. (भा. इ. १८३५)

देवरुखे – कऱ्हाडाच्या दक्षिणेस कुंडल म्हणून एक खेडें व रेल्वे स्टेशन आहे. त्याच्या समोर पूर्वेस **देवराष्ट्रें** ह्या नांवाचें एक लहानसें खेडें किंवा गांव आहे. हें **देवराष्ट्रें** शक २७२ च्या सुमारास **देवराष्ट्र** या नांवानें प्रसिद्ध असून तें ज्या प्रांताची राजधानी होतें त्या प्रांतालाही **देवराष्ट्र** ही च संज्ञा होती. ह्या **देवराष्ट्र** प्रांतांत त्या कालीं साताऱ्यापासून कोल्हापूरपर्यंतचा व समुद्रापासून पंढरपूरपर्यंतचा प्रदेश येत असावा. ह्या **देवराष्ट्र** प्रांतांत राहणारे जे ब्राह्मण व **देवराष्ट्र** देशच्या **कुबेर** राजाच्या आश्रयानें राहाणारे जे ब्राह्मण ते **देवराष्ट्र** किंवा **देवराष्ट्रीय** किंवा **देवरुखे** ब्राह्मण होत.

देवराष्ट्र या संस्कृत शब्दाचा प्राकृत अपभ्रंश देवरठ्ठ व्हावा देवरुख होऊं नये. देवरुखे या प्राकृत शब्दाचें संस्कृत रूप देवऋषि व्हावें. संगमेश्वराजवळ देवरुख नांवाचें गांव आहे; परंतु त्याचें जुनें नांव देवरख असावें असा तर्क आहे. हा तर्क जर खरा असेल तर देवरुखे ह्या शब्दाचें शुद्ध रूप देवरखे असलें पाहिजे. देवरखे ह्या प्राकृत शब्दाचें संस्कृत रूप देवरक्षित. देवरख या गांवाचें हि मूळ संस्कृत नांव देवरक्षित असावें. देवरख

ब्राह्मण देवरुठ किंवा देवराष्ट्र देशांतील होत. किंवा देवराष्ट्र या शब्दाचें शुद्ध रूप देवरक्षित, देवरक्ष असें असावें. देवरक्षित नामक राजांचें नांव पुराणांतून येतें. जसा देवव्रात, देवरात हा शब्द तसाच देवरक्षित हा शब्द. तें कांहीं असो; देवराष्ट्र हें राष्ट्रांचें सध्यां ज्याला मराठा देश म्हणतात, त्यापैकीं शक २७२ च्या सुमारास एक संस्थान होतें आणि तेथील ब्राह्मणांना देवराष्ट्र किंवा देवराष्ट्रीय ब्राह्मण म्हणत आणि ह्याच देवराष्ट्र ब्राह्मणांना सध्यां देवरुखे किंवा देवरुखे म्हणतात. (भा. वार्षिक इ.१८३६)

घेड, घेडा – दैतेयः (the sons of दिति = दैत्य) = घेड, घेडा.

घेड म्हणजे वेदकालीन दैतेय, दैत्य.
घेडा ही जात दैत्यांची डहाणू उंबरगांवाकडे आहे.
घेड हे महाराष्ट्रांत सर्वत्र आहेत.

धोबी – धौतिक = धौबिअ = धोबीअ = धोबी.

(भा. इ. १८३५)

नट, निच्छिवि – जैनधर्माचा संस्थापक महावीर हा नट जातीचा होता, हें प्रसिद्ध आहे. ह्या नट जातीचा उल्लेख मनुसंहितेच्या दहाव्या अध्यायाच्या २२ व्या श्लोकांत केला आहे. व्रात्यक्षत्रियापासून सवर्ण म्हणजे क्षत्रियस्त्रीच्या ठाई जी प्रजा होते तिला नट ही एक संज्ञा असलेली मनुसंहितेंत वर्णिली आहे. तेव्हां ह्या व्रात्यक्षत्रिय जातींत महावीर जन्मला हें सांगावयाला नकोच.

ही नटजाति वैशाली नगराजवळ रहात असे. ह्या वैशाली नगरींत लिच्छवि नामक क्षत्रियांचें त्या कालीं वास्तव्य असे. लिच्छवि म्हणजे मनुसंहितेच्या दहाव्या अध्यायाच्या २२ व्या श्लोकांत उल्लेखिलेली निच्छिवि नामक व्रात्यक्षत्रियांची जात होय. निच्छिवि ह्या शब्दांतील निच्या ठिकाणीं लि आदेश होऊन लिच्छिवि हा प्राकृत शब्द निष्पन्न झाला. प्राकृतांत असा न चा ल होतो. उदाहरणार्थ निंब (संस्कृत) = लिंब (प्राकृत). ह्या प्राकृत लिच्छिवि शब्दाचा लिच्छवि हा अपभ्रंश किंवा पर्याय आहे.

ह्या लिच्छिवि जातींतील कुमारदेवीशीं शक २२० च्या सुमारास गुप्तवंशाचा आदिपुरुष जो पहिला चंद्रगुप्त त्यानें लग्न लाविलें. (V. A. Smith's Early History of India, chapter XI).

ह्या निच्छिवि शब्दाचा भारतांतील शिबि, शिवि ह्या देशवाचक व तद्देशराजवाचक शब्दाशीं संबंध असलेला दिसतो. शिविदेशाच्या जवळील जो प्रदेश तो निच्छिवि. शिविदेशांतील शिविनामक शुद्धक्षत्रियापासून जे व्रात्यक्षत्रिय झाले त्यांचा जो देश तो निच्छिवि देश.

निच्छिवि, लिच्छिवि ऊर्फ लिच्छवि व्रात्यक्षत्रियांचें नेपाळांत शक ५५७ च्या सुमारास राज्य सुरू झालें.

ह्या लिच्छवि जातीचें नांव गौतमबुद्धाच्या चरित्रांत अति येतें.

(भा. इ. अहवाल १८३२ प्रभू पहा).

नायर [नाग + केर (संबंधार्थक प्राकृत प्रत्यय) = नागकेर = नाअएर = नाएर = नायर]

(रा. मा. वि. चंपू पृ. १८९)

परदेशी [पारदेशिक = परदेशी]

परभू – (प्रभू पहा)

परेया – मद्रास वगैरे प्रांतांत अतिशूद्राहूनही एका पतित जातींतील लोकांस परेया म्हणतात. परेताः = परेया = मेलेले = मृत. जुन्या काळीं पिशाच म्हणून जे येथील मूळचे लोक होते, त्यांना, जिंकून जमीनदोस्त केल्यावर परेताः, परेया, असें अपनाम आर्यांनीं दिलें. (सरस्वतीमंदिर)

पिंजारी – पंजिकारः = पिंजारी

पिशाच – पिशिताशनः = पिशाचः = पिशादः

पिशं अत्ति = पिशाचः. पिशाचs i. e. the original people of पेशावर were canibals.

पुंड – पुंड्र = पुंड = पुंड. पुंड्रक हा शब्द जातिवाचक असून ऐतरेय ब्राह्मणांत आला आहे. (भा. इ. १८३२)

पेंढार, पेंढारी – पिंडार = पेंडार = पेंढार, पेंढारी. पिंडार (गाईम्हशींचे कळप घेऊन जाणारे आहीर वगैरे.)

(भा. इ. १८३२)

प्रभू – (प्रभू, परभू, अधिकारी) – देशावर जसे देशमुख, देसाई वगैरे पांचपन्नास, किंबहुना दोनचारशें खेड्यांवरील अधिकारी सातआठशें वर्षांपूर्वी असत व सध्यां आहेत, त्याप्रमाणेंच दक्षिण कोंकणांत प्रभू ह्या नांवाचे अधिकारी असत, व आहेत. हे अधिकारी, ब्राह्मण, शेणवी, कायथ व मराठे ह्यांपैकीं वाटेल त्या जातीचे असत. जसे इंग्लंडांत लॉर्ड लोक त्या त्या परगण्याचे अधिकारी असत, तसेच हे प्रभू लोक कोंकणांतील पांचपन्नास गांवांचे अधिकारी असत. ब्राह्मण, शेणवी व मराठे ह्या तीन जातींचे जे प्रभू होते ते यद्यपि प्रभूपणा करीत तत्रापि त्यांनीं प्रभूपणाची एक निराळी जात केली नाहीं. कारण, पेशा जरी प्रभूपणाचा असला तत्रापि आपल्या जातींत त्यांचा समावेश होत असे. कारण ब्राह्मण, शेणवी व मराठे ह्याच देशांतले राहणारे होते व आपण जींत आहों तीहून उच्च जातींत जाण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा साहजिकच नव्हती. परंतु कायथांची तशी स्थिति नव्हती. ते ब्राह्मण, शेणवी किंवा मराठे

ह्यांपैकीं कोणत्याही एका जातींतील नसून कायथ म्हणून अक्षरचणकांची जी एक जात आर्यसमाजांत प्रसिद्ध आहे तींतील होते. ह्या कायथ लोकांचा धंदा लिहिण्याचा, चित्रें काढण्याचा वगैरे असे. ह्या कायथांतील कित्येक लोक कोकणांत व मावळांत प्रभू झाले; तें प्रभूपण त्यांनीं दहापांच पिढ्या केलें; व प्रभू या आडनांवानें च ते आपल्याला मोजूं लागले. लोकांनीं ' तुम्ही कोण ' म्हणून विचारिलें म्हणजे ह्यांनीं ' प्रभू ' म्हणून सांगावें, ' कायथ ' म्हणून सांगूं नये. ह्यांच्यापैकीं कित्येक अशिक्षित लोक प्रभू शब्दाचा उच्चार परभू करीत. इतर ब्राह्मणादि जातींतील कुटाळ लोकांना एवढेंच पुरें होऊन प्रभू शब्दाचा परभू असा अपभ्रष्ट उच्चार ते मुद्दाम करीत. अशा रीतीनें परभू हा शब्द निष्पन्न झाला आहे. खरा शब्द प्रभू असाच आहे. ब्राह्मण, शेणवी, मराठे, प्रभू यांपासून भेद दाखविण्याकरितां हे आपल्याला कायथ प्रभू म्हणत. पाताणे प्रभू यांपासून भेद दाखविण्याकरितां चांद्रसेनीय हें विशेषण हे लोक जोडतात. कायथ हा शब्दही धंद्याचाच वाचक आहे. ह्या चांद्रसेनीय कायथ प्रभूंची मूळ जात कोण हें जातिनिर्णायक ग्रंथांवरून ऐतिहासिक परीक्षेनें कळण्यासारखें आहे. चित्रे = चित्रें काढणारे, गुप्ते = खजिन्यावरचे कारकून. चिटणीस, कारखानीस, वगैरे जीं आडनांवें ह्या लोकांत प्रचलित आहेत त्या सर्वांचा लेखणीशीं कांहींना कांहींतरी संबंध आहे. ही जात महाराष्ट्रांत बरीच पुरातन आहे. (सरस्वती मंदिर श्रावण शके १८२६)

वढई, वढवई, वढाई [वर्धकिन् = वड्ढइणो = वढई, बढाई, वढवई] वढई = सुतारकाम करणारी एक जात. (स. मं.)

विंजारी – विंध्याधरिन् = विंज्झ्याहरी = विंझारी = विंजारी = वंजारी. (भा. इ. १८३२)

वुरूड [वरुडः (अंत्यज विशेष) = वरूड = वुरूड]

वेरड १ [वैराष्ट्रिक = वेरट्ट = वेरड]
(राधामाधवविलासचंपू पृ. १६०)

–२ [वेरट (a low caste man) = वेरड]

वेलदार [विलदारक = वेलदार] दगडांचें बीळ उकरणारा, खाण उकरणारा.

भंडारी – मंडहारक = मंडहारिकः = भंडारी.
मंडं अच्छसुरां हरति मंडहारकः
मंडहारक म्हणजे ताडी करणारा.

भांडारी – (१) कोकणांत भांडारी नामक दर्यावर्दी लोकांची जात आहे. ह्या लोकांत मायनाक, रामनाक, वगैरे नाकप्रत्ययान्त नांवें असतात. नाक हा नाग ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. उघड आहे कीं, हे भंडारी लोक नागवंशीय आहेत. ह्यांचा पिढीजात धंदा दर्यावर्दीपणाचा आहे. संस्कृतांत भांड म्हणजे गलबत. गलबतांनीं समुद्रावर हालचाल करणारे जे ते भांडाहार.

भांडाहार = भांडार
भांडार ते च भांडारी

(२) महारांच्या हि नांवांपुढें नाक, नाग हे शब्द लागतात. तेव्हां महार हि नागवंशीय होत.

(३) भारतांत नागांच्या वंशावळी दिलेल्या आहेत. त्यांपैकीं बहुतेक सर्व वंश सध्यांच्या मराठा क्षत्रियांत आढळतात. इतिहाससंग्रहाच्या दुसऱ्या वर्षाच्या चवथ्या अंकांत नागांविषयीं मीं एक विस्तृत लेख लिहिलेला आहे. त्यांत नागवंशीय मराठा क्षत्रियांच्या आडनांवांचा ऊहापोह केला आहे.

(४) तात्पर्य, प्राचीन नागलोकांत क्षत्रिय, नावाडी व अतिशूद्र अशा तीन जाति असाव्या किंवा होत्या, हें निःसंशय आहे. (भा. इ. १८३५)

भावीण – भामिनी = भाविणी = भावीण (स्त्रीविशेषः जातिनाम). (भा. इ. १८३३, ३७)

मण्यारी [मणिकार = मणिआर = मण्यार = मण्यारी]
(भा. इ. १८३२)

महार – गाईला संस्कृत शब्द मह्य. ह्या गोवाचक मह्य शब्दावरून गवादींचें गांवाबाहेर निर्हरण करणाऱ्या जातीला महाकार अशी संज्ञा असे. महाकार शब्दाचें महाराष्ट्री रूप महाआर व महाआर ह्या महाराष्ट्री शब्दाचें मराठी रूप महार.
(राजवाडे लेख संग्रह भा. २– अंत्यजोद्धार पृ. १३३)

महुमद – [केशव Mahamedan ह्याला महुमद शब्द योजतो] (भा. इ. १८३२)

मांगेल – मांग + इल या दोन शब्दांचा समास आहे. पैकीं मांग हा शब्द मातंग ह्या शब्दाचा अपभ्रंश समजणें युक्त नाहीं. कारण मांगेल लोक अस्पृश्य नाहींत, पूर्ण स्पृश्य आहेत. तेव्हां मांगेल या संयुक्त शब्दांतील मांग ह्या शब्दाचें मूळ अन्यत्र शोधिलें पाहिजे. या मांगेल किंवा मांगेले लोकांचा धंदा मच्छीमारीचा असून ते उंबरगांवापासून मुंबईपर्यंतच्या टापूंत समुद्रकिनाऱ्यापासून मैल अर्ध मैलाच्या आंत वस्ती करून राहिलेले आहेत. (महिकावतीची बखर पृ. ८०)

माळी – मालः = मलओ = मळा = बाग. ज्याचा धंदा मळ्यांत तो माळी. (नामादिशब्दकोश – माळ २ पहा)

मोराटो, मोराठो (Moratto) इ. स. च्या सतराव्या शतकांतील ईस्ट इंडिया कंपनीचे हिंदुस्तानांतील इंग्रज वेपारी व नोकर मराठ्यांना मोराटो म्हणत. हा उच्चार ते बंगाली लोकांपासून पहिल्याप्रथम शिकले. बंगाली लोक अ चा उच्चार ऱ्हस्व ओ करतात. त्यामुळें मचा मो करून तत्कालीन बंगाली लोक मराठ्यांना मोराटो म्हणत. मो उच्चार कां झाला तें येथपर्यंत सांगितलें. आतां टो ची परंपरा सांगतों. मराठा म्हणून जो शब्द आहे तो मराठो असा रजपूत, व्रज, मारवाडी व बंगाली भाषांत प्रथमपुरुषाच्या एकवचनीं होत असे. येणें प्रमाणें मोराठो हा उच्चार निष्पन्न झाला. ठो चा टो असा कोमल उच्चार करण्याची बंगाल्यांची लकब आहे. त्यामुळें मोराटो हा उच्चार सिद्ध झाला. तो कलकत्त्याच्या इंग्रजांच्या परिचयाचा झाला व तो त्यांनीं आपल्या पत्रव्यवहारांत व इतिहासांत नमूद करून ठेवला. हा दिसण्याला वेडाबागडा उच्चार इंग्रजांनीं आपल्या टांकसाळींतून स्वयंस्फूर्तीनें पाडला नाहीं. त्यांनीं फक्त बंगाली लोकांचें अंधपरंपरा न्यायानें अनुकरण केलें व आधुनिक मराठ्यांच्या थट्टेस आपणास नाहक पात्र करून घेतलें. (भा. इ. १८३३)

लाडसके – शक = सक. ठसकेदार उच्चार सक. (पु.) सक्का, (पु. अनेकवचन) सके. लाडसक्का म्हणजे लाट देशांतील शक लोक. (महाराष्ट्राचा वसाहतकाल पृ. १३८)

लोणार – लवणाकरः = लोणार.

वंजारी – १ वनदारक किंवा वाणिज्यहारी.
(महाराष्ट्राचा वसाहतकाल पृ. १३६)
–२ (बिंजारी पहा)

वडार – वध्र (लोकनाम)

वाघरी – वागुरिक (snake-keepers) = वागरी = वाघरी ही एक जात गुजराथेंत आहे.

वाणी – पाणिक merchant = वाणी.

वारली – वारुडकि = वारुलइ = वारुली = वारली. दुबळा शूद्र आहे. वरुड ही एक अनार्य जात होती. तिच्यापासून वारुडकि जात झाली. (महिकावतीची बखर पृ. ८३)

वेसकर – (महार शब्द पहा) – जो श्वपाक यालाच महार हें लौकिक नांव आहे तस्य मृतानां गोगर्दभशुनां ग्रामाद् बहिर्निर्हरणं वृत्तिः नगराद्बहिः वासश्च । त्याला वेसकर, येसकर, ही संज्ञा खेड्यांतून असलेली दृष्टीस पडते. वेशीपाशीं नगराबाहेर राहणारा जो तो वेसकर किंवा एसकर अगर येसकर. यांनीं गुरादींचें कातडें काढून वारावरांना म्हणजे चांभारांना द्यावें.
(राजवाडे लेख संग्रह भा. २ अंत्यजोद्धार पृ. १३३)

शाक्य – नट, निच्छिवि वगैरे व्रात्य क्षत्रियजाति ज्या प्रांतांत रहात होत्या त्याच प्रांतांत शाक्य नांवाचे व्रात्यक्षत्रिय रहात असत. मनुसंहितेच्या दहाव्या अध्यायाचा ४४ वा श्लोक येणेंप्रमाणें आहेः—

पौंड्रकाश्चौड्रद्रविडाः कांबोजा यवनाः शकाः ।
पारदाः पह्नवाश्चीनाः किराता दरदाः खशाः ॥४४
(वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च ॥ ४३ ॥)

वृषल म्हणजे व्रात्य. सगर राजाच्या कालीं ह्या शक वगैरे क्षत्रियजाति व्रात्य झाल्या. पैकीं शकक्षत्रियोत्पन्न जे शाक्य व्रात्यक्षत्रिय त्यांपैकीं कांहीं लोक समानशील अशा नट, निच्छिवि वगैरे व्रात्यक्षत्रियांच्या प्रांतांत येऊन राहिले. ह्या शाक्यव्रात्यक्षत्रियांत गौतमबुद्धाचा जन्म झाला. महावीर जसा नटव्रात्यक्षत्रिय होता, तसाच बुद्ध शाक्यव्रात्यक्षत्रिय होता. व्रात्यत्वामुळें गौणता आली. तच्छमनार्थ शुद्धक्षत्रियांच्या व शुद्धब्राह्मणांच्या विरुद्ध ह्या दोघांनीं जैन व बौद्ध धर्म काढिले. ते शकादि व्रात्य जातींत अर्थातच फार प्रिय झाले. शुद्ध चातुर्वर्णिकांत ह्या वर्णसंकरकारक धर्मांचा शिरकाव झाला नाहीं. शकोऽभिजनोऽस्य शाक्यः (४-३-९२). शण्डिकादिभ्योऽण् (४-३-९२) ह्या सूत्रांत जो शण्डिकादि गण सांगितला आहे त्यांत खालील शब्द आहेतः—शण्डिक, सर्वसेन, सर्वकेश, शक, शट, रक, शंख, बोध. गर्गादिभ्यो यञ् (४-१-१०५) ह्यांतील गर्गादि गणांत हि शक शब्द आहे. ह्या दोन सूत्रांत अभिजनो अस्य व गोत्रापत्ये शाक्य असें रूप होतें म्हणून सांगितलें आहे. तद्राजार्थी रूप काय होतें तें पाणिनि सांगत नाहीं. गौतमबुद्ध ऊर्फ शाक्यमुनि तर राजपुत्र होता म्हणून प्रसिद्ध आहे. तेव्हां पाणिनि बुद्धापूर्वी झाला.
(भा. इ. अहवाल १८३२)

शिख – शिख (Vedik, name of a serpent priest) = शीख. हें एका वैदिककालीन सर्प लोकांच्या भटाचें नांव होतें.

शिंपी – शिल्पिन् = सिप्पी = शिंपी. शिंप्यांतील जुन्या चालीचे आधुनिकांग्लशिक्षणानभिज्ञ लोक आपणा स्वतःस सिपी म्हणतात. परंतु ब्राह्मणी उच्चाराचें शिष्टत्वास्तव अनुकरण करणारे नव्या चालीचे लोक शिंपी ह्या शब्दाचा उपयोग करितात. वस्तुतः शिंपी ह्या रूपापेक्षां सिपी हें रूप जास्त शुद्ध आहे. शिंपींतील अनुस्वार प्रथम अनुनासिक होता. तो शिष्टांनीं अनुस्वार केला. (स. मं.)

शीख – (शिख पहा)

शेणवी – महाराष्ट्रांत शेणवई ह्या नांवाचे स्वदेशबांधव आहेत. त्यांच्या नांवाची व्युत्पत्ति नाना प्रकारची दिलेली निरनिराळ्या ठिकाणीं सांपडते. कित्येकांच्या मतें शेणवई असें रूप नसून शेणवी असें शुद्ध रूप आहे. ह्या लोकांच्या मतें शेणापासून झाले ते शेणवी ! गोव्याकडे पोर्तुगीज लोक शेणवयांना सनाय म्हणून हाक मारतात; परंतु हा शेणवई ह्या शब्दाचा केवळ अपभ्रंश आहे. श्येननामक प्राण्यापासून ज्यांची मूळ उत्पत्ति कल्पिली ते शेणवई असाही मालवणास एका गृहस्थानें समासव्यवच्छेद केला. असे नानाप्रकारचे अर्थ ह्या शब्दाचे विनोदानें झालेले आहेत. त्यांत विशेष कांहीं मतलब नाहीं. कोंकणी भाषेंत शेणय असा एक शब्द आहे. त्याचा अर्थ पंतोजी आहे. तिकडे ब्राह्मणांपेक्षां शेणव्यांची लोकसंख्या जास्त असल्यामुळें शिक्षकाचा धंदा शेणवीच करीत आले आहेत. ज्याप्रमाणें आंग्लो इंडियन लोकांत पंडित म्हणजे पंतोजी समजण्याचा प्रघात आहे, त्याचप्रमाणें गोव्याकडे अस्सल पोर्तुगीज लोकांत पंतोजीस शेणय म्हणण्याचा प्रघात आहे. सारांश, शेणय हा शेणवी शब्दाचा अपभ्रंश आहे. तेव्हां शेणय शब्दाचा आश्रय करून शेणवी शब्दाची व्युत्पत्ति करतां येणें शक्य नाहीं. शेणवी शब्दाची खरी व्युत्पत्ति येणेंप्रमाणें आहे. शेणवी शब्द मूळ शेणवई असा आहे. शेणवई हें रूप मूळचें शेणवइ असें आहे. शेणवइ = सेण्णवइ = सैन्यपति, अशी ह्या शब्दाची परंपरा आहे. सैन्य शब्दाचें सेण्ण प्राकृत रूप आहे; व पति शब्दाचें वइ प्राकृत रूप आहे. चोलवइ = चोलपति, वाणरवइ = वानरपति, घरवइ = गृहपति अशीं रूपें सेतुबंध काव्यांत अनेक ठिकाणीं आलीं आहेत. तात्पर्य, सैन्यपति शब्दाचें सेण्णवइ व सेण्णवइ शब्दाचें शेणवी असें अपभ्रष्ट रूप आहे. शेणवी शब्दाच्या जोडीचाच दळवी शब्द आहे. हा शब्द दळवे ह्या रूपानें ज्ञानेश्वरींत येतो. दळवैपणा हें भाववाचक नाम ज्ञानेश्वरींत अनेक वेळां आलें आहे. दळवी = दळवै = दळवइ = दलपति, अशी ह्या शब्दाची परंपरा दिसते. शेणवी व दळवी ह्या दोन्ही शब्दांचा अर्थ एकच. दळवी व शेणवी हे दोन्ही शब्द ज्ञानेश्वरांच्याहि पेक्षां जुने आहेत; व ते धंदा किंवा पेशा ह्यांचे वाचक आहेत. ह्यावरून दळवी व शेणवी ह्यांची मूळजात कोणती तें मात्र निक्षून सांगतां यावयाचें नाहीं. परंतु सात आठशें वर्षांपूर्वी अलीकडल्यापेक्षां जातिनिर्बंध जास्त कडक होते असें मानल्यास शेणवी व दळवी ह्यांची जात धंद्यावरून क्षत्रियांची ठरते. हा केवळ व्युत्पत्तिदृष्ट्या विचार झाला. धर्म, आचार, शरीराचा आकार, वगैरेंचा ह्या बाबींसंबंधानें विचार करून मग कायमचा सिद्धांत बांधला पाहिजे.

(सरस्वती मंदिर श्रावण शके १८२६)

सवाशे (ब्राह्मण) – ब्राह्मण्यां जायते वैश्यायोसौ वैदेहिकाभिधः । शूद्रान्ते रक्षणं राज्ञा कुर्यादनुपमोहि सः ॥ सामान्यवनिताः पोष्यास्तासां भाटी च जीविका । तस्योक्ता शूद्रधर्माणां नाधिकारोस्ति कश्चन ॥ सावासी ॥ (जातिविवेक) सावासी = सवाशे (अनेकवचन) (भा. इ. १८३४)

सुतार – सूत्रग्राहः = सुतार. हातांत सूत्र वागवणारा तो सूत्रग्राह. सुतार हें कोंकणस्थांत आडनांव आहे. सूत्रकार पासून सुतार शब्द निराळा.